दाखल केलेली होती व असे नमुद केले आहे की मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अधिकार असल्यामुळे त्यांनी वरील कलमान्वये योजना दुरुस्ती करीता अर्ज सादर केला आहे. त्यांची अशी मागणी आहे की न्यायालयाच्या संपुर्ण निकाल पत्रामध्ये असे कोठेही म्हटलेले नाही की, मुजावर घराण्याच्या ४ शाखा आहे. परंतु मंजुर झालेल्या योजनेमध्ये मुजावर घराण्याचे ४ शाखा दाखवलेले आहे. त्यांनी असे नमुद केले आहे की मुजावरांच्या फक्त २ शाखा आहे १. सय्यद चांद बालेशाहा व २. सैदु नबिशाहा. सबब मुजावर घराण्यामधुन भरावायाचे ४ मुतवल्ली हे वरील २ शाखामधुनच भरावे म्हणजे प्रत्येक शाखे मधुन २ मुतवल्लीची वर्णी लागेल २ मुजावर घराण्यामध्ये नबिशाहा यांच्या घराण्याच्या वतीने अर्जदार १ ते १३ व दुसरे मुजावर च्या वतीने हे बालेशहा जे गैरअर्जदार १ ते ६ मधून आहे.

मा. दिवाणी न्यायालयाच्या न्यायनिर्णयात प्रत्येक ठिकाणी मुजावरच्या दोन घराणी असा उल्लेख केलेला आहे परंतु मंजुर योजनेमध्ये प्रत्येक ठिकाणी ४ शाखा असा उल्लेख आलेला आहे. वरील चुकीच्या दर्शवीलेल्या लिखाणामुळे अर्जदारच्या कोठयातुन ४ सदस्य कमिटी मध्ये पाहीजे असता फक्त एकच सदस्य कमिटीमध्ये आहे त्यामुळे अर्जदाराचे मोठे नुकसान होत आहे सबब योजना दुरुस्ती साठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, सदर मालमत्ता ही वक्फ मालमत्ता आहे व ती मालमत्ता मुतवल्ली यांना देण्यात आलेली आहे. सदरची बाब कायदयाच्या विरोधात आहे, मुतवल्ली ही मालमत्ता विकु शकतात, गहाण ठेवु शकतात किंवा कराराने देवु शकताता असे नमुद केले आह. ` सदरची बाब देखील कायदेशीर नाही. दावा क्र. २३०/४९ निकाल दि.२५/१०/१९६२ अन्वये सदरची योजना दुरुस्त करण्यात यावी. अर्जदाराने पुढे असे देखील सांगीतले आहे की मुजावर लोकांच्या ताब्यात वक्फ संस्थेचे घरे, दुकाने आहेत परंतु दुकाने, घरे यांच्या हक्का बाबत काहीही नमुद केलेले नाही. सबब योजनेमध्ये दुरुस्ती करावी अशी विनंती केलेली आहे.

योजनेकरीता दिलेल्या अर्जावर श्री. मुश्ताक अब्दुल रहेमान मुजावर व इतर ७ यांनी दि. ०२/०३/२०१९ रोजी म्हणणे सादर करुन असे कथन केले आहे की, दुरुस्ती करीता दाखल झालेले अर्ज हा सर्व मुतवल्लीच्या वतीने दाखल झालेले नाही सबब तो टेनेबल नाही सबब अर्ज रद्द करण्यात यावा.

त्यांनी पुढे असे नमुद केले आहे की, योजनेच्या कलम २८(A) नुसार जिल्हा न्यायालयाने मुजावरांच्या ४ शाखा असे नमुद केले आहे परंतु दुरुस्ती अर्जामध्ये चौथ्या शाखेला पार्टी बनविण्यात आलेली नाही. मुजावर घराण्यांच्या चौथ्या शाखेला ऐकल्याशिवाय त्यांच्या विरुध्द कोणतेही आदेश पारीत करण्यात येवु नये कारण त्यांना या अर्जात पार्टी करण्यात आलेले नाही अर्जदार हा मुद्दाम मुजावर घराण्याच्या चौथ्या शाखेला वंशपंरपरांगत पणात कमी करु इच्छितो चौथ्या मुजावर घराण्यामध्ये एकुण १८ सदस्य आहे.

दिनांक २८/१/१९८९ रोजी बॉडं पेपर वर संमतीपत्र करुन दिलेले आहे त्यात ४ शाखेमधून प्रत्येक खालील प्रमाणे एकएक मुजावराची निवड केलेली आहे. व त्याला सर्वांची मान्यता असून ४ ही शाखेच्या संपूर्ण कूटूंबाने त्यावर सम्मती दर्शवून सहया केलेल्या आहे.त्या शाखा खालील प्रमाणे आहे.

शाखा क्र. १   मकसूद अब्दुल रहिमान मुजावर
शाखा क्र. २   रफीक अब्दुल करीम मुजावर
शाखा क्र. ३   बशीर इब्राहीम मुजावर
शाखा क्र. ४   हारून बाबूलाल मुजावर

जिल्हा न्यायालयाने दि. ३०/०३/१९९० च्या आदेशान्वये योजना मंजुर केलेली असल्याने वक्फ मंडळाला त्यात हस्तक्षेप करता येणार नाही. त्याकरीता सध्या वक्फ न्यायाधिकरण अस्तित्वात आहे . अर्जदाराने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सदर अर्जामध्ये गैरअर्जदार क्र. ७ असे दाखवलेले आहे. मुळातच योजनेची चौकशी त्यांच्या समोर होणार व निकाल देखील तेच देणार असे असंताना त्यांना पार्टी करण्याचे काहीच कारण नसताना पार्टी करण्यात आलेले आहे. सबब अर्जदारने गैरअर्जदार यांना वरील कारस्थान करुन मानसिकदृष्टया त्रास दिलेल्या असल्याने ५०,०००/- कॉस्ट करुन त्यांचा अर्ज नामंजुर करावा अशी विनंती केली आहे.

दि. १८/०६/२०१२ रोजी अर्जदार क्र. ९,१०,११,१३A व १३B यांनी योजने दुरुस्तीसाठी अर्ज दिलेला आहे तो प्रलंबीत आहे असे असंताना हा अर्ज दिलेला असल्याने तो नामंजुर करावा.

दि. ०६/११/२०२० रोजी गैरअर्जदार यांनी अर्ज देवुन वरील हकीकत तसेच मा. उच्च न्यायालयाने रिट पिटीशन क्र. १३६२२/१८ मधील दिलेल्या आदेशाचा उहापोह केलेला आहे.

दि. ०२/०३/२०१९ रोजी हस्तक्षेप अर्जदार शकिल एस. मुजावर रा. खेड शिवापूर, ता. हवेली. जि. पुणे यांनी अर्ज देवुन असे कथन केले आहे की, वक्फ मंडळाकडुन दि ०८/१२/२०१४ रोजी वृत्तपत्रात प्रकाशित झालेली नोटीस मला बजावण्यात आलेली नाही कारण मी देखील येथील मुजावर आहे व माझा देखील सारखा हिस्सा त्या संस्थेत आहे. अर्जदाराने त्याची पूर्तता केलेली नसल्याने त्याचा अर्ज रद्द करण्यात यावा. अर्जदाराला हे माहित आहे की माझा संस्थेत १/४ हिस्सा आहे तरी देखील त्यांनी मला प्रकरणात पार्टी केले नाही. सबब त्यांचा अर्ज रद्द करण्यात यावा व मला पार्टी करण्यात यावे व माझा हस्ताक्षेपाचा अर्ज मंजुर करण्यात यावा.

प्रादेशिक वक्फ अधिकारी यांचे पत्र क्र. चौकशी/११२/२०१७ दि. १७/१०/२०१७ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे आदेश क्र. चौकशी/ २१७९/२०१८ दि. ०१/०६/२०१८ अन्वये दर्गाह हजरत कमरअली दरवेश व गुडजी बाबा खेड शिवापूर या संस्थेच्या दैंनदिन व्यवस्थापनासाठी ॲडहॉक बॉडी तात्पुरत्या रित्या पुढील आदेशापर्यंत मंजुर करण्यात आलेली आहे. सदर बॉडी मध्ये खालील लोकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

१. प्रादेशीक वक्फ अधिकारी पुणे, पर्यवेक्षक
२. आरेफ़ चौधरी, सदस्य
३. मोहम्मद मुक्तार बराया, सदस्य
४. फेरोज सय्यद मुजावर, सदस्य

दि. २४/१२/२०१८ रोजी ॲड इनामदार यांनी ६७(२ व ६) वक्फ ॲक्ट अन्वये अर्ज देवुन कमेटी बदलण्याबाबात व त्यांना पदावरुन काढुन टाकण्याबाबत अर्ज दिलेला आहे. त्यांनी त्यांच्य अर्जात असे नमुद केले आहे की, कमेटीमध्ये सध्या असणा-या लोकांनी वक्फ संस्थाचे नुकसान केले आहे, मनमानी कारभार केलेला आहे, वक्फ संस्थेमध्ये त्यांचा इंटरेस्ट आहे. भक्तासाठी बांधलेले ५ ब्लॉक तोडुन टाकलेले आहे. बोर्डाच्या परवागी शिवाय कमेटी मेबंर दर्गाहचे डोनेशन बॉक्स फोडतात, तसेच कमेटी मेबंर कोणत्याही प्रकारचे खाते सांगत नाही.

फिरोज मुजावर नावाचा माणुस वक्फ संस्थेच्या विरोधात काम करतो त्यांनी वक्फ मिळकतीमध्ये बंगला बांधलेला आहे सबब त्या लोकांना कमेटी मधुन कमी करुन सुचविलेल्या लोकांना कमेटी वर घेण्यात यावे. तसेच दि. १४/०९/२०२१ रोजी श्री. इनमादार यांनी अर्ज देऊन असे कथन केले आहे की बोर्डाच्या आदेशानुसार तात्पुरत्या देखभालीसाठी ॲडहॉक कमेटीची नेमणुक केलेला होती. परंतु सदर कमेटी सदस्याने दर्गाहच्या पैश्याचा ५२ लाख रुपयाचा अपहार केले आहे व चार वर्षाचा हिशोब न दिल्यामुळे त्यांच्या विरुध्द रायगड पोलीस स्टेशन येथे एफ.आर. क्र. १२६/१५ दाखल केलेली आहे. सबब वरील कमेटी कायदयाने बरखास्त करण्यात यावी.

वक्फ अर्ज क्र. ४२/२०११ मध्ये अर्जदार मकसुद रहेमान अब्दुल मुजावर यांनी वक्फ न्यायाधिकरणाकडे अर्ज दाखल केला होता सदचा अर्जाचा निकाल दि. १०/०२/२०१२ रोजी होऊन न्यायालयाने सदरचा अर्ज रद्द करुन बोर्डाला आदेश दिलेले की संपूर्ण मुतवल्ली बोर्डाची नेमणुक दि. ३०/०२/१९९० च्या मंजुर योजनेच्या नुसार लवकरात लवकर करावी.

दि. १६/०४/२०१५ रोजी अर्जदार अखलाक अहेमद शेख यांनी वक्फ न्यायाधिकरणाकडे अर्ज क्र १७/१५ दाखल करुन मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि. १२/०९/२०११ च्या आदेश अन्वये अस्तित्वात असलेली ॲडहॉक कमेटी दि. ०६/०४/२०१५ च्या आदेशान्वये बरखास्त केलेली आहे त्यांस आव्हान दिलेले आहे. सदर आदेशाला मा. वक्फ न्यायाधिकरण न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. सदरच्या न्यायाधिकरणाच्या आदेशाला मंडळाने मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे सि.आर.ए. १५६/१५ अन्वये आव्हान दिलेले आहे. मा. उच्च न्यायालयने असे आदेश दिलेले आहे की वक्फ संस्थेमध्ये गैरअर्जदार यांनी गंभीर घोटाळा केलेला आहे. सबब मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कलम २५ अन्वये केलेली कार्यवाही उचित स्वरुपाची आहे सबब वक्फ न्यायाधिकरणाचा आदेश रद्द केलेला आहे.

त्यांनतर अर्जदार मकसुद अब्दुल रहेमान मुजावर यांनी उच्च न्यायालय औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ३०३५/१६ दाखल करुन असे कथन केले होते की, मा. वक्फ न्यायाधिकरणाने दि. १०/०२/२०१२ रोजी वक्फ बोर्डाला आदेश देऊन पुर्ण मुतवल्ली बोर्डाची नेमणुक करावी असे निर्देश दिलेले होते परंतु आदयापपावेतो पुर्ण मुतवल्ली बोर्डाची नेमणुक करण्यात आलेली नाही. सदर अर्जावर मा. उच्च न्यायालयाने अर्जदारास असे आदेश दिले की वक्फ न्यायाधिकरण हे सक्षम अधिकारी आहे जे काही सांगायचे असतील ते त्यांच्या पुढे सांगा असे नमुद करुन अर्ज दि. १४/०३/२०१६ रोजी निकाली काढलेला आहे.

त्यानंतर अर्जदार शब्बीर अब्दुल करीम मुजावर यांनी रिट पिटीशन क्र. १३६२२/१८ तसेच हमजा हुसैन यांनी रिट पिटीशन क्र. ६५४/१८ दाखल केले होते त्यावर गैरअर्जदार २ व ३ यांनी उच्च न्यायालया पुढे असे विधान केले होते की त्यांनी दाखल केलेल्या अर्जावर चौकशी घेऊन गुणदोषावर निकाली काढण्यात येतील सबब वरील दोन्ही रिट पिटीशन दि. ०७/१२/२०१८ रोजी मा. उच्च न्यायालयाने निकाली काढलेले आहे.

**ठराव क्रमांक ९ :-** **दर्गाह पीर कमरअली दरवेश व गुडजी बाबा, खेड शिवापूर, ता. हवेली. जि. पुणे या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापना बाबत मा. जिल्हा न्यायालय पुणे यांनी दि. ३०.०३.१९९० रोजी योजना मंजूर केलेली आहे. सदर योजने मध्ये बदल करण्याची आवश्यक्ता दिसून न आल्याने सदर**

योजना कायम ठेवण्याचा निर्णय वक्फ मंडळाने घेतला आहे. सबब या प्रकरणी नव्याने योजना मंजूरी बाबत प्राप्त झालेल्या सर्व योजना रद्द करण्यात येत आहे.

मा. जिल्हा न्यायालयाने पारीत केलेल्या योजने मध्ये विविध क्षेत्रामध्ये पाच सदस्य नियुक्त करावयाचे आहेत. त्यानुसार प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांनी विविध पाच क्षेत्रातील (सामाजिक, विधी तज्ञ, वार्ताहार, मुस्लीम स्कॉलर व क्रिडा ) प्रत्येक क्षेत्रातून किमान ३ नावे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालयास सादर करावी. सदर नावे वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव पुढील बैठकीस सादर करण्यात यावे.

**विषय क्रमांक १०:-**

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर**

**आदेश**

**संचिका क्र. ४२/४३/२०१३**

**मोहम्मद शफी उस्मान नाईक**
**रा. वावे वडखल, ता. पेन, जि. रायगड ----- अर्जदार**

**विरूध्द**

**इरफान अब्दुला नाईक**
**रा. वावे वडखल, ता. पेन, जि. रायगड ---- हरकतदार**

**प्रकरण - जामा मस्जिद वावे वडखल ता. पेन, जि. रायगडच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार फेरफार अर्जास मान्यता देणे बाबत.**
**नोंदणी क्र. MSBW/RDG/३५/२००८ बी.पी.टी.कलम १९५० नुसार B-७२**

प्रारंभिक - (विवेचन)

जामा मस्जिद वावे वडखल ता. पेन, जि. रायगड ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/RDG/३५/२००८ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

अर्जदार मोहम्मद शफी उस्मान नाईक -

अर्जदार यांनी दि. १७/०८/२०१३ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीचे फेरबदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये या कार्यालयास दाखल केला होता व सदरचा अर्ज मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केला होता.

सदरच्या अर्जाला इरफान अब्दुल्लाह नाईक रा. वावे वडखल, ता. पेन, जि. रायगड , यांनी हरकत घेतली होती की हरकतदाराचा अर्ज मंजूर करावा व अर्जदाराची फेरफार अर्ज

नामंजूर करावा. सदरच्या दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकल्यानंतर दि. २१/०१/२०१४ रोजी या कार्यालयाचे पत्र क्र. ४४८/१४ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे ठराव क्र. ५४/१३ दि. ०३/१०/२०१३ अन्वये वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये वक्फ संस्था जामा मस्जिद, वावे वडखल ता. पेन, जि. रायगड च्या व्यवस्थापकीय विश्वस्तांचा फेर फार अर्ज खालील प्रमाणे स्विकृत करुन नोंदविण्यात आला होता. त्यामध्ये एकुण समाविष्ट विश्वस्तांची संख्या ७ एवढी होती तसेच नियमानुसार त्यांना कलम २२ अन्वये अटी घालण्यात आल्या होत्या.

सदरच्या आदेशा विरुध्द हरकतदार श्री. इरफान अब्दुल्लाह नाईक व दिलावर हमीद पटेल यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकरण येथे वक्फ अर्ज क्र. १२/०४ दि. ०६/०१/२०१४ रोजी दाखल करुन दि. २१/०१/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केस क्र. चौकशी-/४२/४३/२०१३ या मध्ये झालेल्या आदेशाला आव्हान दिले होते. दि. २४/०७/२०१७ रोजी मा. वक्फ न्यायाधिकरण यांनी अर्ज क्र. १२/२०१४ मध्ये निकाल देऊन अर्जदाराचा अर्ज मंजुर केला व सदरच्या संचिकेमध्ये पुन्हा नव्याने चौकशी घेऊन गुणदोषावर निकाल देण्याबद्दल आदेशीत केले. तसेच पक्षकारांना कलम ४२ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे हजर राहणे बाबत आदेशित केले होते.

त्यानंतर वेळोवेळी सदरच्या प्रकरणामध्ये चौकशी घेऊन अर्जदार व गैरअर्जदार यांना चौकशी कामी बोलावुन व दि. २५/०२/२०२२ रोजी अंतिम चौकशी घेऊन दोन्ही पक्षकारांचे युक्तीवाद ऐकुण घेण्यात आले. या मध्ये अर्जदार मोहंमद शफी व इतर यांच्या वतीने एस.ए.जी. कूरेशी हे हजर होते तसेच इरफान अब्दूल्ला गैरअर्जदार यांच्या वतीने ॲड एन. ए.खान हे हजर होते. दोन्ही पक्षकारांचा यूक्तीवाद ऐकल्यानंतर सदरचे प्रकरण आदेशाकरिता ठेवण्यात आले.

**ठराव क्रमांक १०:-** **जामा मस्जिद वावे वडखल ता. पेन, जि. रायगडच्या वक्फ संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने पारीत केलेल्या दि. २१.०१.२०१४ चे आदेश मा. वक्फ न्यायाधिकरणाने वक्फ अर्ज क्र. १२/२०१४ मधे दि. २४.०७.२०१७ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये रद्द केले होते. तसेच सदर प्रकरण सुनावणीसाठी पुनश्च वक्फ मंडळाकडे पाठविण्यात आले आहे.**

**त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी दोन्ही पक्षकारांची सुनावणी घेण्यात आली असून हरकतदार श्री. इरफान अब्दुल्ला नाईक यांनी दाखल केलेल्या हरकती मध्ये कोणतेही तथ्य आढळुन आले नाही. सबब सदर हरकत रद्द करण्यात येत असून मोहम्मद शफी उस्मान नाईक यांनी दाखल केलेला फेरफार अर्ज मंजूर करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक ११:-**

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर**
**वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर**
**आदेश**

**संचिका क्र. ४२/२११/२०१८ व ४२/४०६/२०१८**

**मोहम्मद निसार वजीर खान पठाण**

रा. कोल्हापुर, ता. जि. कोल्हापुर ----- प्रथम अर्जदार

मलिक गुलाब मोकाशी
रा. शाहुपुरी कोल्हापुर ता. जि. कोल्हापुर -----व्दितीय अर्जदार

विरूध्द

१. जाफर खान अब्दुल शेख
रा. शाहुपुरी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापुर
२. फिरोज कादर जमादार
रा. शाहुपुरी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापुर
३. मैनोद्दीन खुतोबोद्दीन मोकाशी
रा. शाहुपुरी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापुर
४. अब्दुल सत्तार वजीर खान पठान
रा. शाहुपुरी कोल्हापुर, ता.जि. कोल्हापुर ---- सर्व हरकतदार

**प्रकरण - शाहुपुरी थोरले मस्जिद कोल्हापुरच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार व्यवस्थापकीय समितीच्या फेरबद्दलास मान्यता देणे बाबत.**
**नोंदणी क्र. MSBW/KPR/१४३/२०१८**

प्रारंभिक - (विवेचन)

शाहुपुरी थोरले मस्जिद कोल्हापुर ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/KPR/१४३/२०१८ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

प्रथम अर्जदार मोहम्मद निसार वजीर खान पठाण -

अर्जदार यांनी दि. ०५/०६/२०१८ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये या कार्यालयास दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

द्वितीय अर्जदार मलिक गुलाब मोकाशी -

अर्जदार यांनी दि. १०/१०/२०१८ रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या फेरबदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ अन्वये या कार्यालयास दाखल केला आहे. सदरचा अर्ज मंजुर करावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

१. हरकतदार जाफर खान अब्दुल शेख -

अर्जदारांने दि. १०/०९/२०१८ रोजी हरकत अर्ज दाखल केलेला आहे व असे नमुद केले आहे की, सदरचा बदल अर्ज वक्फ संस्थेच्या घटनेप्रमाणे झालेला नाही. त्यास समाज व जमातीची मान्यता नव्हती व नाही. सदरचे वक्फ संस्था नोंदणी करणेकमी जमातीने पुढाकार घेतला असुन त्यानुसार प्रस्ताव आपल्या कार्यालयात दाखल केला आहे. जमातीने नोंदणी प्रस्ताव दाखल करणार असल्याची चाहूल लागल्याने या वक्फ संस्थेचे स्वयंघोषित चेअरमन महमंद निसार वजीरखान पठाण यांनी खोटी कागदपत्रे तयार करुन घाईघाईत मंजुर करुन घेण्याच्या तयारीत आहेत.

२. सदर महंमद निसार वजीरखान पठाण हे खोटया कागदपत्रांच्या आधारे फेरफार मंजुर करुन घेत आहेत. यास या अर्जदारास हरकत असुन सदरचा बदल अर्ज ना मंजुर करण्यात यावा.

३. प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन पठाण यांनी वक्फ मिळकतीत दुकानगाळे व फलॅट बेकादेशीर बांधकाम करुन टेंडर न मागवता वक्फ मंडळाची पुर्वपरवानगी न घेता कोणतेही (नाहरकत दाखला) वक्फ मंडळाची परवानगी घेतली नाही व आपल्या हितचिंतकांना सदरची करोडो रुपयाची जागा मोफत वाटल्या आहेत. त्याची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत हरकतदार वेगळा अर्ज देणार आहेत.

४. प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन यांनी आपल्या मुलाला व नातेवाईकांना गाळे कायमस्वरुपी भाडयाने दिलेले आहेत. सदर भाडेकरु सोबत बोगस करारपत्र केलेले आहेत. तसेच मस्जिद पार्किंगच्या जागेत बेकादेशीर बांधकाम केले आहेत. तसेच २००० स्क्वे फुट जमीन स्वयंघाषित चेअरमन कोल्हापुर महापालिकेस मोफत दिलेली असुन त्या बाबत चौकशी व्हावी. बदल अर्जास ब-याच सभा सदस्यांची हरकत असुन आमचे हरकत दाखल करुन घेण्यात यावी.

२. <u>हरकतदार फिरोज कादर जमादार व इतर ५-</u>

अर्जदारांने दि. १०/०९/२०१८ रोजी हरकत अर्ज दाखल केलेला आहे व असे नमुद केले आहे की, सदरचा बदल अर्ज वक्फ संस्थेच्या घटनेप्रमाणे झालेला नाही. त्यास समाज व जमातीची मान्यता नव्हती व नाही. सदरचे वक्फ संस्था नोंदणी करणेकमी जमातीने पुढाकार घेतला असुन त्यानुसार प्रस्ताव आपल्या कार्यालयात दाखल केला आहे. जमातीने नोंदणी प्रस्ताव दाखल करणार असल्याची चाहूल लागल्याने या वक्फ संस्थेचे स्वयंघोषित चेअरमन महमंद निसार वजीरखान पठाण यांनी खोटी कागदपत्रे तयार करुन घाईघाईत मंजुर करुन घेण्याच्या तयारीत आहेत.

सदर महंमद निसार वजीरखान पठाण हे खोटया कागदपत्रांच्या आधारे फेरफार मंजुर करुन घेत आहेत. यास या अर्जदारास हरकत असुन सदरचा बदल अर्ज ना मंजुर करण्यात यावा.

प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन पठाण यांनी वक्फ मिळकतीत दुकानगाळे व फलॅट बेकादेशीर बांधकाम करुन टेंडर न मागवता वक्फ मंडळाची पुर्वपरवानगी न घेता कोणतेही (नाहरकत दाखला) वक्फ मंडळाची परवानगी घेतली नाही व आपल्या

हितचिंतकांना सदरची करोडो रुपयाची जागा मोफत वाटल्या आहेत. त्याची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत हरकतदार वेगळा अर्ज देणार आहेत.

प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन यांनी आपल्या मुलाला व नातेवाईकांना गाळे कायमस्वरुपी भाडयाने दिलेले आहेत. सदर भाडेकरु सोबत बोगस करारपत्र केलेले आहेत. तसेच मस्जिद पार्किंगच्या जागेत बेकादेशीर बांधकाम केले आहेत. तसेच २००० स्क्वे फुट जमीन स्वयंघाषित चेअरमन कोल्हापुर महापालिकेस मोफत दिलेली असुन त्या बाबत चौकशी व्हावी. बदल अर्जास ब-याच सभा सदस्यांची हरकत असुन आमचे हरकत दाखल करुन घेण्यात यावी.

३. हरकतदार मैनोद्दीन खुतोबोद्दीन मोकाशी व इतर ४-

अर्जदारांने दि. १०/०९/२०१८ रोजी हरकत अर्ज दाखल केलेला आहे व असे नमुद केले आहे की, सदरचा बदल अर्ज वक्फ संस्थेच्या घटनेप्रमाणे झालेला नाही. त्यास समाज व जमातीची मान्यता नव्हती व नाही. सदरचे वक्फ संस्था नोंदणी करणेकमी जमातीने पुढाकार घेतला असुन त्यानुसार प्रस्ताव आपल्या कार्यालयात दाखल केला आहे. जमातीने नोंदणी प्रस्ताव दाखल करणार असल्याची चाहूल लागल्याने या वक्फ संस्थेचे स्वयंघोषित चेअरमन महमंद निसार वजीरखान पठाण यांनी खोटी कागदपत्रे तयार करुन घाईघाईत मंजुर करुन घेण्याच्या तयारीत आहेत.

सदर महंमद निसार वजीरखान पठाण हे खोटया कागदपत्रांच्या आधारे फेरफार मंजुर करुन घेत आहेत. यास या अर्जदारास हरकत असुन सदरचा बदल अर्ज ना मंजुर करण्यात यावा.

प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन पठाण यांनी वक्फ मिळकतीत दुकानगाळे व फलॅट बेकादेशीर बांधकाम करुन टेंडर न मागवता वक्फ मंडळाची पुर्वपरवानगी न घेता कोणतेही (नाहरकत दाखला) वक्फ मंडळाची परवानगी घेतली नाही व आपल्या हितचिंतकांना सदरची करोडो रुपयाची जागा मोफत वाटल्या आहेत. त्याची चौकशी होणे अत्यंत गरजेचे आहे. त्याबाबत हरकतदार वेगळा अर्ज देणार आहेत.

प्रस्तुत स्वयंघोषित चेअरमन यांनी आपल्या मुलाला व नातेवाईकांना गाळे कायमस्वरुपी भाडयाने दिलेले आहेत. सदर भाडेकरु सोबत बोगस करारपत्र केलेले आहेत. तसेच मस्जिद पार्किंगच्या जागेत बेकादेशीर बांधकाम केले आहेत. तसेच २००० स्क्वे फुट जमीन स्वयंघाषित चेअरमन कोल्हापुर महापालिकेस मोफत दिलेली असुन त्या बाबत चौकशी व्हावी. बदल अर्जास ब-याच सभा सदस्यांची हरकत असुन आमचे हरकत दाखल करुन घेण्यात यावी.

४. हरकतदार अब्दुल सत्तार वजीर खान पठाण-

दि. ०८/१०/२०२१ रोजीचा अर्जदारांनी असा अर्ज दिला की, त्यांना दि. ०५/१०/२०२१ रोजी नोटीस मिळालेली आहे. अर्जदारानी दाखल केलेल्या कोणत्याही कागदपत्राच्या प्रती त्यांना मिळालेल्या नाही. त्यामुळे व हरकतदार यांना कायदेचे न्यान कमी असल्यामुळे वकीलाची नेमणुक करीत आहे.

५. तक्रार अर्जदार मैनोद्दिन खुतबोद्दिन मोकाशी यांचा फेरफारकरिता तक्रार-

अर्जदार यांनी दि. ०४/१२/२०१८ रोजी तक्रार अर्ज देऊन असे नमुद केले आहे की, स्वंयघोषित चेअरमन निसार वजीरखान पठाण हे गेली ३४ वर्षे कार्यरत आहेत व मनमानी कारभार करत आहात. वक्फ मंडळाची परवानगी न घेता चॅरीटी कमिशनरच्या नावाखाली चेअरमन यांनी लाखो रुपये घेऊन दुकानगाळे व प्लॅटस यांचे कायमस्वरुपी बेकादेशीरपणे वाटप केलेले आहे. वक्फ मंडळाची परवानगी न घेता श्री. निसार पठाण यांनी वक्फची कोटी रु. किंमतीची जमीन कोल्हापुर महानगरपालिकेस जागा मालक म्हणून मोफत दिलेली आहे. वक्फ बोर्डाची परिपत्रक असताना देखील श्री. निसार पठाण व त्यांच्या विश्वस्त मंडळातील इतर सदस्यांनी स्वत:ला व आपल्या नातेवाईकाला वक्फ मालमत्तेस दुकानगाळे नाममात्र भाडयावर घेतलेले आहेत. सन २००४ रोजी श्री. निसार पठाण यांनी बांधकामासाठी आवश्यक असणारी प्रोव्हीजन NOC वक्फ मंडळाकडून घेतली होती. त्याची मुदत संपलेली असताना देखील त्या प्रोव्हिजन NOC चा वापर करुन महानगरपालिकेची व लोकांची फसवणुक करत आहेत. श्री. निसार पठाण यांच्या हलगर्जीपणामुळे बांधकामाची आनामत रक्कम ४,७२,८३० रु. महानगरपालिकेने मुदतीने बांधकाम करुन भोगवटा प्रमाणपत्रक न घेतल्यामुळे जप्त केलेली आहेत.आमच्यातील जागृत सभासदाने पुढाकार घेऊन ट्रस्टची अदयावत नोंदणी वक्फ मंडळाकडे दि. ०७/०९/२०१८ रोजी केली आहे. त्याचा अदयावत नोंदणी क्रं. MSBW/KPR/१४३/२०१८ आला आहे. व तदनंतर सर्व जमातीने जनरल सभा बोलावुन नवीन कार्यकारी मंडळाची निवड करुन त्याचा फेरफार अर्ज आपल्या कार्यालयाकडे दि. १०/१०/२०१८ रोजी दाखल करण्यात आलेला आहे. जमातीने नोंदणीसाठी पुढाकार घेतल्याची चाहुल लागताच श्री. निसार पठाण यांनी आपला फेरफार अर्ज खोटी कागदपत्रे तयार करुन आपल्या कार्यालयाकडे पाठवली आहे. व त्यास असंख्य सभासदांची हरकत आहे. त्यामुळे, आपणास विनंती आहे की श्री. निसार पठाण यांचा फेरफार अर्ज नामंजुर करण्यात यावा. व जमातीने दाखल केलेला दि. १०/१०/२०१८ रोजीचा फेरफार अर्ज मंजुर करण्यात यावा. आमच्यातील सभासद जाफरखान अब्दुल शेख यांच्यावर निव्वळ अकसापोटी व राजकीय द्वेषापेटी बिनबुडाचे आरोप करुन राजकीय ताकद वापरुन वक्फ चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. एस.सी.तडवीसो यांच्याकडुन कार्यवाहीसाठी दि. १०/१०/२०१८ रोजी पत्र घेण्यात आलेले आहेत. त्यांची संपुर्ण चौकशी करण्यात यावी. तरी आमच्यावरील तक्रारींचा आपल्याकडुन विचार व्हावा व श्री. निसार पठाण व त्यांच्या विश्वस्त मंडळाची चौकशी लावण्यात यावी. हि विनंती.

<u>मलिक गुलाब मोकाशी (दुसरे अर्जदार) यांची हरकतदार व लेखी युक्तीवाद -</u>

हरकतदार यांनी तक्रार अर्ज देऊन असे नमुद केले आहे की, थोरली मस्जिद, शाहूपुरी, कोल्हापुर ही मस्जिद महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्याकडे नोंदणीकृत असुन त्यांचा नोंदणी क्र. MSBW/KPL/१४३/२०१८ असा आहे. सदरचा न्यास पुर्वी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार नोंणीकृत होता त्याचा नंबर बी- १९ असा होता. यातील अर्जदार जमात यांनी सदरचे संस्थेची नोंदणी रीतसर आपल्या कार्यालयात करुन घेऊन नोंदणी क्रमांक घेतला आहे त्यात देखील हरकतदार यांनी हरकत घेतली आहे. सदरचे नोंदणी क्रं. MSBW/KPL/१४३/२०१८ मे. वक्फ न्यायाधिकरण यांच्याकडे आव्हानीत केलेले आहे. तसेच सन १९९८ पासुन आजपर्यंत या संस्थेचे तथाकथित स्वयंघोषित चेअरमन यांनी कधीही सभा घेतली नाही. त्यामुळे

०७/१०/२०१८ रोजी या मशीदी संदर्भात आयु विन ख्रिश्चन हॉलमध्ये सभा आयोजित केली त्यानुसार कार्यकारी मंडळाची निवड केली. यातील संचालक मंडळाने संस्थेचे कामाज सुरु करण्याबाबत कारवाई करतात जाबदार यांनी घाईगडबडीने बदल अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर कामातील बदल अर्ज योग्य व बरोबर आहे. थोरली माझी परिसरातील व शाहुपुरी परिसरातील सर्व लोक प्रस्तुत मिटींगला हजर होते त्यांच्या सहया प्रोसिडिंग वरती आहेत. त्यांच्यानुसार त्या सर्व सभासदांच्या समोर नवीन कार्यकारी मंडळाची निवड केलेली आहे. त्याप्रमाणे सदरचा बदल अर्ज दाखल केलेल्या आहे. प्रस्तुत कामातील हरकतदार यांनी कधीही मस्जिद च्या सभासदांची मिटिंग घेतली आहे. तसेच अचानकपणे याकामी ७५४ सभासदांची यादी हजर केले आहे कामातील कधीही सर्वसाधारण सभेची नोटीस वर नमुद सभासदांचा दिलेली नाही. त्यामुळे बोगस कागदपत्रांच्या आधारे दाखल केलेले बदल अर्ज/पार अर्ज क्रमांक ४२/२११/२०१८ हा नामंजुर करण्यात यावा. सदर कामातील अर्जदार यांनी १७/०९/२०१७ दाखवलेली सभा बनावट बोगस अशी आहे कारण सदर सभेस मोहम्मद निसार खान पठाण राज मोहम्मद ताजमोहम्मद ट्रेनर, हसिम मनगुळीसाब, खालील अन्सारी हे कधीही हजर नव्हते असे अर्जदार यांच्या दाखल केलेल्या सभा इतिवृत्तांत वरुन दिसुन येते. त्यामुळे बोस बनावट प्रोसिडिंग बुकाच्या आधारे अर्जदार यांचा फेरफार अर्ज/बदल अर्ज मंजुर करण्यात येऊ नये. तसेच सदर सभेस केवळ ८८ सभासद हजर दाखवण्यात आलेले आहेत. उर्वरित ६६६ सुचना/नोटीस दिलेले नाही करुन देखील सदरचे बद्दल अर्ज बोगस बनावट असल्याचे स्पष्ट होते.

सदर कामातील तथाकथित चेअरमन मोहम्मद निसार वजीर खान पठाण यांची निवड सन १९८४ पासुन आजतागायत म्हणजे जवळजवळ ३८ वर्ष या संस्थेचे चेअरमन असल्याचे दर्शवीत आहेत. वास्तविक पाहता सन १९९८ रोजी त्यांचा कार्यकाल संपलेला आहे. तसेच या न्यासाच्या मंजुर नियम नियमावलीनुसार अध्यक्षपद/चेअरमनपद केवळ एका वर्षासाठीच आहे. यातील अर्जदार मोहम्मद निसार वजीर खान पठाण यांनी ३८ स्वत: बेकायदेशीररित्या अध्यक्ष/चेअरमन म्हणुन घेत आहेत. अर्जदार मोहम्मद निसार वजीर खान पठाण यांनी बेकादेशीर रित्या वक्फ मालमत्तेचे स्वार्थासाठी स्वत:च्या फायदयासाठी नुकसान केले आहे. सदर वक्फ संस्थेस जंगम स्थावर मालमत्ता आहे त्याची नोंद आपल्या वक्फ बोर्डाकडे आहे. अशी परिस्थिती असताना तथाकथित स्वयंघोषित तहयात चेअरमन मोहम्मद निसार वजीर खान पठाण यांनी वक्फ मंडळाच्या पुर्वपरवानगीशिवाय बेकादेशीर रित्या दहा कोटी रुपये मालमत्तेचा परस्पर अपहार केले आहेत.

मोहम्मद निसार वजीर खान पठाण अर्जदार यांचा लेखी युक्तीवाद -

दि. १७/११/२०२१ रोजी अर्जदाराने लेखी युक्तीवाद खालील प्रमाणे मांडलेला आहे. संस्थेचे दर ५ वर्षाने कार्यकारी मंडळाचे पदासाठी निवडणुक होते २०१७ मध्ये नियमानुसार व घटनेनुसार रितसर निवडणुक झालेली आहे अर्जदार ट्रस्टची दि. १०/१२/२०१६ रोजी वार्षीक सभा झाली या सभेमध्ये योजनेमधील कलम २ मध्ये नमुद केलेल्या विश्वस्तांच्या संख्येनुसार ३ ट्रस्टीची निवड करण्यात आली व राहीलेले ४ ट्रस्टीची नियुक्ती करण्याकरिता कोअर कमेटीची स्थापना करुन त्यांच्या माध्यमातुन

नियुक्ती करण्याकरिता सभेत ठराव झाला त्यानंतर अर्जदारांनी सदर संस्थेचे संभासदा मार्फत निवडुण आलेल्या कार्यकारी मंडळाचा फेरफार मंजुर होऊन मिळण्याकरिता अर्ज दाखल केलेला आहे. दि. १०/१२/२०१६ व १७/०९/२०१७ रोजी वार्षीक सभा झाली या सभेमध्ये हरकतदार हजर होते त्यांनी निवडुन आलेले विश्वस्त मंडळाला मान्यता दर्शविली होती तसेच सभेमध्ये हजर होते म्हणुन प्रोसेडिग मध्ये सही केलेली आहे. वरिल दोन्ही सभेमध्ये मलिक मोकाशी मोसीन शेख मोहम्मद खान फेरोज कादर जमादार व इतर सर्व हरकतदार हजर होते. व त्यांनी मंजुर झालेल्या ठरावास मान्यता दिली होती त्यामुळे हरकती घेण्याचा त्यांना कोणताही कायदेशीर हक्क व अधिकार नाही.

हरकतदार यांनी जो फेरफार अर्ज दाखल केला आहे. त्या फेरफार मध्ये नमुद लोकांनी संस्थेची वर्गणी जमा केलेली नाही. त्यामुळे घटनेतील कलम ८ नुसार हरकतदार यांचा फेरफार अर्ज हा कादयाने चालण्यास पात्र नाही हरकतदार यांच्या फेर फार अर्जामधील लोक संस्थेचे घटनेतील कलम ८ नुसार ट्रस्टी पदासाठी पात्र उमेदवार नाही. फेरोज जमादार यांच्याकडे संस्थेचे ३३,६०० रुपये थकलेले आहे त्यांनी संस्थेच्या पार्कींगचे नुकसान केले आहे नुकसानीचे रक्कम व भाडयाची रक्कम मागणी केली असता तो भाडु लागला व त्यांनी चीडुन खोटी हजरकत दाखल केली सबब हरकतदार हे संस्थेचे व घटनेतील कलम ८ नुसार अपात्र असल्याने व त्यांची हरकत कायदयाने चालनेस पात्र नसल्याने त्यांचा अर्ज नमंजुर करण्यात यावा. व अर्जदारचा फेर फार अर्ज मंजुर करण्यात यावा.

**ठराव क्रमांक ११:-** शाहुपुरी थोरले मस्जिद कोल्हापुर या वक्फ संस्थेच्या शेडयुल-१ नुसार प्रत्येक ५ वर्षांनी निवडणुक घेण्याची तरतुद आहे. तथापी प्रस्तुत प्रकरणी सन १९९३ नंतर सन २०१८ मध्ये व्यवस्थापन समितीचा फेरफार बदलाचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे. दरम्यानच्या कालावधीत सदर वक्फ संस्थेमध्ये निवडणुक झाल्याचे वा धर्मदाय आयुक्त/महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालया मार्फत फेर बदल अर्ज मंजूर झाल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन दिसून येत नाही.

सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापन करीता अद्याप योजना मंजूर करण्यात आलेली नाही. सबब, या बाबत प्राप्त झालेले फेरबदल अर्ज रद्द करण्यात येत आहेत.

विषयाधीन वक्फ संस्थेकरिता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाचे आदर्श योजना (Model Scheme) मंजूर करुन त्यानुसार विश्वस्थ नेमण्याकरिता निवडणुक घेण्यात यावी.

**विषय क्रमांक १२:-**

**<u>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३२ व ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश</u>**

**संचिका क्र. ६९ (३२)/१४/२०१३**

**संचिका क्र. ६९ (३२)/९४/२०१३**

**संचिका क्र. ६१/४३०/२०१३**

प्रकरण - हजरत पिर शकर गंज रहे. दर्गा, मिरज, ता. मिरज, जि. सांगलीच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी योजना मंजुर करणे बाबत. (B-२२४) MSBW/SGL/२९/२००७.

संदर्भ - १. जनाब आसीफ अ. रहेमान शेख व इतर यांचा कलम ६९ अन्वये अर्ज दि. २६.१२.२०१२

२. जनाब आसीफ अ. रहेमान शेख व इतर यांचा कलम ६९ अन्वये अर्ज दि. २२.०२.२०१३

३. जनाब हसन महंमद अ. करीम इनामदार व इतर यांचा कलम ६१ अन्वये अर्ज दि. १९.०९.२०१३

४. वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ नुसार जनाब एफ.जी. इनामदार यांचा अर्ज दि. ०६.०९.२०१३

जनाब आसीफ अ. रहेमान शेख व इतर
रा. मिरज, ता. मिरज, अर्जदार
जि. सांगली

विरूध्द

जनाब घुडूलाल हसन इनामदार व इतर,
(वारस फरदीन घुडूलाल इनामदार व इतर)
रा. मिरज, ता. मिरज, गैरअर्जदार
जि. सांगली

प्रारंभीकः-

हजरत पिर शकर गंज रहे दर्गा, मिरज, ता. मिरज, जि. सांगली ही संस्था महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या तरतुदीनुसार बी-२२४ (सोलापुर) अन्वये नोंदणीकृत संस्था आहे.

दि. ०१.०१.१९९६ पासुन वक्फ अधिनियम १९९५ संपुर्ण महाराष्ट्रात लागु करण्यांत आलेला असून सदर संस्था कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून ही MSBW/SGL/२९/२००७ अन्वये रितसर नोंदणी करण्यात आलेली आहे. मा.धर्मादय आयुक्ताकडील अनुसूचि-१ व योजनेमधील सदर संस्थेच्या संबंधीत असलेली वक्फ मिळकतीची व विश्वस्तांची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

जनाब आसीफ अ. रहेमान शेख व इतर, रा. मिरज, ता. मिरज, जि. सांगली यांनी संदर्भ क्र. १ व २ अन्वये हजरत पिर शकर गंज रहे, दर्गा मिरजच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ अन्वये योजना (घटना) मान्यतेसाठी सादर केलेली आहे.

सदर संस्था दि. २४.०९.१९६६ रोजी नोंदणी करता वेळी समाजातील श्रीमती सरदारबी भ्र. इब्राहिम मुल्ला यांचे नावाची नोंद विश्वस्त व व्यवस्थापक म्हणुन नोंद दिलेली आहे. धर्मदाय आयुक्ताकडील अर्ज क्र. ४/७७, ११/७७ मधील आदेश दि.३०.०७.१९७९ प्रमाणे जनाब घुडूलाल हसन साब इनामदार, जनाब हसन महमंद अ. करीम इनामदार यांचे नावांची नोंद

अनुसूचिवर दिसत असून जनाब घुडुलाल हसन इनामदार हे मयत झालेले आहे. नविन विश्वस्त घेण्यांची रित वंशपरंपरागत असल्याचे नमुद करण्यांत आलेले आहे परंतु सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी आज पर्यंत योजना मान्यतासाठी कोणत्याही सक्षम प्राधिकारी कडे सादर करण्यांत आलेली नाही.

सदर संस्थेच्या संबंधीत असलेली जंगम मालमत्ताची नोंद कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यं ात आलेली आहे.

प्रकरणांत या कार्यालयाचे पत्र क्रमं ाक मरावंम/चौकशी-३१६/८७५/२०१३ दिनांक २६.०२.२०१३ अन्वये संबंधीतांना नोटीस निर्गमित करून दि.०४.०४.२०१३ रोजी सुनावणी ठेवण्यांत आली.

प्रकरणांत जनाब घुडुलाल हसन इनामदार तर्फे वारस फरदीन घुडुलाल इनामदार, मलीम घुडूलाल इनामदार फरोजीबी घुडूलाल इनामदार सर्व रा. मिरज यांनी दि.११.०६.२०१३ रोजी आपले खालील प्रमाणे आक्षेप सादर केलेले आहे.

१. वरनमुद न्यास/वक्फ हा नोंदणीकृत असून त्याचा मु.सा.वि.व्य. अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्र. बी-२२४ (सांगली) असा असुन सदरचा न्यास वक्फ अधिनियम १९९५ नुसारसुध्दा नोंदणीकृत असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/SGL/२९/२००७ असा आहे.

२. सदर न्यासास/वक्फास नियम नियमावली आहे. वक्फाच्या घटनेनुसार मुख्य विश्वस्त म्हणुन घुडुलाल हसनसो ा इनामदार यांच्या मृत्युपश्चात त्यांचा ज्येष्ठ मुलगा आम्हापैकी फरदीन घुडुलाल इनामदार हे कार्यरत आहेत. घुडुलाल इनामदार हे वरनमुद दर्गाहचे कामकाज पाहात आहेत.

३. अलीकडेच वक्फ संस्थेशी काडीमात्रसंबंध नसणारे आसिफ अब्दुल रहेमान शेख, सुलेमान युसुफ मुल्ला, नबीसो ा महीबुब मुजावर, आयुब अब्दुलकादर नालबंद यांनी वरनमुद न्यासासंदर्भात योजना/स्कीम दाखल केली असल्याचे नुकतेच कळुन आले आहे. सदर इसमांनी दाखल केलेले स्कीम अर्ज हा बनावट व बोगस असा आहे. त्यांना वंशपरंपरागत पध्दीतीने चालत आलेल्या न्यासाच्या संदर्भात स्कीम अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही.

४. न्यासाच्या/वक्फच्या मंजुर घटनेनुसार विश्वस्तपद हे वंशपरंपरागत असून घुडुलाल हसनसो ा इनामदार हे दि. १९.११.२०१२ रोजी मयत झालेले असून त्यांना आम्ही हरकतदार कायदेशीर सरळ वारस आहोत.

५. घुडुलाल हसनसो ा इनामदार हे मुख्य विश्वस्त (Sole Trustee) होते. त्यांच्या जागी नियमानुसार व घटनेच्या तरतुदीनुसार आम्हापैकी घुडुलाल हसनसो ा इनामदार यांचा ज्येष्ठ मुलगा फरदीन घुडुलाल इनामदार हे पदसिध्द (वंशपरंपरागत) (Hereditary) मुख्य विश्वस्त (Sole trustee) आहेत. त्याबाबतचा बदल अर्ज या मे. कार्यालयात लवकरच दाखल करीत आहोत. तथापि मुख्य विश्वस्तांच्या आपरोक्ष स्कीमअर्जदारांनी सदरचा अर्ज दिलेला असून सदरचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

<u>सुनावणी व संबंधीतांचा युक्तीवाद:-</u>

सर्व संबंधीतांना नोटीस पाठविण्यांत आलेली आहे, प्रकरणांत दि.०४.०४.२०१३, ०४.०६.२०१३, २६.०३.२०१३, ०२.०७.२०१३, ०७.०५.२०१४, १८.०२.२०१९, ०२.०३.२०१९, २६.०२.२०२२, २७.०४.२०२२ रोजी सुनावणी घेण्यांत आली.

प्रकरणांत दि. २१.०७.२००७ रोजीचे जनाब हसन महमंद अ. करीम इनामदार यांनी शपथपत्राद्वारे जनाब घुडुलाल यांचे विरूध्द खालील प्रमाणे कथन केलेले आहे.

१) अर्ज कलम २ मध्ये सदरचा ट्रस्ट वक्फ कायद्यानुसार नोंद झाल्याने अर्जदार व जाबदार नं. १ हे सदरच्या वक्फचे मुतवल्ली झालेले आहेत. सदरच्या दर्ग्याच्या जमिनीतुन दर्गाची व्यवस्था पहाणे अपेक्षीत आहे. सदरचा दर्गा अतिशय पुरातन आहे. नवीन ट्रस्टी येण्याची रित वंशपरंपरा आहे. वगैरे मजकुर, चुकिचा, खोटा, बेकायदेशीर व अनाधिकाराचा आहे. जाबदार त्याचा पुर्णत्वाने इन्कार करतात.

२) अर्ज कलम ३ मध्ये सदरच्या दर्गाची नर्व व्यवस्था देखभाल अर्जदार व तिऱ्हाईत इसम करीत आलेले आहेत, जाबदार नं. १ हे दर्ग्याची व्यवस्था पहात नाहीत व त्यांनी दुर्लक्ष केलेले आहे. जाबदार नं. १ यांना वयोमानामुळे बुध्दीभ्रष्ट झालेली आहे. त्यामुळे त्यांना त्यांचे हित, अनहित, जबाबदारी समजत नाही. वगैरे मजकुर धादं ात खोटा, साधणुकिचा, मतलबीपणाचा आहे, तो मुळ अर्जदार इसनमहमंद अ.करीम इनामदार यांना मदत करणेसाठी खुद्द हसनमहमंद अ.करीम इनामदार यांनीच तिऱ्हाईत इसमाना पुढे करून सदरचा मजकुर नमुद करणेस भाग पाडले आहे. सबब जाबदार यांना मुळीच मान्य व कबुल नाही.

३) खरी वस्तुस्थिती अशी आहे की, जाबदार नं. १ हे वक्फ चे Sole Trustee असून अशी P.T.R. उतारेस नोंद आहे. सदरील जाबदार गेली सुमारे ६०-६२ वर्षापासुन या दर्गाहची सर्वपरितो देखरेख, व्यवस्था, मुतवल्ली, मॅनेजर या नात्याने आजही करीत आलेले आहेत. या वक्फाची कोणतीही, कसल्याही प्रकारची व्यवस्था या अर्जातील मुळ अर्जदार हसनमहंमद इनामदार अगर सदरील तिऱ्हाईत इसमानी केलेली नव्हती व नाही. तसेच सदरील तिऱ्हाईत इसम या दर्गाहच्या जागेत अगर या परिसरातही राहणेस नाहीत.

सदरील तिऱ्हाईत इसम हे गेली सुमारे ५०/५५ वर्षापासुन या जाबदारपासुन विभक्त अन्य दुसररीकडे राहतात. या काळात या जाबदारची या तिऱ्हाईत इसमाना कधीही आठवण आली नाही. अगर कधीही विचारपुसही केलेली नाही, व आता या वक्फाचा व्यवस्थित चाललेला कारभार यात व्यत्यव आणुन मला या मिळकतीमधुन हाकलुन देणेसाठी या अर्जात काही मतलबीपणाचा द्वेपमुलक मजकुर नमुद केलेला आहे.

४) त्याचाच एक भाग, तिऱ्हाईत इसमापैकी नं. १ मलीक याने या जाबदारची बोगस व डुप्लीकेट सही करून मा. पोलीस आयक्त, कोल्हापुर यांचेकडे या जाबदारचे नांवे अर्ज करून माझी बुध्दी भ्रष्ट झाली आहे. अशी बतावणी केली. तसेच दिनांक १७.०१.२००९ रोजी तिऱ्हाईत इसमानी मी राहत असलेल्या घरांमध्ये गं ुड लोकांच्या मदतीने मला व जबादार नं. २ यांना बेदम मारहण करून या देवस्थानच्या मिळकतीमधुन हुसकावुन लावणेचा प्रयत्न केला, म्हणुन मी त्वरीत मिरज शहर पोलीस स्टेशनला तक्रार/वर्दी दिली, त्यानुसार पोलीसानी सदरील तिऱ्हाईत इसमांना अटक करून पोलीस व्हॅनमध्ये घालुन पोलीस स्टेशनमध्ये आणुन कडक शब्दात ताकीद दिलेली आहे.

इतकेच नव्हे तर मुळ अर्जदार हसन महंमद अ.करीम इनामदार यानेच सदरची रचना करून तिऱ्हाईत इसमांना चिथावणी देवुन दुसऱ्या दिवशी मला पुन्हा मारहण केलेली आहे व मलीक याने तुला भोसकून खलास करणार अशी भाषा बोलुन दाखवुन धमकी दिली आहे, या सर्व बाबतीत पोलीस तपास सुरू असून मलीक व फिरोजाबी यांचा पोलीस शोध घेत आहे.

५) वर नमुद केलेप्रमाणे सदरील तिऱ्हाईत इसमापासुन मला धोका असलेने जाबदार नं.२ यांनी मला संरक्षण देवुन माझी व वक्फाची व मिळकतीची रक्षा केलेली आहे. मारहणीमुळे मला औषधोपचारही जाबदार नं. २ यांनी व त्यांच्या कुटुंबियानी केला आहे.

६) वरील प्रमाणे सर्व मार्ग खुंटलेने फिरोजाबी व मलीक यांने जिल्हाधिकारी, सांगली यांचेसमोर उपोषण करणेचा प्रयत्न केला याबाबत पोलीसांनी सखोल चौकशी करून तथ्य नसलेने पोलीसानी त्यांना जिल्हाधिकारी यांचे कार्यालयाचे समोरून हुसकाबुन लावले आहे.

७) सदरील जाबदार हे शरीराने व ताब्येतीन चांगले धडधाकट असून आपल्या नित्याची सर्व कामे स्वतःचा पार पाडतात, बुध्दी भ्रष्ठ झालेली नाही, बुध्दी व विचार करणेची नैसर्गिक क्षमता चांगली आहे, कोणतीही गोष्ठ करावयाची झाल्यास पुर्ण विचार करून वाचून समजुन व सह्या वाचुन करतात.

८) रि.स.नं. १९९ व २०० या दोन्ही शेतजमिनी व त्यातील घर मिळकती म्हणजे ५३५०/१ व ५३५०/२ अशा मिळकती वक्फाच्या कब्जेत असून मुख्य व्यवस्थापक, मुतवल्ली Sole Trustee या नात्याने सदरील जबादार यानीच सदरच्या मिळकती जाबदार नं. २ यांना कसणुकीस दिलेल्या आहेत. त्याबाबत कोणतेही अतिक्रमण अगर घुसखोरी झालेली नव्हती व नाही, व कायद्यानेच होवु शकत नाही.

९) रि.स.नं. १९९ व २०० तसेच घर नं. ५३५०/१ व ५३५०/२ या सर्व मिळकती खाजगी मिळकती नाहीत, त्या सर्व वक्फच्या मिळकती आहेत. त्यामुळे या तिऱ्हाईत इसमांचा या मिळकतीशी, दर्गाहशी कायद्याने कसलाही हक्क संबंध येत नाही व येणार नाही, त्यामुळे या तिऱ्हाईत इसमांना याकामी पार्टी करून घेणेचे कारणच नाही.

१०)तिऱ्हाईत इसमांना अशा प्रकारचा अर्ज करणेचे LOCUS-STANDI नाही, सबब अर्ज चालणेस पात्र नाही, तो नामंजुर करणेत यावा.

११)जाबदार नं. २ यांनी या जबादार नं.१ यांन अगर त्यांचे कुटुंबियातील कोणीही माझे कडुन कोणतेही कसलेही बनावट कागदपत्र तयार करून घेतलेले नव्हते व नाही, अगर माझ्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव वगैरे आणलेला नाही. सदर वक्फाचा कारभार मी चांगल्या रितीने व उत्तम प्रकारे कायद्यास अनुसरून दखरेख व्यवस्था वगैरे सर्व काही करीत आहे. त्यामध्ये कोणत्याही प्रकारे गैरप्रकार अगर बेकायदेशीरपणा कधीही नव्हता व नाही.

१२)वर कलम १ ते १३ मध्ये नमुद केलेल्या कारणाचा विचार होवुन माझा (जाबदार नं. १) तिऱ्हाईत इसमाशी अगर वक्फ प्रॉपर्टी व दर्गाहशी काहीही तसेच वाद विषयाशी कोणताही हक्क हितसंबंध पोचु शक्त नाही त्यामुळे या अर्जाचे कामी थर्ड-पार्टी करून घेणेचे कोणतेही कारण नाही.

१३) सबब जबाबदार नं.१ यांची विनंती

अ. तिऱ्हाईत इसमांना सदरचा पार्टी करून घेणेचा अर्ज REJECT नामंजुर करणेत यावा.

ब. इतर अन्य न्यासाचे हुकुम व्हावेत, म्हणुन वगैरे मजकुराचे सवस्तिर म्हणणे दिले आहे, त्यातील व या ॲफिडेव्हीट मधील सर्व मजकुर खरा व बरोबर आहे.

प्रकरणांत जनाब हसन महमंद अ. करीम इनामदार यांनी दि.२०.०९.२०१३ रोजी खालील प्रमाणे कथन केलेले आहे-

वरील संदर्भातील दर्गा मिरज येथे असुन त्या दर्ग्याच्या मालकी वहीवाटीच्या रि.स.नं. ११९, २००, १६१/१, १६१/२/अ/१/अ, १६१/२/अ/२, १६१/२/अ/१+/२/ब व १६२ या अदमासे ११.२३ हेक्टर जमिनी आहेत सदर ट्रस्टचे १) श्री. हसन महंमद हसनसो ा इनामदार, २) श्री. घुडुलाल हसनसो ा इनामदादर हे दोन ट्रस्टी होत व आहेत. त्यातील श्री. घुडुलाल हसनसो ा इनामदार हे दि. १९.११.२०१२ रोजी मयत झाले आहेत. घुडुलाल हसनसो ा इनामदार व त्यांचे चुलत बंधु हसन बाबासो मुल्ला या जमिनी मधील घरामध्ये रहात होते. मे. चॅरिटी कमीशनर सो, मे. डेप्युटी चॅरिटी कमीशनरसो ा पुणे व असिस्टंट चॅरिटी कमीशनरसो ा सांगली यांनी त्या दोघावर ट्रस्टच्या मिळकतीचा अपहार करतो असे आरोप निश्चित केले आहेत. मी ट्रस्टी हसन महंमद अ.करीम इनामदार व माझा भाऊ नुर महंमद अ.करीम इनामदार असे दोघानी मिळुन ट्रस्टचे रेकार्ड निरनिराळ्या कोर्टात जानुन बरोबर करून घेतले आहे. त्यावेळी घुडूलाल हसनसो ा इनामदार यांचे सोबत त्याची बायको फैरोजाबी व मुले १) श्री. फरदीन, २) श्री. मलीक घुडूलाल इनामदार यापैकी कोणीही नव्हते. वरील जमिनीच्या भोगवटादार सदरी, इब्राहिम मुल्ला सरदारबी मुल्ला, शहजादबी मुल्ला अशी व पिक पाणी सदरी इसुब बाबासो ा मुल्ला अशी नांवे नोंद होती ती नांवे १९८० साला पर्यंत होती. ती कमी करण्याचा प्रयत्न आम्हा भावंडानी केला त्यावेळी घुडुलाल हसनसो ा इनामदार हे ट्रस्टी असूनही त्यानी त्यासाठी मदत केली नाही व इसुब बाबासो ा मुल्ला यांचे संगनमताने या जमिनीतील उत्पन्न ७/१२ वरील नोंदीचा आधार घेत अपहार करीत राहीले.

बारामाही पिकाच्या जमिनी १९० रू. खंडाने अशा पावत्या ते दाखवित राहीले. सदर मिळकतीतील १कचिंचेच्या झाडाचे उत्पन्न चार ते पांच हजार येते याची जरादेखील जाणीव त्यानी ठेवली नाही. इसुब बाबासो ा मुल्ला यांचे पीक पाण्यावरल नांव मे. अप्पर आयुक्तासो ा पुणे यांचे निकालानंतर २००२ साली कमी झाले तरी पण हसनसो ा इनामदार यांच्या आडोशाने त्यांच्या मृत्यु पर्यंत सदर जमिनीतील मिळकती तो हडप करीत राहीला.

आज त्याचा मुलगा सुलेमान इसुब मुल्ला, आपल्या कडे, आपल्या चार साथीदारासह वक्फ अधिनियम १९९५ कलम ३२, ६९ अन्वये केस क्र. ३२(६९)/९४/२०१३ दाखल करून राहीला आहे. केस क्र. मरावंम/चौकशी/३१६/८७५/२०१३. यातील सर्वजण १) सुलेमान इसुब मुल्ला, २) आसीफ अ. रहेमान शेख, ३) गैबीसो ा महीबुब मुजावर, ४) आयुब अ.कादर नालबंद, यांचा या ट्रस्टची कसल्याही प्रकारचा संबंध नाही. सदर ट्रस्ट हा आमच्या कुटंुबा मध्ये पुरातन काळापासुन चालत आला आहे. आमच्या वंशखेरीज या मध्ये कोणीही ट्रस्टी बनु शक्त नाही. याची नोंद PTR सदरी असून मे. डेप्युटी कमीशनर मंुबई यांच्या दि.१५.१०.१९७६ च्या निकालात मे. एक्ट्रा असिज्ज सांगली यांच्या दि.३०.०७.१९७९ च्या निकाला प्रमाणे मे. हायकोर्ट मुंबई यांनी दि. ०१.०७.१९८३ रोजी दिलेल्या निकालाने त्यावर शिक्का मोर्तब झाले आहे.

असे असताना आपल्या ऑफीस कडुन केस क्र. मरावंम/चौकशी/३१६/८७५/२०१३ दाखल करून घेतला गेला हे आश्चर्य आहे. PTR सदरी असणाऱ्या नोंदी डावलुन आमच्या कुटुंबाच्या मुलभुत हक्कावर हा एक प्रकारचा धालोच आहे, कोणीही उठावे व स्कीम दाखला करावी व ती करवुन ध्यावी हे कायद्याचे सरळ सरळ उल्लघन आहे.

सदर ट्रस्टशी सुलेमान इसुब मुल्ला ज्याच्या वडीलाने गेली ३० वर्षा अपहार कले ा कसलाही संबंध नाही, त्याच प्रमाणे आसीफ अ. रहेमान शेख, गैबीसो महीबुब मुजावर, आयुब अ.कादर नालबंद यांचाही काडीमात्र संबंध नव्हता व नाही.

या ट्रस्टच्या पाच एकर व्यतिरिक्त २३ एकर जमिनीची केस रेग्युलर सिव्हील अपील २५७/४ हि सांगली कोर्टामध्ये अंतिम सुनावणीस नंबरला आहे, त्यामुळे ट्रस्टला भरपुर जमिनी येणार आहेत, यांची चाहुल वरील चौघाना आहे म्हणुन येण केन प्रकारे स्कीम दाखल करण्याचा त्याचा पुसका प्रयत्न आहे.

तरी मेहरबाना कडे विनंती की, त्यांना कोणत्याही प्रकारे सदर ट्रस्टच्या कारभारात हस्तक्षेप करण्यास प्रतिबंध करणेत यावा.

श्री. घुडूलाल हसनसो इनामदार यांची बायको फैरोजबी मुले फरदीन, व मलीक घुडुलाल इनामदार यांना घुडुलालच्या मृत्युने संधी मिळाली आहे, त्यानीही विनासायास या जमिनीच्या ७/१२ सदरी आपली नांवे महसुल कर्मचारी तलाठी व सर्कल मंडल अधिकारी यांच्या संगमनमताने पैशाचा वापर करून लावुल घेतली आहे. त्यासाठी उपजिल्हाधिकारी प्रांतसो ा यांचेकडे रितसर अर्ज ट्रस्टी म्हणुन हसन महमंद अ.करीम इनामदार यांनी केली आहे. सदर फेरे ाजबी हिने महीला बाल कल्याण कड अर्ज करून घुडुलाल यांचे ७/१२ वरल नांव दाखवुन दुसरे ट्रस्टी म्हणुन माझ्ी सम्मती न घेता बाल कल्याण कडुन तीन राहत्या खोल्या तिच्या वैयक्तीक कारण्यासाठी सील करवून घेतल्या आहेत. यामध्ये कोर्टाची दिशाभुल केली आहे.

याची रितसर माहिती आपणाकडे पाठविलेली आहे, महाशयाकडे विनंती की, श्री. आसीफ अ. रहेमान शेख यांच्या कारवाया थांबाव्यात म्हणुन योग्य दखल घ्यावी तसचे फैरोजबी व त्यांची मुले याच्या कारवाई लावण दुर करण्यास योग्यते आदेश घ्यावेत. हि विनंती.

प्रकरणांत जनाब हसन महमंद अब्दुल करीम इनामदार मिरज यांनी जनाब घुडुलाल हसन इनामदार (मयत) वारस श्रीमती फैरोजाबी भ्र. घुडूलाल इनामदार फरद्दीन, मलीक पिता घुडुलाल इनामदार यांचे विरूध्द आर.टी.एस. अपील नं. २७३/२०१३ अन्वये मिरज येथील मे. उपविभागीय अधिकारी सो/- यांचे न्यायालयात महाराष्ट्र लॅन्ड रेव्हेन्यु कोड कलम २४७ अन्वये सदर संस्थेच्या संबंधीत असलेली वक्फ मिळकतीत फेर क्र. ४७२७० अन्वये घेतलेली नोंद रद्द करण्यांत यावी असा विनंती.

प्रकरणांत दि. २५.०३.२०१३ रोजी रूपये ३००/- च्या स्टॅम्प पेपर क्र. जी.आर ६८५५९९ वर जनाब युसूफ बाबासाहेब मुल्ला, रा. मिरज, यांनी प्रतिज्ञापत्र देवुन असे निदर्शणांस आणून दिले की, मी सदर संस्थेची जमिन मागील ५० ते ६० वर्षापासुन विश्वस्ता कडुन खंडावर घेतलेली आहे. सदर संस्थेचे नविन विश्वस्तांची निवड झाल्यास मी सदर जमीन वक्फ संस्थेस परत देण्यास तयार आहेत.

प्रकरणांत विविध गैरअर्जदारं ानी वेळोवेळी सक्षम प्राधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यांत आलेली आहे त्याचे प्रति संचिकेत आहेत.

प्रकरणांत जनाब घुडूलाल हसन साहेब इनामदार (विश्वस्त) यांनी दि.०३.०६.२००९ रोजी पोलीस आयुक्त, कोल्हापुर, जिल्हाधिकारी सांगली, पोलीस अधिक्षक, सांगली यांना अर्ज करून जनाब हसन महमंद अ. करीम इनामदार यांच्या विरूध्द गं ुडगिरी, दमदाटी, दादागिरी व धमकी याचा बंदोबस्त होणे बाबत तक्रार अर्ज दिला आहे त्याची प्रत संचिकेत आहे प्रथम तपास अहवाल (FIR) क्र. ७७ ची प्रत ही जोडलेली आहे.

जनाब हसन महमंद इनामदार यांचा अर्ज दि. १२.०९.२००७ अन्वये तक्रार केल्याप्रमाणे जनाब घुडूलाल हसन, युसूफ बाबासाहेब मुल्ला यांचे विरूध्द प्रकरणांत वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ५४(१) नुसार या कार्यालयाचे केस क्र. ५४/३२/२००७ मध्ये नोटीस क्र.

मरांवम/चौकशी/१६३२२/२००७ दि. ०५.१२.२००७ अन्वये नोटीस देवुन दि. २९.१२.२००७ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती प्रकरणांत अद्याप निर्णयही झालेला नाही.

**ठराव क्रमांक १२:-** हजरत पिर शकर गंज रहे दर्गा, मिरज, ता. मिरज, जि. सांगली या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी श्री. आसिफ शेख व श्री. हसन इनामदार यांनी योजना मंजुरीचा प्रस्ताव सादर केला आहे. तसेच श्री. एफ. जी. इनामदार यांनी कलम ४२ नुसार फेरबदल अर्ज दाखल केला आहे.

धर्मादाय आयुक्त यांच्या कडील शेडयुल-१ नुसार सदर वक्फ संस्थेकरिता व्यवस्थापन समितीची नियुक्ती वंशपरंपरागत पध्दतीने करावयाचे आहे. तथापी सदर संस्थेच्या व्यवस्थापनासाठीची सविस्तर योजना अद्याप मंजूर करण्यात आलेली नाही.

सदर वक्फ संस्थेवर योग्य व्यवस्थापन समितीची नियुक्ती करण्यासाठी वक्फ मंडळाने तयार केलेली आदर्श योजना (Model Scheme) मंजूर करुन त्यानुसार विश्वस्थ समिती निवडण्यात यावी.

विश्वस्थ समितीची निवड होई पर्यंत सदर वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या रास्त निगराणीखाली घेऊन त्यावर तात्पुरती व्यवस्थापन समितीची नियुक्ती करण्यात यावी.

तात्पुरती व्यवस्थापन समिती गठीत करण्यासाठी प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांनी विविध पाच क्षेत्रातील (सामाजिक, विधी तज्ञ, वार्ताहार, मुस्लीम स्कॉलर व क्रिडा ) प्रत्येक क्षेत्रातून किमान ३ नावे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालयास सादर करावी. सदर नावे वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव पुढील बैठकीस सादर करण्यात यावे.

विषय क्रमांक १३:-

## महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ व ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश

संचिका क्र. ६९/२८/२०१५ व ४२/२९७/२०१२
व ४२/११५/२०२० व ४२/११९/२०२०

सय्यद बडे साहाब पापामिया जागिरदार
रा. कोठला ता.जि. अहमदनगर ----- अर्जदार

विरूध्द

सय्यद इलियास इसामोद्दीन पिरजादे व इतर २
रा. कोठला ता.जि. अहमदनगर ----- गैरअर्जदार

विरुध्द

सैय्यद निसार बडेसाब जहागिरदार
रा. कोठला ता. जि. अहमदनगर ----- गैरअर्जदार

प्रकरण - दर्गाह हजरत पिर बारा इमाम ट्रस्ट, कोठला, अहमदनगरच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ व ४२ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.

नोंदणी क्र. MSBW/ADR/१३३/२००८ चॅरिटी कशिमन रजि. B-११६ ADR

**प्रारंभिक - (विवेचन)**

दर्गाह हजरत पिर बारा इमाम ट्रस्ट, कोठला, अहमदनगर ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW//ADR/१३३/२००८ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार सय्यद बडे साहाब पापामिया जागिरदार, रा. कोठला ता.जि. अहमदनगर यांनी दिनांक ०५/०९/२०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपना करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावित योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे.

सदर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या बदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये श्री. सय्यद निसार बडे साहेब रा. कोठला, अहमदनगर यांनी दि. ०३/०७/२०२० रोजी फेरफार अर्ज दाखल केलेला आहे.

सय्यद इलियाज इसामोद्दीन पिरजादे रा. कोठला, अहमदनगर यांनी नवीन दुसरा फेरफार अर्ज संचिका क्र. ४२/११९/२०२० दि. ०२/०७/२०२० रोजी सदर संस्थेच्या व्यवस्थापन समिती करिता दाखल केलेला आहे.

अर्जदारांनी सादर केलेल्या अर्जाची पडताळणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणासंबंधीत सर्व कागदपत्राची पुर्तता अर्जदारांनी केली आहे.

सदर प्रकरण हे वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ व ४२ अन्वये व्यवस्थापन समितीची एक प्रस्तावित योजना व दोन फेरफार अर्ज दाखल झाल्यामुळे योजना व फेरफार अर्ज मंजुर करण्यापुर्वी प्रादेशिक वक्फ अधिकारी, नाशिक विभाग नाशिक, यांच्या कडुन सदर संस्थेची चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याकरिता या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मेरावम/चौकशी/२०२८/२०२० दि. ०७/०९/२०२० अन्वये पाठविण्यात आले व त्याच्या कडुन वरिल प्रकरणात व्यवस्थापकीय विश्वस्ताबाबत स्वंयस्पष्ट अहवाल व नविन विश्वस्त घेण्याचीरित या बाबत अहवाल मागविण्यात आला होता त्यानुसार प्रादेशिक वक्फ अधिकारी नाशिक यांनी त्यांचे पत्र जा.क्र. चौकशी/१२१/२०२० दि. ०५/१०/२०२० अन्वये अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालात त्यांनी असे नमुद केले आहे की दर्गाह हजरत पिर बारा इमाम ट्रस्ट, कोठला, अहमदनगरची व्यवस्थापन समिती व फेरफार मंजुरीबाबतचा अहवाल तसेच त्यांनी स्थळ पाहणी व चौकशी करिता दि. २२/०९/२०२० रोजी घटना ठिकाणी भेट दिलेली होती. चौकशी दरम्यान त्यांनी दोन्ही अर्जदारांची भेट घेऊन त्यांचे जवाब नोंदविले.

कलम ४२ चे अर्जदार सय्यद इलियाज इसामोद्दीन पिरजादे यांनी त्यांचे जवाबात असे कथन केले की, वरिल वक्फ संस्थेमध्ये पुर्वी ५ ट्रस्टी होते. वरिल पैकी ४ विश्वस्तांचा मृत्यु झ ालेला आहे आणि एक विश्वस्ताने राजीनामा दिलेला आहे. वरिल संस्थेचे देखरेख व दिवाबती ट्रस्टी नसताना दस्तगीर बडे साहाब जागीरदार व रफा सय्यद अली हे अनाधिकृत पणे वरिल संस्थेची सेवा करित आहे. संस्थेच्या मिळकतीमध्ये ब-याच लोकांनी अतिक्रमण केलेले आहे. धर्मादाय आयुक्त यांच्या कडुन मंजुर झालेल्या घटनेच्या परिच्छेद क्र. ०९ नुसार वक्फ बोर्डा कडुन संस्थेचे फेरफार मंजुर करणे योग्य होईल.

अर्जदार सय्यद निसार दस्तगीर बडे साहाब जागिरदार यांनी असा जवाब दिला की, वक्फ संस्थेच्या मंजुर घटना प्रमाणे नविन ट्रस्टी घेण्याची रित हि जुन्या कार्यरत विश्वस्तांस आहे. जुन्या विश्वस्ता पैकी सय्यद बडेसाहाब हे हयात असतांना दि. १४/०१/२०२० रोजी ठराव घेऊन नविन विश्वस्तांची निवड केली. व त्यानंतर माझे वडिल दि. ०२/०३/२०२० रोजी मृत्यु झाल्याने आम्हाला नविन फेरफार दाखल करण्यास उशिर झाला. व संपुर्ण राज्यात लॉकडावुन मुळे आम्हाला वक्फ कार्यालयात येता आले नाही. व नंतर कार्यलय चालु झाल्यानंतर दि. ०३/०७/२०२० रोजी फेरफार अर्ज दाखल केला व त्यानंतर आमचे विरोधी सय्यद इलियास यांनी पण त्यांचा फेरफार अर्ज दाखल केला त्यानंतर आम्ही दि. ०२/०९/२०२० रोजी इलियाजचा अर्ज चुकीचा असल्यामुळे आक्षेप दाखल केले. विभागीय वक्फ अधिकारी यांनी घटने ठिकाणचा पंचनामा व जवाब दाखल केले आहे.

<u>अर्जदार सय्यद दस्तगिर बडेसाहाब यांचा इलियास यांच्या फेर अर्जाला आक्षेप -</u>

अर्जदार यांनी दि. ०३/०९/२०२० रोजी अर्ज देऊन असे म्हटले आहे की, वरिल संस्थेचा सर्व कार्यभार व व्यवस्थापन सय्यद बडेसाहाब यांच्याकडे होती. तसेच जुन्या ट्रस्टीने सरव्हायवींग ट्रस्टीने नविन ट्रस्टीची निवड करायची असते त्यानुसार बडेसाहाब हे दि. ०२/०३/२०२० रोजी मृत्यु झालेले आहे. त्यांनी त्यांच्या हयातीमध्ये नविन ट्रस्टीची निवड केलेली आहे. ते एकच जुन्या ट्रस्टी पैकी एकमेव ट्रस्टी हयात होते म्हणुन त्यांना नविन ट्रस्टी निवड करण्याचा अधिकार होता. त्यानुसार नविन फेरफार अर्ज दाखल केलेला आहे. आमच्या फेरला इलियास यांनी आक्षेप घेतला त्याला संस्थेमध्ये ट्रस्टी म्हणुन कधीही निवडलेले नाही तो आमच्या ट्रस्टचा भाडेकरु आहे व भाडेकरुस ट्रस्टच्या व्यवस्थापनात अस्ताक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही हे वक्फ कायदयात स्पष्ट नमुद केलेले आहे सबब त्याचा अर्ज नामंजुर करण्यात यावा.

<u>गैरअर्जदार यांचा युक्तीवाद -</u>

अर्जदार यांनी दि. ०९/११/२०२१ रोजी लेखी युक्तीवादात असे कथन केले आहे की, त्यांचे वडिल बडेसाहाब यांनी दि. १५/०१/२०१५ रोजी योजना दाखल केली आहे. हरकतदाराने दि. २०/०२/२०१८ रोजी त्यास हरकत घेतलेली आहे. १९५४ साली संस्थेच्या नोंदणी नंतर एकुण ५ विश्वस्त नेमण्यात आले होते. त्यापैकी अर्जदार यांनी दि. ०७/११/२००८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे कलम ७० अन्वये तक्रार दाखल केली. सदर प्रकरण नामंजुर करण्यात आलेले आहे. त्या विरुध्द वक्फ न्यायाधिकरणाकडे अर्ज दाखल केला. तो अर्ज देखील नामंजुर करण्यात आला त्या नंतर त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली सदर प्रकरण तेथे प्रलंबीत आहे. श्री. सय्यद बडेसाहाब हे बेकादेशीरपणे संस्थेचे कार्य करित होते त्यांनी संस्थेच्या उत्पन्नाचे अपहार

केलेले आहे. वरिल सर्व परिस्थितीचा विचार करुन व त्यांचा अर्ज नामंजुर करण्यात यावा व इलियास यांचा अर्ज फेरबदल मंजुर करण्यात यावा.

**ठराव क्रमांक १३:-** दर्गाह हजरत पिर बारा इमाम ट्रस्ट, कोठला, अहमदनगर या वक्फ संस्थेकरिता धर्मदाय आयुक्त यांनी सन १९८१ मध्ये योजना मंजूर केली असून त्यामधील तरतुदीनुसार कार्यरत विश्वस्थ हे नविन विश्वस्तांची निवड करतील अशी तरतुद आहे. सदर योजना रद्द करणे बाबत कोणतेही ठोस कारण वक्फ मंडळाच्या निदर्शणास आले नाही. श्री. सय्यद इलियास पीरजादे हे धर्मदाय आयुक्त यांनी मंजूर केलेल्या योजने मध्ये /फेरबदल आदेशा मध्ये विश्वस्त नसल्याने त्यांना कलम ४२ अन्वये फेर बदल अर्ज दाखल करण्याचा अधिकार नाही. यास्तव त्यांचा फेर बदल अर्ज रद्द करण्यात येत आहे.

धर्मादाय आयुक्त यांनी मंजूर केलेल्या योजने मधील विश्वस्त श्री. सय्यद बडे साहब पापा मिया जहागीरदार (मयत) यांनी सादर केलेल्या फेर बदल अर्जामध्ये श्री. सय्यद निसार जहागीरदार यांचा समावेश असल्याने श्री. सय्यद निसार यांनी दाखल केलेल्या फेर बदल अर्जास मंडळाची मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक १४:-**

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर**

**आदेश**

संचिका क्र. ६९/४४/२०१८

शेख मुजीबोद्दीन शेख शमशोद्दीन व इतर ११
रा. रांजनी ता. घंनसागवी, जि. जालना

----- अर्जदार

विरूध्द

तैसीफ अहमद सुल्तान अहमद इतर ३
रा. जालना, ता.जि. जालना

----- गैरअर्जदार

अहमद अनीस हामीद महेमुद
रा. जालना ता.जि. जालना

----हरकतदार

जहिरुद्दिन सैफुद्दिन फारुकी
रा. जालना, ता.जि. जालना

----हरकतदार

प्रकरण - दर्गाह हजरत जानुल्ला शाह व खानका मस्जिद जालनाच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.

नोंदणी क्र. MSBW/JLN/१०९/२०१२

प्रारंभिक - (विवेचन)

दर्गाह हजरत जानुल्ला शाह व खानका मस्जिद जालना ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW JLN/१०९/२०१२ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जादार शेख मुजीबोद्दीन शेख शमशोद्दीन व इतर ११, रा. रांजनी ता. घंनसागवी, जि. जालना यांनी दिनांक ०३/०१/२०१८ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपना करतात, सुरुवाती पासुन सदर वक्फ संस्थेस कोणत्याही प्रकारची योजना नसल्याने त्यांनी सदरचा योजना अर्ज दाखल केलेला आहे. तसेच योजना मंजुरीला बराच कालावधी लागणार असल्याने तात्पुरत्या स्वरुपात ॲडह ाक कमेटी नेमणूकी बाबत विनंती केलेली आहे.

अर्जदारांनी सादर केलेल्या अर्जाची पडताळणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणासंबंधीत सर्व कागदपत्राची पुर्तता अर्जदारांनी केली आहे

सदर अर्जदाराचा योजना मंजुरीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर या कार्यालयाचे पत्र जा.क्र. १९८२/२०१८ दि. १९/०५/२०१८ अन्वये जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांना पाठवुन त्याच्या कडुन वरिल प्रकरणात व्यवस्थापकीय विश्वस्ताबाबत स्वंयस्पष्ट अहवाल व नविन विश्वस्त घेण्याचे रित या बाबत अहवाल मागविण्यात आला होता त्यानुसार जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी त्यांचे पत्र जा.क्र. चौकशी/४०५/१८ दि. २५/०५/२०१८ अन्वये अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालात त्यांनी असे नमुद केले आहे की दर्गाह हजरत जानुल्ला शाह जालनाची व्यवस्थापन समितीबाबतचा अहवाल दि. ०५/०२/२०१३ रोजी सादर केलेला आहे सदरील प्रस्ताव प्रलंबीत आहे या बाबत कार्यवाही करण्यासाठी दि. २२/०५/२०१७ रोजी दुरुस्ती प्रस्ताव मान्यतासाठी विनंती केली आहे खूददाम कमेटीचे माजी चेअरमन मोहम्मद जियाओदीन यांनी नवीन खूददाम व्यवस्थापन समिती स्थापन संबंधी एक ठराव दि. ११/११/२०१२ रोजी आम सभा घेण्यात आली व दर्गाह परिसरातील लोकांनी आम सभेत आपले मत दर्शविले आहे तसेच नविन विश्वस्त घेण्याची रित बद्दल त्यांनी त्यांच्या अर्जात नमुद केलेले आहे. जिल्हा वक्फ अधिकारी जालना यांनी कलम ६९ अन्वये योजना मंजुर करण्या करिता दि. १८/१२/२०२०च्या दैनिक राजसमार्ट या वृत्तपत्रात जाहिरात देऊन याची एक प्रत वक्फ संस्थेच्या बोर्डावर डकविण्यात येऊन त्याचा फोटो काढण्यात आलेला आहे तसेच त्यांनी सोबत पंचमाना व जाहिर नोटीसचे फोटो सादर केले आहे.

१. हरकतदार - श्री.अहमद अनीस हामेद महेमुद यांचे हरकत -

हरकतदार यांनी दि. ०३/०८/२०२१ रोजी हरकत अर्ज दाखल केलेला आहे त्यांनी त्यांच्या अर्जात असे नमुद केले आहे की सदर संस्थेचे खादीम म्हणुन मंडळाने नियुक्ती केलेले पेशइमाम व मोआजीम हे खिदमत कार्य करीत आहे. समितीची गठणन चौकशीची कोणतीही माहिती दिलेली नाही. जिल्हा वक्फ अधिकारी दि. २७/०१/२०२१ रोजी सादर केलेलार अहवाल

बेकायदेशीर आहे. या वक्फ संस्थेवर अशा प्रकारचे समितीचे गठण योग्य नाही जे डॉ. जाकीर नाईक यांच्या विचार धाराचे आहे व ते सुफीसंताच्या विचार धाराच्या लोकांचे भावनेला ठेच पोहचत आहे. सबब सदर योजना मंजुरीला आमची हरकत आहे.

२. हरकतदार - जहीरदयोदीन सैफीदयोदीन फारुकी यांचे हरकत -

अर्जदार यांनी दि. २४/०६/२०१९ रोजी हरकत दाखल करुन असे नमुद कले आहे की ते सदर संस्थेचे खादीम व मुजावर आहे व दर्गाहची सेवा मुजावर या नात्याने आज पर्यंत करीत आहे अर्जदाराने दाखल केलेली योजना ही पुर्णतः खोटी व बनावट असुन ती फेटाळण्यात यावी. योजना दाखल केलेले अर्जदार हे जालना मध्ये राहत नाही व त्यांचा सदरील दर्गाह संबंधीत कोणताही संबंध नसुन ते लालसे पोटी व्यवस्थापनामध्ये येऊ पाहत आहे सबब व्यवस्थापन समिती योजनेचा अर्ज ना मंजुर करावा.

अर्जदाराचा युक्तीवाद :-

अर्जदाराने असे कथन केले आहे की या पूर्वी सदर संस्थेची कोणतीही योजना मंजूर झालेली नाही करिता त्यांनी नवीन योजना दाखल केलेली आहे ती मंजूर करण्यात यावी. तसेच हरकतदार जहीरोदीन सैफोदीन फारुकी हे पुर्वी सदर संस्थेमध्ये स्वच्छतेचे काम करत होते. ते संस्थेच्या कामात ढवळाढवळ करित होत म्हणुन त्यांना नोटीस दिली असता त्यांनी त्यांची चुक कुबुल केली होती व तसा त्यांनी माफीनामा लिहुन दिला होता परंतु त्यांनंतर देखील ते कोर्ट कचे-याच्या केसमध्ये गुंतलेले होते व त्यांचे कट कारस्थान चालूच होते सबब त्यांनी आक्षेप दाखल केले आहे. तसेच इमाम व इतर लोकांनी मशीदीच्या नावावर लाखो रुपय लोंकांकडुन जमा केले होते त्यांसंबंधीत एकुण ३२ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. योजना मंजुर झाल्यानंतर त्यांचे काळेकर्तुत बाहेर काढण्यात येतील या भिती पोटी त्यांनी सदर आक्षेप दाखल केलेला आहे त्यांना आक्षेप दाखल करण्याचा कोणताही अधिकार नाही सबब त्यांचा आक्षेप अर्ज नामंजुर करण्यात यावा.

गैरअर्जदार श्री. तैसीफ अहमद सुल्तान अहमद यांची योजना बददल यूक्तीवाद -

दि. ०९/०८/२०१७ रोजी गैरअर्जदार यांनी अर्ज देऊन असे सांगितले आहे की, दर्गाह हजरत जानुल्ला शाह जालन्याची सेवा इनाम मिळकत सर्वे नं. २३२ मध्ये अनधिकृतपणे के.जी.एन फंक्शन हॉल बांधण्यात आलेला आहे. सदरील हॉलचे भाडे अनाधिकृतपणे काही लोक वसुल करतात या बाबतची माहिती व उत्पन्नाची कोणतीही माहिती जिल्हा वक्फ अधिकारी जालना किंवा वक्फ मंडळ औरंगाबाद यांच्याकडे नाही. सदरील जागा दर्गाहची असुन यामध्ये गैरव्यवाहार चालु आहे आणि या फंक्शन हॉलची समिती मंजुर करण्यासाठी काही लोक कार्यवाही करीत आहे. तरी विनंती की सदरील जागेवर बांधलेले फंक्शन हॉल वक्फ मंडळाने आपल्या ताब्यात घेऊन याची देखरेख मंडळाकडु होऊन वरच्या मंजल्यावर जिल्हा वक्फ अधिकारी यांचे कार्यलयासाठी जागा उपलबंध करुन देणे योग्य होईल.

**ठराव क्रमांक १४:-** **दर्गाह हजरत जानुल्ला शाह व खानका मस्जिद जालनाच्या या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापने बाबत श्री. मुजीबुद्दीन शेख शमशोद्दीन व इतर यांनी कलम ६९ अन्वये योजना दाखल केली आहे. सदर योजनेस**

आक्षेप प्राप्त झाल्याने हरकतदारांची सुनावणी आयोजित करण्यात आली होती.

सदर सुनावणी अंती योजना दाखल करावयाच्या कार्यपध्दती मध्ये कोणतीही त्रुटी असल्याचे दिसून आले नाही. सबब प्रस्तुत प्रकरणी श्री. मुजीबुद्दीन शेख व इतर यांनी दाखल केलेल्या योजनेस वक्फ मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे.

विषय क्रमांक १५:-

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ व ४२ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश**

**संचिका क्र. ६९/१६६/२०२१ व ४२/३७०/२०१५**

जफर खान जोरावर खान व इतर ११
रा. काजीपुरा गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद ----- अर्ज़दार

विरूध्द

मोहम्मद इम्रानूल्लाह सिद्दिकी
रा. मिल कॉनर जि. औरंगाबाद ----- गैरअर्जदार

वाहेद अली मुमताज अली -----तक्रारदार

प्रकरण - जामा मस्जिद, काजीपुर गंगापुर, जि.औरंगाबादच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ व ४२ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.
नोंदणी क्र. MSBW/ABD/१४३/२००९

प्रारंभिक - (विवेचन)

जामा मस्जिद, काजीपुर गंगापुर, औरंगाबद ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/ABD/१४३/२००९ असा आहे. सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या प्रस्तावित योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार जफर खान जोरावर खान व इतर ११, रा. काजीपुरा गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद यांनी दिनांक २२/०४/२०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपना करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावीत योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे. अर्जदार हे मुळ मुतवल्ली यांचे वारस तसेच नातु आहे व त्यांची योजना मंजुर करण्यास कोणाचीही हरकत नाही. संस्थेचे नमाजी नागरिकानी दि. २६/०३/२०२१ च्या आमसभेतील

ठरावानुसार अर्जदाराची मुतवल्ली म्हणुन नियुक्तीला मान्यता दिलेली आहे. वक्फ संस्थेला कोणतीही योजना नसल्यामुळे सदरची योजना दाखल केलेली आहे.

सदर संस्थेच्या व्यवस्थापन समितीच्या बदल अर्ज वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ४२ अन्वये श्री. मोहम्मद इम्रानूल्लह सिद्दिकी, रा. मिल कॉर्नर, जि.औरंगाबाद यांनी दि. २७/०५/२०१५ रोजी फेरफार अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदारांनी सादर केलेल्या अर्जाची पडताळणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणासंबंधीत सर्व कागदपत्राची पुर्तता अर्जदारांनी केली आहे.

सदर प्रकरण हे वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ६९ व ४२ अन्वये व्यवस्थापन समितीची एक प्रस्तावीत योजना व फेरफार अर्ज दाखल झाल्यामुळे योजना व फेरफार अर्ज मंजुर करण्यापुर्वी दि. २२/०९/२०२१ च्या दैनिक नवभारत टाईम मध्ये कलम २१ अन्वये जाहिरनोटीस निर्गमित करण्यात आली होती तसेच या पत्राची एक पत्र वक्फ संस्थेच्या नोटीस बोर्डावर लावण्यात आली होती. सय्यद मुसतकीम सय्यद कय्युम दि. ११/१०/२०२१ रोजी त्यांच्या अहवाला सह पंचनामा व वृत्तपत्राची एक प्रत दाखल केलेली आहे.

<u>अर्जदाराचे जफर खान जोरावर खान यांचे म्हणणे -</u>

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या प्रस्तावित योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार जफर खान जोरावर खान व इतर ११, रा. काजीपुरा गंगापुर, ता. गंगापुर, जि. औरंगाबाद यांनी दिनांक २२/०४/२०२१ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपना करतात. वक्फ संस्थेच्या उज्ज्वल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावीत योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे. अर्जदार हे मुळ मुतवल्ली यांचे वारस तसेच नातु आहे व त्यांची योजना मंजुर करण्यास कोणतेही हरकत नाही. संस्थेचे नमाजी नागरिकानी दि. २६/०३/२०२१ च्या आमसभेतील ठरावानुसार अर्जदाराची मुतवल्ली म्हणुन नियुक्तीला मान्यता दिलेली आहे. वक्फ संस्थेला कोणतीही योजना नसल्यामुळे सदरची योजना दाखल केलेली आहे. सबब योजनेला मान्यता देण्यात यावी हि विनंती.

<u>हरकतदार इम्रानूल्लह यांची योजनेला हरकत-</u>

दि. १२/०४/२०२१ रोजी योजनेला हरकत दाखल केले आहे. व असे नमुद केले आहे की, ते संस्थेचे वंशपंरपरागर मुतवल्ली आहे संस्थेचे व्यवस्थापन ते करतात. तसेच पेश इमाम, मॉजन यांचे पगार ते ब-याच दिवसापासुन करतात म्हणजे त्यांचे वडील दि. २४/१२/२००९ ला मृत्यु झ ाले तेव्हा पासुन ते वेळोवेळी देतात. न्यायालयाने त्यांच्या वडिलाला दावा क्र. ४२२/८९ मध्ये वंशपंरपरागत मुतवल्ली घोषित केले होते. त्या निकाला कोणीही आव्हान दिले नव्हते अर्जदाराने फेर दाखल केलेला आहे. तसेच नियम असा आहे की, जर वंशपंरपरागत रित असेल तर वक्फ मंडळाला व्यवस्थापन समितीची नेमणुक करता येत नाही. सबब योजनेचा अर्ज रद्द करावा व त्यांचा फेरफारचा अर्ज मंजुर करावा.

<u>योजनेमध्ये तक्रारदार वाहेद अली मुमताज अली यांची हरकत-</u>

दि. २४/०२/२०२२ रोजी हरकतदाराने असे कथन केले आहे की, योजने मान्यतासाठी दिलेला अर्ज बेकायदेशीर असुन चुकीची माहितीच्या आधारे दाखल केले आहे. मुळ इनामदार हे वंशपंरपरागत मुतवल्ली असतांना हेतूपूरस्सर सदरचा योजनेचा अर्ज दाखल केलेला आहे. सदर अर्ज मेनटेनेबल नसल्याने तो फेटाळण्यात यावा. तक्रारदार वंशपंरपरागत मुतवल्ली व इनामदार असताना व तो सेवा बजावत असतांना मस्जिद गंगापुरचे मॅनेजीग कमेटी तयार करुन दाखल केलेले योजनेस मान्यता मिळुन घेण्याचा अर्जदाराचा कट आहे. तक्रारदार मागील पाच वर्षापासुन दरवर्षी दिवाबत्ती पोटी पाच हजार प्रमाणे खालीद नहादी चाऊश यांच्याकडे रक्कम देत आहे. अशा परिस्थितीमध्ये योजना मंजुरीचा अर्ज फेटाळण्यात यावा.

**ठराव क्रमांक १५:-** जामा मस्जिद, काजीपुर गंगापुर, जि.औरंगाबाद या वक्फ सस्थेसाठी अर्जदार श्री. जफर खान जोरावर खान व इतर यांनी कलम ६९ अन्वये दाखल केलेल्या योजने मध्ये निवडणुकीची तरतुद आहे. हरकतदारांनी ते वंशपरंपरागत मुतवल्ली असल्या बाबत कोणतेही पुरावे दाखल केले नाही. सबब हरकत अर्ज व फेर बदल अर्ज फेटाळण्यात यावा. कलम ६९ अन्वये प्राप्त एकमेव योजना मंजूर करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक १६:-**

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६३ तसेच ६९ अंतर्गत तसेच मा. उच्च न्यायालयाच्या CRA २२/२०१८ मधील आदेशानुसार झालेल्या सुनावणी नंतरचा आदेश**

**संचिका क्र. ६९/४९/२०१५**

सलीम अब्दुल कादर शेख
रा. पुणे, जि. पुणे ----- अर्जदार

विरूध्द

शरफोददीन शमशुददीन उर्फ रोशन दिलशान सरगूरू
रा. पुणे, जि. पुणे

----- हरकतदार

विरुध्द

अय्याज अब्दुल कादर शेख व इतर ५
रा.भवानीपेठ, जि. पुणे ----- अर्जदार

शरफोददीन शमशुददीन उर्फ रोशन दिलशान सरगूरू
रा. पुणे ता. जि. पुणे -----हरकदार

प्रकरण -अंगड शाह तकीया व आशुरखाना, भवानी पेठ, पुणे या वक्फ संस्थेच्या दैंनदिन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६३ नुसार मुतवल्ली घोषित करणे कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे तसेच मा.

**उच्च न्यायालयांच्या सी.आर.ए. २२/२०१८ मधील आदेशानुसार झालेल्या सुनावणीनंतरच्या आदेश बाबत.**
**नोंदणी क्र.. MSBW/PUN/६७/२००८**

प्रारंभिक (विवेचन) -

अंगड शाह तकीया व आशुरखाना, भवानी पेठ,पुणे ही संस्था मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा वक्फ मंडळ,औरंगाबाद येथे नोंदणी क्र. MSBW/PUN/६७/२००८ असा आहे.

सदर संस्थेची पुर्वी धर्मदाय आयुक्त यांच्याकडे नोंदणी होवुन त्यास नोंदणी क्रमांक बी-३५७ पुणे असा दिलेला आहे

सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ चे कलम ३७ अन्वये वक्फ नोंद पुस्तक अनुसुची १ मध्ये घेण्यात आली आहे.

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशासनाकरिता अर्जदार सलीम अब्दुल कादर शेख रा. पुणे यानी दिनांक ३/७/२०१५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे योजना सादर केली आहे.
सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापकीय विश्वस्तांमधील फेरबदल अर्ज प्रकरणी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४२ नुसार वक्फ मंडळाने दिनांक २७/२/२००९ रोजी निर्णय दिला असून त्यानुसार ॲड एच.आय.मुल्ला (फिट पर्सन) व शरफोद्दिन शमसोद्दिन ऊर्फ रोशन दिलशाहन यांना संस्थेचे विश्वस्त म्हणून घोषित केले होते. तसेच याच प्रकरणात श्री. अय्याज अब्दुल कादर शेख रा.भवानीपेठ, पूणे यांनी दि.०४/०५/२०१९ रोजी दुसरी योजना सादर केली आहे. सदरील दोन्ही योजनांना शरफोद्दीन शमशूद्दीन ऊर्फ रोशन दिलशान सरगूरू यांनी हरकत घेतलेली आहे.

श्रीमती. खैरुन्निसा अब्दुल कादर व इतर यांनी कलम ६९ व ६४(८) वक्फ कलम १९९५ अन्वये मा. कार्यकारी अधिकारी यांच्यापुढे दर्गाह अंगडशाहा तकीया व आशुरखाना, पुणे या ट्रस्टचे मुतवल्ली म्हणुन पुर्ननियुक्तीसाठी अर्ज दिला होता. त्यात त्यांनी असे नमुद केले होते की ती वरील दर्गाची वंशपरंपरेने मुतवल्ली असुन सदर ट्रस्टच्या नोंदणीचे वेळीस धर्मादाय आयुक्त पुणे यांनी अर्जदाराचे नाव शेडयुल-१ मध्ये सदरील दर्गाचे एकमेव ट्रस्टी म्हणुन नोंदविण्यात आलेले आहे व वारसाची कार्यवाही वंशपरंपरेनुसार असल्याचे घोषित केले आहे. वरील प्रमाणे झ ालेल्या नोंदणी विरुध्द जॉईन्ट चॉरीटी कशिनर पुणे यांचे न्यायालयात अपील क्र. ५३/८९ दाखल करण्यात आले व सदरील अपील दि. १०/०१/१९९१ रोजी खारीज करण्यात आले. तसेच दोन्ही निकाल मा. जिल्हा न्यायाधिश पुणे यांनी एम.ए. नं. १८९/९१ मध्ये दिलेल्या सन १९९५ च्या निकालानुसार कायम करण्यात आले.

दि. २५/०३/२०१३ रोजी श्री. एन.डी. पठाण मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वरील प्रकरणात आदेश देऊन अर्जदार श्रीमती खैरुन्नासा अब्दुल कादर यांचा कलम ६३ व ६४(८) प्रमाणे दिलेला अर्ज मंजुर केला होता अर्जदार यांचा अंगड शाहा तकिया पुणे या वक्फ संस्थेचे वंशपरंपरागत मुतवल्ली म्हणुन पुर्ननियुक्ती करण्याचे आदेश पारित केले. तसेच प्रतीवादी नं.२ यांचा सदरील संस्थेशी कुठलाही संबंध नसल्याचे घोषित करण्यात आले होते. तसेच पारित केले

होते अर्जदार यांने सदर संस्थेच्या व्यवस्थापनासाठी वक्फनामे प्रमाणे सविस्तर योजना दाखल करावी असा आदेश देण्यात आलेला होता.

अर्जदार सलीम अब्दुल कादर शेख व अय्याज अब्दुल कादर यांचा युक्तीवाद -

अर्जदारांनी त्याच्या अर्जात व युक्तीवादात असे नमुद केले आहे की ते जुन्या अभिलेखाप्रमाणे वंशपरंपरागत या वक्फ संस्थचे मुतवल्ली आहे ते संस्थाची देखभाल करतात तसेच mode of succession is hereditary अशी परंपरा आहे तसेच वक्फ संस्थेच्या मिळकती वाचवण्यासाठी व उत्तम व्यवस्थापन साठी अर्जदारांनी स्किमचा अर्ज दिलेला आहे तो मंजूर करावा तसेच नियमानुसार कोणत्याही व्यक्तीला त्या ठिकाणी हस्तक्षेप करणेचा अधिकार नाही सबब अर्जदाराचा स्किमचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

श्रीमती खैरुन्निसा अब्दुल कादर यांनी त्या सदर संस्थेच्या वंशपरंपरागत मूतवल्ली असल्याने त्यांना मूतवल्ली म्हणून घोषित करण्यासाठी घोषित करून ॲडव्होकेट एच.आय.मुल्ला व शेख शरफोद्दीन शमसोद्दीन यांचे विरूध्द प्रकरण क्रमांक ६३/१०/२००९ वक्फ मंडळामध्ये दाखल केले होते प्रकरणात दोन्ही पक्षकारांचे जबाब यूक्तीवाद होवून हे प्रकरण दिनांक २५.३.२०१३ रोजी अर्जदारांचे बाजूने निकाली काढण्यांत आलेले आहे. हे प्रकरण निकाली काढताना वक्फ मंडळाने अर्जदार श्रीमती. खैरून्निसा अब्दुल कादर यांना सदर संस्थेचे वंशपरंपरागत मुतवल्ली म्हणून पुर्तनियूक्त करण्यात आले. सदरचे आदेशात खैरुन्निसा अब्दुल कादर या वंशपरंपरागत मुतवल्ली असून जनाब शेख शरफोद्दीन शम्सुद्दीन उर्फ रोशन दिलशान सरगुरु यांचा सदर संस्थेचे मुतवल्ली पदाचा कोणताही संबंध नाही श्रीमती खैरुन्निसा यांनी सदर संस्थेच्या दैनंदिन कामासाठी योजना मान्यतेसाठी सादर करावी म्हणून प्रस्ताव सादर करावा असा आदेश पारित करण्यांत आलेला आहे. वरील दोन्ही स्किम प्रस्ताव श्रीमती खैरुन्निसा अब्दुल कादर यांच्या मुलांनी दाखल केले असून नवीन मुतवल्ली घेण्याची रित वंशपरंपरागत असल्याचे दिनांक २५/३/२०१३ चे आदेशात नमुद केलेले आहे. खैरून्निसा अब्दुल कादर यांचे दिनांक १८/४/२०१३ रोजी निधन झाल्यामुळे त्यांचे वंशातील मुलांनी योजनेचे अर्ज सादर केलेले आहे. प्रकरण क्रमांक ६३/१०/२००९ मध्ये सदर संस्थेच्या नवीन विश्वस्त घेण्याची रित मध्ये वंशपरंपरागत असून त्याप्रमाणे योजनेचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच त्यांनी असे नमुद केलेले आहे की नवीन विश्वस्त घेण्याची रित वंशपरंपरागत असून खैरुन्निसा अब्दुल कादर यांच्या मुलांनी दाखल केलेली योजनेचे प्रस्तावाच्या अनूषंगाने पूढील कार्यवाही करणे योग्य होईल.

सदरील आदेश पारित केल्यानंतर शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशान सरगुरु यांनी सदर आदेशास कोठेही आव्हान दिलेले नाही त्यानंतर दि. १८/०४/२०१३ रोजी अर्जदार श्रीमती. खैरुणन्निस अब्दुल कादर यांचे निधन झाले व त्यानंतर सदर वक्फ संस्थेच्या मुतवल्लीची जागा रिकामी झालेली आहे शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह सरगुरु यांनी महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकार यांच्यापुढे दावा क्र. १९/२०१६ दाखल करुन विनंती केली की त्यांना सदर अगंड शाहा तकीया ट्रस्टचे मुतवल्ली/ट्रस्टी असल्याबाबत घोषित करण्यात यावे व सामनेवाले यांना सदर ट्रस्टच्या कार्यभारात ढवळाढवळ करु नये या करीता मनाई हुकुम देण्यात यावा करिता दावा दाखल केला होता परंतु न्यायालयाने त्यांची कोणतीही विनंती मान्य केलेली नाही व दावा त्यांच्या विरुध्द निकाली काढून टाकण्यात आलेला आहे.

सदरच्या आदेशा विरुध्द शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह सरगुरु यांनी मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठा पुढे सिव्हिल रिवीजन अर्ज क्र. २२२/२०१८ चा दाखल केला होता त्या अर्जात मा. उच्च न्यायालयाने वक्फ मंडळाला असे आदेशित केलेले आहे की शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशान सरगुरु यांचा मुतवल्लीपदासाठी दिलेला अर्ज गुणदोषावर निकाली काढावा तसेच वक्फ न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाचा कोणताही प्रभाव त्यांच्या आदेशावर असणार नाही.

शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह यांनी मा.उच्च न्यायालय औरंगाबाद येथे सीआरए क्रमांक २२२/२०१८ दाखल करून असे नमुद केले की, ते वंशपरंपरागत मुतवल्ली आहे. वक्फ न्यायाधिकरणापूढे वक्फ डिड चा अर्थ mode of succession च्या बाबतीत योग्यरित्या काढला गेला नाही तसेच न्यायाधिकरणाने असे स्पष्ट केले आहे की शरफोद्दीन यांचा वक्फ मंडळापूढे मुतवल्ली च्या अधिकाराचा अर्ज प्रलंबित असल्याने अर्जदाराने न्यायधीकरणापूढे येणे उचित नाही.

या प्रकरणी उच्च न्यायालयात दाखल करण्यांत आलेल्या सीआरए-२२२/२०१८ प्रकरणी दिनांक १६/८/२०१९ च्या आदेशात उच्च न्यायालयाने असे कथन केले आहे की न्यायधिकरणापूढे दिलेला अर्ज मेंटेनेबल नसताना तसेच अर्जदाराने एकदा मुतवल्लीच्या अधिकारासाठी मंडळापूढे अर्ज दिलेला असतांना न्यायाधिकरण त्यात हस्तक्षेप करू इच्छित नाही तसेच वक्फ मंडळापूढे अर्जदाराने दिलेला अर्ज वक्फ मंडळ गूणदोषावर निकाली काढावा त्यात न्यायधिकरणाने अर्जदाराचा अर्ज रदद केला, त्याचा वक्फ मंडळाच्या निकालावर काहीही परिणाम करणारा नाही तसेच उच्च न्यायालयाने मंडळाला आदेश दिले आहे की अर्जदाराने दिलेला मुतवल्ली बाबतच्या अधिकाराचा अर्ज ९ महिन्याच्या आंत गुणदोषावर निकाली काढावा. व न्यायाधिकरणाच्या निष्कर्षाचा कोणताही प्रभाव त्यावर नसावा.

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर वेळोवेळी दोन्ही पक्षकारांना व त्यांच्या वकीलानां सुनावणी करीता नोटीसा काढुन सुनावणी करिता बोलवण्यात आले व नंतर सुनावणी पुर्ण करण्यात आली.

दि. २१/०४/२०२२ रोजी या कार्यालयाचे पत्र जा.क्र. ६३०/३३१६/२०२२ अन्वये श्री. शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह सरगुरु यांना नोटीस काढुन असे कळविण्यात आले की आपण सदर अंगड शाह तकीया संस्थेचे मुतवल्ली असल्याबाबत सर्व प्रमाणित कागदपत्र हजर करावे. त्यानुसार दि. २७/०४/२०२२ रोजी श्री. शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशाह सरगुरु हे हजर राहुन त्यांनी काही कागदपत्र दाखल केले आहेत तथापि वरील दाखल केलेल्या सर्व कागदपत्रावरुन हे बोध होत नाही की ते अंगड शाहा तकीया या संस्थेचे मुतवल्ली आहे किंवा सरगुरु आहे. तसेच असल कागदपत्र (Authentic Document) सरगुरु असल्याबाबत दाखल केलेले नाही तसेच जे काही कागदपत्र दाखल केले आहे त्या वरुन श्री. शरफोद्दीन शमशोद्दीन ऊर्फ रोशान दिलशान सरगुरु असल्याबाबत स्पष्टता होत नाही.

श्रीमती खैरुन्निसा अब्दुल कादर यांनी त्या सदर संस्थेच्या वंशपरंपरागत मूतवल्ली असल्याने त्यांना मूतवल्ली म्हणून घोषित करण्यासाठी ॲडव्होकेट एच.आय.मुल्ला व शेख शरफोद्दीन शमसोद्दीन यांचे विरूध्द प्रकरण क्रमांक ६३/१०/२००९ वक्फ मंडळामध्ये दाखल

केले होते प्रकरणात दोन्ही पक्षकारांचे जबाब यूक्तीवाद होवून हे प्रकरण दिनांक २५.३.२०१३ रोजी अर्जदारांचे बाजूने निकाली काढण्यांत आलेले आहे. हे प्रकरण निकाली काढताना वक्फ मंडळाने अर्जदार श्रीमती. खैरून्निसा अब्दुल कादर यांना सदर संस्थेचे वंशपरंपरागत मुतवल्ली म्हणून पुर्ननियुक्त करण्यात आले. सदरच्या आदेशात खैरुन्निसा अब्दुल कादर या वंशपरंपरागत मुतवल्ली असून जनाब शेख शरफोद्यीन यांचा सदर संस्थेचे मुतवल्ली पदाचा कोणताही संबंध नाही श्रीमती खैरुन्निसा यांनी सदर संस्थेच्या दैनांदिन कामासाठी योजना मान्यतेसाठी सादर करावी असा आदेश पारित करण्यांत आलेला आहे. वरील दोन्ही स्किम प्रस्ताव श्रीमती खैरुन्निसा अब्दुल कादर यांच्या मुलांनी दाखल केले असून नवीन मुतवल्ली घेण्याची रित वंशपरंपरागत असल्याचे दिनांक २५/३/२०१३ चे आदेशात नमुद केलेले आहे.खैरून्निसा अब्दुल कादर यांचे दिनांक १८/४/२०१३ रोजी निधन झाल्यामुळे त्यांचे वंशातील मुलांनी योजनेचे अर्ज सादर केलेले आहे. प्रकरण क्रमांक ६३/१०/२००९ मध्ये सदर संस्थेच्या नवीन विश्वस्त घेण्याची रित मध्ये वंशपरंपरागत असून त्याप्रमाणे योजनेचे अर्ज प्राप्त झालेले आहेत. तसेच त्यांनी असे नमुद केलेले आहे की नवीन विश्वस्त घेण्याची रित वंशपरंपरागत असून खैरुन्निसा अब्दुल कादर यांचे मुलांनी दाखल केलेली योजनेचे प्रस्तावाच्या अनूषंगाने पूढील कार्यवाही करणे योग्य होईल.

श्री. शेख शरफुद्दिन शम्सोद्दिन यांनी दि. १०/०५/२०२२ रोजी एक योजना दाखल केली आहे.

<u>सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -</u>

प्रकरणात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस अर्जदार सलीम अब्दुल कादर शेख रा. पुणे. हे हजर होते तसेच हरकतदार श्री शरफोद्यीन शमशूद्यीन ऊर्फ रोशान दिलशा सरगूरू हे हजर होते.

**ठराव क्रमांक १६:-** **अंगड शाह तकीया व आशुरखाना, भवानी पेठ, पुणे या वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी श्री. सलीम अब्दुल शेख यांनी दि. ०३.०७.२०१५ रोजी तसेच श्री. अय्याज अब्दुल कादर शेख यांनी दि. ०४.०५.२०१९ रोजी योजना मंजुरीचे प्रस्ताव सादर केले आहे. तसेच श्री. शरफुद्दीन शमशोद्दीन सरगुरु यांनी वंशपरंपरागत मुतवल्ली म्हणून नेमणुक करण्या बाबत अर्ज दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरणी प्राप्त झालेले सर्व अर्जामध्ये वंशपरंपरागत मुतवल्ली म्हणून नेमणुक करण्या बाबत तरतुदी आहे. तथापी, सदरहू अर्जदार वंशपरंपरागत मुतवल्ली असल्याचे सिध्द होऊ शकले नाही. सबब या प्रकरणी प्राप्त सर्व अर्ज रद्द करण्यात येत आहे.**

**सदर वक्फ संस्थेवर योग्य व्यवस्थापन समितीची नियुक्ती करण्यासाठी वक्फ मंडळाने तयार केलेली आदर्श योजना (Model Scheme) मंजूर करुन त्यानुसार विश्वस्थ समिती निवडण्यात यावी.**

**विषय क्रमांक १७:-**

**<u>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर</u>**

**<u>वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश</u>**

संचिका क्र. ४०/२९२/२०१२

**हाजी अब्दुल रज्जाक हाजी अहमद छापरा, वय ६२**
**रा.अंधेरी वेस्ट,मुंबई**

----- अर्जदार

विरूध्द

**मोहंमद अली तैय्यब, वय सज्ञान.**
**भायखळा मुंबई-२७.व इतर २.**

----- गैरअर्जदार

**प्रकरण - जालीवाली मसजिद ॲड अरबी मदरसा अंधेरी वेस्ट,मुंबई च्या संस्थेच्या क्षेत्राची क्षेत्रफळ मोजणी व वक्फ संस्था घोषित करणे बाबत वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० नुसार**
**नोंदणी क्र.. MSBW/MUM//२८५//२०१३**

प्रारंभिक -

जालीवाली मसजिद अँड अरबी मदरसा अंधेरी वेस्ट, मुंबई ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून त्याचा नोंदणी क्र. MSBW/MUM//२८५//२०१३ असा आहे. सदरील संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९५५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यांत आलेली आहे.

जालीवाली मसजिद अँड अरबी मदरसा अंधेरी वेस्ट, मुंबई च्या वक्फ संस्थेस संस्थेच्या क्षेत्राची क्षेत्रफळ मोजणी व वक्फ संस्था घोषित करणे बाबत वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४० नुसार अर्जदार हाजी अब्दुल रज्जाक हाजी अहमद छापरा, यांनी दिनांक ०४/१२/२०१२ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे अर्ज सादर केला होता.

प्रकरणात गैरअर्जदार क्र. मोहंमद अली तैय्यब, वय सज्ञान. रा. भायखळा मुंबई-२७.व इतर २. यांनी अर्जावर आक्षेप नोंदवल्याने अर्जदार व गैरअर्जदार यांना सुनावणी करिता या कार्यालयाचे पत्र क्रमांक मरावम/चौकशी/६२६७/२०२१ दिनांक २३/९/२०२१ रोजी पत्र पाठवून दि. ०७/१०/२०२१ रोजी सुनावणी करिता कागदपत्रासह पाचारण करण्यात आले तसेच त्यांना लेखी म्हणणे सादर करण्याबाबत कळविण्यात आले.

सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -

दि. ०२/०९/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली त्यावेळेस अर्जदाराकरिता ॲड निसार अहमद व ए.एन.शेख हजर होते तसेच ॲड ताहेर अली कादरी हे ॲड मुजतबा करिता हजर होते तसेच गैरअर्जदार मोहंमद अली हे हजर होते. सदरील प्रकरणात सर्व पक्षकार हजर होते त्यांचा अर्ज कलम ४० अन्वये होता. मंडळाने सर्व वकिलांचे म्हणणे एकूण घेतले या प्रकरणातील महत्वाचा मुद्दा हा वक्फ संस्थेचा मिळकतीच्या क्षेत्रफळा बाबतचा आहे. कागदोपत्री कोणाताही दस्त नाही परंतु वकिल निसार खान यांनी सादर केले की मा.सर्वोच्च न्यायालयाचे एक सायटेशन आहे त्याचा क्रमांक एआयआर १९७६ पान नंबर १५६९ पॅरा २ या न्यायालयाच्या न्यायनिर्णयात असे कथन केले आहे की, वक्फ मिळकत जी अनूसूचि १ मध्ये दाखवलेली नाही ती देखील क्षेत्रफळ म्हणून घेता येते. त्या उलट रेस्पॉडट तर्फे वकिल आनंद भंडारी यांनी काही

उच्च न्यायालयाचे सायटेशन दाखल केले व आक्षेप घेतला की तोंडी सांगणेवरून वक्फ ची मिळकत वर्ग होत नाही व हरकत घेतली की बाकीची मिळकत वक्फ मिळकत म्हणून धरू नये सबब सदरील मिळकतीची अनूसूचि १ मध्ये नोंद होवू शकत नाही. वक्फ मंडळाने ३ सदस्यांची कमेटी नेमलेली आहे त्यांनी सदर वक्फ संस्थेच्या जागेचे इन्स्पेक्शन करावे तसेच वक्फ मिळकतीचे मोजमाप करावे. तसेच दिनांक २१-१०-२०२१ पूर्वी अहवाल सादर करावा अशा सुचना या सदस्यांना दिल्या आहे.

अर्जदार हाजी अब्दूल रज्जाक हाजी अहमद छापरा रा. मुंबई यांचा युक्तीवाद -

अर्जदारांनी त्यांच्या कलम ४० वक्फ अधिनियम १९९५ नूसार दिलेल्या अर्जात व युक्तीवादात असे नमुद केले आहे की जालीवाली मसजिद व मदरसा ही वक्फ संस्था तिच्या परिसरातील क्षेत्राफळसह म्हणून घोषित करावे. सदरची मशीद ही अंधेरी वेस्ट मुंबई येथे असून त्याचा सीटीएस. नंबर १७७ असा असून त्याचे क्षेत्र ७२८.७९ स्के.मिटर ऐवढे आहे. तसेच अर्जदाराचे अॅड निसार अहमद यांनी कथन केले की वक्फ मिळकती सीटीएस नंबर १७७ चे क्षेत्र १२०१.३ स्के.मिटर ऐवढे आहे परंतु सदरची मसजिद ही ७२८.७९स्के.मिटर इतके आहे. सदरची मिळकत मसजिद म्हणून सूमारे ६० वर्षापासून वापरात आहे .५ वेळेस तेथे नमाज होत असते सध्याचे अर्जदार हे संस्थाचे व्यवस्थापन पाहात असतात वक्फ संस्थेचे बँकेत खाते आहे. पेशइमाम व बांगी चे पगार अर्जदार करतो तसेच दूसरे किरकोल व मेंटेनन्स हे देखीरल अर्जदार करतो. वजूखाना,तहारतखाना, टॉयलेट बलॉक,आरसीसी,वॅाटर टँक व पंपरुम तसेच लाउडस्पीकर कार्पेट हे मशीदीत ठेवले आहे. वरील सर्व कामे हे अर्जदाराने केलेले आहे. वक्फ मिळकत ही धार्मीक कामासाठी उपयोगात येते.

गैरअर्जदार यांचा यूक्तीवाद

गैरअर्जदार यांनी असे कथन केले आहे की वक्फ मिळकत ही त्यांची खासगी मिळकत आहे.तसेच अर्जदाराने कथन केलेले मुददे खोटे आहेत . गैरअर्जदार नंबर २ यांनी असे कथन केले आहे की जर वक्फ मिळकतीचे कागदपत्र असेल तरच वक्फ मिळकत होवू शकते तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना कोणत्याही प्रकारे अर्जदार यांच्या अर्जात आदेश करण्याचा किंवा ढवळाढवळ करणेचा अधिकार नाही . त्यांनी कथन केले आहे की एकदा की मसजिद किंवा कब्रस्तान अस्तित्वात आले तर मालकत्वच आपोआप रदद होतो ही केस वक्फ-अल -औलाद अशी नाही सबब अर्जदाराचा अर्ज नामंजूर करावा.

वरील सर्व बाबीचा व कागदोपत्राचा विचार करता श्री एन.डी पठाण तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी दिनांक ४.१२.२०१३ रोजी असे निष्कर्ष नोंदविले होते की, रेकॉर्ड अभिलेख वरील कागदपत्राच्या आधारे हे सिध्द होते की, ती जागा मसजिद ची आहे व त्याठिकाणी ५ वेळेस नमाज पठण होत आहे तसेच ज्या जागी मशीद बांधलेली आहे ती जागा तय्यब अबूबकर लतीफ यांच्या माालकीची होती. गैरअर्जदार मोहंमद अली व ताहेर अली हे दोन मुले श्री तय्यब अबूबकर लतीफची आहे. तसे त्यांनी हे कबूल केले आहे की तेथे मसजिद होती व ५ वेळेची नमाज होत होती. सबब मसजिद असल्यामुळे ते पहिल्यापासून वक्फ आहे त्यामुळे त्यास पून्हा वक्फ म्हणून घोषित करणची आवश्यकता नसलेने अर्जदाराचा कलम ४० अन्वये दाखाल केलेला अर्ज तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी रदद केलेला होता तसेच

मसजिद ही वक्फ मिळकत असल्यामुळे ताबडतोब नोंदणी करणेचे आदेश दिनांक ४.१.२०१३ रोजी देण्यात आले होते. सदरील तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दिनांक ४.१.२०१३ च्या आादेशाला नाराजगी दर्शवून अर्जदार हाजी अब्दूल रज्जाक छापरा रा.अंधेरी यांनी न्यायाधिकरणापूढे वक्फ अपील क्रमांक १/१३ दिनांक २२.१.२०१३ रोजी दाखल केले. सदरच्या अपीला मध्ये मा.न्यायधिकरणाने अर्जदार यांचे अपील दिनांक ३१.१०.२०१५ रोजी फेटाळले, सदरील आदेशाला अर्जदार यांनी उच्च न्यायालय औरंगाबाद येथे अपील दाखल केले त्याचा क्रमांक सीआए २५६/२०१५ असा आहे त्यामध्ये माननीय न्यायालयाने सदर प्रकरण वक्फ मंडळाकडे पाठवून असे कथन केले की मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी वक्फ मिळकतीची शहनिशा व खात्री करावी तसेच वक्फ संस्थेच्या मिळकतीच्या क्षेत्राची शहनिशा करावी. क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करताना फक्त मशीद बांधली केवळ तीच जागा विचारात न घेता इतर जागा जी मशीदीच्या सुविधेसाठी बांधलेली आहे ती देखील विचारात घ्यावी असे आदेश दिलेले आहे.

**ठराव क्रमांक १७:-** सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.

**विषय क्रमांक १८:-**

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर**
**वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश**

**संचिका क्र. ६९/३१७/२०१६**

**अय्याज इलियास नाईकवाडी व इतर**
**रा.मिरज ता.मिरज जि.सांगली** — **अर्जदार**

**विरूध्द**

**महेबुब अली मोहम्मद गौस मणेर**
**रा.मिरज ता.मिरज जि.सांगली** — **हरकतदार**

**मुबारक बुऱ्हानोद्दीन खतीब**
**रा.मिरज.ता.मिरज जि.सांगली** — **अर्जदार**

**विरुध्द**

**अय्याज ईल्यास नायकवाडी व इतर**
**रा.मिरज ता.मिरज जि.सांगली** — **हरकतदार**

**साहेबपाशा अब्दूल कादर काजी (इनामदार)** — **हरकतदार**

**प्रकरण** - निमजगा माळ इदगाह.मिरज.ता.मिरज जि,सांगली या संस्थेच्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत. नोंदणी क्र.. MSBW/SGL/३१/२००८

प्रारंभिक - (विवेचन)

निमजगा माळ इदगाह, मिरज ता. मिरज जि. सांगली ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून तिचा नोंदणी क्र. MSBW/SGL/३१/२००८ असा आहे.

सदर संस्थेची नोंद धर्मादाय आयूक्त यांच्याकडे झालेली असून त्याचा नोंदणी क्रमांक B-१३३ Sangli Dt.३१-३-१९५४ असा आहे.

निमजगा माळ इदगाह, मिरज, ता. मिरज जि. सांगली सदर संस्थेच्या मिळकतीची नोंद वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३७ अन्वये अभिलेखात घेण्यात आलेली आहे.

सदर संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशासनाकरिता अय्याज इलियास नाईकवाडी व इतर रा.मिरज ता.मिरज जि.सांगली अर्जदार, यानी दिनांक २९-७-२०१६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे. व असे कथन केले आहे की, वरील संस्था ही वक्फ मंडळात नोंदणीकृत संस्था असुन वशंपरंपरेने जरी खतीबीचा दावा असला तरी मुतवल्ली. इमाम म्हणून आज ही गौस मोहंमद आबासाहेब खतीब यांचेच नांव आहे व ते मयत आहे. त्यांच्या जागी नियूक्ती बाकी आहे त्यांच्या जागी मुलाची नोंद झाली नाही त्यामुळे मयत खतीबचे नातु सिकंदर बुऱ्हानोददीन स्वतः यांचे म्हणणे किंवा प्रस्ताव देण्याचा वा स्विकारण्याचा कोण्ताच अधिकार नाही, त्यामुळे सिकंदर खतीब यांनी सादर केलेला प्रस्ताव चूकीचा व बेकायदेशीर आहे. खतीब यांच्या प्रस्तावात फक्त त्यांचे नातेवाईकांचाच समावेश आहे. त्यांनी प्रस्तावीत योजना मंजुरीसाठी या कार्यलयास अर्ज सादर केला आहे

दुसरा अर्ज श्री. मुबारक बुऱ्हानोद्यीन खतीब, रा.मिरज.ता.मिरज जि.सांगली यांनी दिनांक २.३.२०१९ दाखल केलेला असून त्यांनी संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापणासाठी व योग्य प्रशासनाकरिता , मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे. व असे कथन केले आहे की अर्जदार हे सदर वक्फ संस्थेचे व्यवस्थापक असून रोजचे रोज ते संस्थेचे कार्य करतात. निमजगा माळ या संस्थेची धर्मादाय आयुक्त मध्ये मिळकतीची नोंद करण्यांत आलेली होती व त्या मध्ये महेबूबअली मोहंमद गौस मनेर गैरअर्जदार यांनी कथन केले आहे की ही मिळकत शाही इदगाहची आहे असे म्हणणे बेकायदेशीर आहे व बरोबर नाही. ईदगाहच्या नावाने नोंदणी केलेला ट्रस्ट फक्त कायदेशीर आहे व त्याचे अर्जदार हे वंशपरंपरागत आहे. अली आदिलशा यांनी ही मिळकत अर्जदाराचे पूर्वज यांना रोजच्या रोजच्या रोज होणाऱ्या कार्यासाठी व इदची नमाज व दोन्ही इदच्या नमाजच्या खूदबासाठी दिली होती.गैरअर्जदार यांना वंशपरंपरेने ट्रस्टामध्ये कोणताही अधिकार नाही.अर्जदाराने ॲडहॉक कमेटीसाठी गावातील लोकांच्या नातेवाईक यांच्या सल्लयाने स्किम दाखल केलेली आहे.

सदर प्रकरणासंबंधी अर्जदार यांनी सर्व कागदपत्राची पुर्तता केली आहे अर्जदारांने सादर केलेल्या योजना अर्जाची व प्रस्तावीत योजनेची पडताळणी करण्यात आली आहे.

<u>अर्जदार अय्याज इलियास नाईकवाडी व इतर रा.मिरज ता.मिरज जि.सांगली यांचा युक्तीवाद -</u>

अर्जदाराने असे कथन केले आहे की, वरील संस्था ही वक्फ मंडळात नोंदणीकृत संस्था असुन वशंपरंपरेने जरी खतीबीचा दावा असला तरी मुतवल्ली. इमाम म्हणून आज ही

गौसमोहंमद आबासाहेब खतीब यांचेच नांव आहे व ते मयत आहे. त्यांच्या जागी नियूक्ती बासकी आहे त्यांच्या जागी मुलाची नोंद झाली नाही त्यामुळे मयत खतीब चे नातु सिकंदर बून्हानोददीन स्वत:चे म्हणणे किंवा प्रस्ताव देण्याचा वा स्विकारण्याचा कोणताच अधिकार नाही त्यामुळे सिकंदर खतीब यांनी सादर केलेला प्रस्ताव चूकीचा व बेकायदेशीर आहे खतीब यांचे प्रस्तावात फक्त त्यांचे नातेवाईकाचाच समावेश आहे. त्यांनी प्रस्तावीत योजना मंजुरीसाठी या कार्यलयास अर्ज सादर केला आहे.

गैरअर्जदार श्री.महेबूबअली महंमद गौस मणेर रा.मिरज (हरकतदार यांचा युक्तीवाद) -

हरकतदार यांनी दिनांक ३०.७.२०१६ रोजी हरकत देवून असे कथन केले आहे की चूकीच्या माहितीच्या आधारे अर्जदाराने स्किम योजना दाखल केली आहे तसेच महत्वाच्या बाबी वक्फ मंडळापासून लपवलेल्या आहे. हरकतदार सध्या मुतवल्ली आहे बुन्हानोद्दीन यांनी कोणतेही अधिकार नसतांना मिळभ्कत हडप करण्याच्या उद्येशाने निमजगा माळ ईदगाह मिरज च्या नावाने नोंदणी क्रमांक एमएसबीडब्ल्यू/३१/२००८ अन्वये नोंदणी केली आहे. ईदगाह ही आर.एस.नंबर ९६३/१/अ` या जागेवर आहे व ही जागा शाही इदगाह मिरज या संस्थेची आहे. शाही इदगाह व निमजगा हे दोन वेगळे वक्फ संस्था आहे तसेच आर.एस. नंबर ९६३/१/१७ ही निमजगा या संस्थेची मिळकत नाही. बुन्हानोददीन यांनी चुकीचे आधारे कथन केले की ते निमजगा माळ या संस्थेचे मुतवल्ली आहे. शाही इदगाह च्या अर्जावर वक्फ मंडळाच्या दिनांक १.१०.२०१४ च्या आदेशान्वये मिळकत क्रमांक आर.एस.९६३/१/अ ही निमजगा माळ इदगाह मिरज च्या लेख्ययातुन कमी करण्यांत आले. बून्हानोद्यीन यांनी मिळकत क्र.९६३/१/अ हडप करणेकरिता चूकीचा फेरफार मंडळात दाखल केला आहे. तसेच हरकतदारांनी विनंती केली आहे की. स्किम. फेरफार व व्यवस्थापन समिती नेमणूकी बाबत निमजगा माळ इदगा सुनावणी शिवाय मंजूर करू नये.

दूसरे अर्जदार श्री मुबारक बुरहानोद्यीन खतीब यांचा युक्तीवाद -

अर्जदार यांनी दिनांक २.३.२०१९ रोजी योजना अर्ज दाखल केलेला असून त्यांनी संस्थेच्या दैनंदिन व्यवस्थापनासाठी व योग्य प्रशासनाकरिता, मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कडे योजना सादर केली आहे. व असे कथन केले आहे की

अर्जदार हे सदर वक्फ संस्थेचे व्यवस्थापक असून रोजचे संस्थेचे कार्य ते करतात. निमजगा माळ या संस्थेची धर्मादाय आयुक्त मध्ये मिळकतीची नोंद करण्यांत आलेली होती व त्या मध्ये महेबूबअली मोहंमद गौस मनेर गैरअर्जदार यांनी कथन केले आहे की ही मिळकत शाही इदगाहची आहे ते म्हणणे बेकायदेयशीर आहे व बरोबर नाही. ईदगाहच्या नावाने नोंदणी केलेला ट्रस्ट फक्त कायदेशीर आहे व त्याचे अर्जदार हे वंशपरंपरागत आहे.अली आदिलशा यांनी ही मिळकत अर्जदाराचे पूर्वज यांना रोजच्या रोजच्या कार्यासाठी व इदची नमाज व दोन्ही इदच्या नमाजच्या खूदबासाठी दिली होती.गैरअर्जदार यांना ।वंशपरंपरेने ट्रस्ट मध्ये ।कोण्ाताही अधिकार नाही.अर्जदाराने ॲडहॉक कमेटीसाठी गावातील लोकांच्या नातेवाईक यांच्या सल्लयाने स्किम दाखल केलेली आहे.

**अय्याज इलीयास नायकवाडी व इतर हरकतदार -**

हरकतदार यांनी असे कथन केले आहे की सदरील वक्फ संस्थेस मागील सूमारे १० वर्षापासून मॅनेजिंग व्यव्स्थापकीय समिती नाही. बूऱ्हानोददीन खतीब व त्यांचे लोक इदगाह ची व्यवस्था पाहात नाही तसेच त्यांच्याकडे इदगा संस्थेचे जमा ,खर्च नाही. वक्फ मंडळाने खतीब यांना कोणात्याही प्रकारची नियूक्ती दिलेली नाही तसेचू त्यांने अर्ज त्याचा मुलगा जावई भावाचा मुलगा ,बहिणीची मुलगा तसेच नातु यांच्यासह केलेला आहे हे वंशपरंपरागत होवू शकत नाही. तसेच मैनोद्यीन शमसोद्यीन बागवान हा देखील अर्जदार आहे परंतु त्याच्या विरूध्द मिरज पोलीस स्टेशनला फौजदारी केस असल्याने तो लायक नाही तसेच अर्जदार मुबारक खतीब व साथीदार यांनी गुंड प्रव.ऱ्तीच्या लोकांबरोबर हात मिळवणी करून वक्फ ची मिळकत हडप करण्याचा त्यांचा उद्येश आहे तसेच न्यायालयात प्रकारणे प्रलंबबित असून देखील अर्जदार मिळकत हडप करण्यासाठी प्रयत्न करीत आहे तसेच अर्जदाराने गावांतील मुसल्लीयान ची सम्मती न घेता अजर्ह दाखल केला आहे सबब अॅडहॅ ाक कमिटी बनवू नये तसेच बुऱ्हानोदीन खतीब व मैनोद्यीन बागवान यांच्या स्किमला हरकतदाराचे म्हणणे ऐकल्याशिवाय मंजूरी देवू नये.

**<u>साहेबपाशा अब्दूल कादर काजी (इनामदार) हरकतदार:</u>**

हरकतदार यांनी दिनांक ९.१२.२०२० रोजी हरकत द ाखल करून असे कथन केले आहे की निमजगा माळ इदगाह संबंधी स्किम अजर्ह नामंजूर करावे शाही इदगाहची सर्व मालमऱ्ता व आर्थीक व्यवहार मंडळाने ताब्यात घ्यावी व कोर्ट रिसीव्हर नेमावा.

**<u>सुनावणी व संबंधीताचा युक्तीवाद -</u>**

दि. ०२/०९/२०२१ रोजी प्रकरणात सुनावणी ठेवण्यात आली, त्यावेळेस हरकतदार महेबूबअली करिता अॅड.शारिक अहमद हजर होते तसेच अर्जदार इलियास करिता अॅड वसीम हे हजर होते.

**ठराव क्रमांक १८:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावे.**

## विषय क्रमांक १९:-

**<u>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, पनचक्की, औरंगाबाद यांच्या समोर</u>**
**<u>वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अंतर्गत झालेल्या सुनावणी नंतर आदेश</u>**
**<u>संचिका क्र. ६९/१३०/२०१० व ३२/४९/२०१४</u>**
**<u>व ६९/४९/२०१४ व ४२/४२/२०१० व ४२/५२४/२०१८ व ३१२/२०१८</u>**

**जमशेद अली सय्यद व इतर**
**रा. माहिम जि. मुंबई** ----- **प्रथम योजना**
**अर्जदार**

**मोहम्मद रफीक मेमन व**
**मोहम्मद वसीम मुन्ना** ----- **व्दितीय योजना**
**अर्जदार**
**रा. माहिम जि. मुंबई**

**मोहम्मद नसीर शेख**
**रा. माहिम जि. मुंबई** ------ **तृतिय योजना**
**अर्जदार**

सोहेल जुलफेकार कुरैशी व
हारुण इब्राहिम खलीफा व इतर ----- हरकतदार
रा. माहिम जि. मुंबई

मोहम्मद शोएब मुशताक अहमद खान ----- हरकतदार
रा. माहिम जि. मुंबई

**प्रकरण - बाई फातीमा बिन्ते काझी अब्दुल करीम मस्जिद, कापड बाजार, केडल रोड, माहिम, मुंबई (बी-२२६) च्या दैंनदीन व्यवस्थापनासाठी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नुसार योजनेस मान्यता देणे बाबत.**
**नोंदणी क्र. MSBW/MUM/५९/२००८ मुबंई सार्वजनिक ट्रस्ट कलम १९५०अन्वये नोदंणी क्र. B-२२६ Mumbai**

**प्रारंभिक (विवेचन) -**

बाई फातीमा बिन्ते काझी अब्दुल करीम मस्जिद, कापड बाजार, केडल रोड, माहिम, मुंबई (बी-२२६) ही संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ अन्वये मानीव नोंदणीकृत संस्था असून तीचा नोंदणी क्र. MSBW/MUM/५९/२००८ असा आहे.

**प्रथम योजना अर्जदार-**

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार जमशेद अली सय्यद व इतर, रा. माहिम जि. मुंबई यांनी दिनांक ०६/०२/२०१० रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की, या संस्थेची योजना उच्च न्यायालयाच्या दि. ०६/०६/१९१३ च्या आदेशानुसार ट्रस्ट डीड तयार करण्यात आलेली आहे. ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपन करतात. ते सदरील वक्फ संस्थेमध्ये हितसंबंध असणारी व्यक्ती असुन तेथे नमाज पडणे सर्व प्रकारचे धार्मीक कार्य करणे दरुद पडणे इत्यादी कामे करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावित योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे.

**व्दितीय योजना अर्जदार-**

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार मोहम्मद रफीक मेमन व मोहम्मद वसीम मुन्ना, रा. माहिम जि. मुंबई यांनी दि. २५/०३/२००८ रोजी डीम रजिस्टेशन सोबत योजना दाखल केलेली होती तसेच त्यांनी दिनांक २४/०१/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपन करतात. ते सदरील वक्फ संस्थेमध्ये हितसंबंध असणारी व्यक्ती असुन तेथे नमाज पडणे सर्व प्रकारचे धार्मीक कार्य करणे दरुद पडणे इत्यादी कामे करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावित योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे.

## तृतिय योजना अर्जदार-

सदर संस्थेच्या हिताकरिता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ६९ नूसार योजनेस मान्यता देण्याकरिता अर्जदार मोहम्मद नसीर शेख रा. माहिम जि. मुंबई यांनी दिनांक २८/०४/२०१४ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर केलेला आहे. सदर अर्जामध्ये अर्जदाराने असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेच्या रोजचे रोज देखभाल व व्यवस्थपन करतात. ते सदरील वक्फ संस्थेमध्ये हितसंबंध असणारी व्यक्ती असुन तेथे नमाज पडणे सर्व प्रकारचे धार्मीक कार्य करणे दरुद पडणे इत्यादी कामे करतात. वक्फ संस्थेच्या उज्जवल भविष्यासाठी व उत्तम देखभालीसाठी त्यांनी दाखल केलेली व्यवस्थापन समितीची प्रस्तावित योजना मान्य करावी असे त्यांनी नमुद केले आहे.

त्यानुसार जाहिर प्रगटन पारित करण्याकरीता दि. २९/०४/२०१४ रोजी जाहिर नोटीस काढण्यात आली व त्यामध्ये असे नमुद करण्यात आले वरिल व्यवस्थापनासंबंधी कोणाची काही तक्रार असल्यास त्यांनी ही नोटीस मिळाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आपले म्हणणे/आक्षेप दाखल करावे सदरची नोटीस दि. ३०/०४/२०१४ रोजीच्या दैंनिक नवभारत या वृत्तपत्रात देण्यात आली तसेच जिल्हा/विभागीय वक्फ अधिकारी यांनी पंचनामा व वृत्तपत्राची एक प्रत व अहवाल या कार्यालयास त्यांचे दि. ०५/०६/२०१४ च्या पत्रान्वये सादर केला आहे.

जमशेद अली सय्यद यांचा इतर अर्जदारांचा लेखी जवाब-

दि. १५/०९/२०२१ रोजी जमशेद अली यांनी अर्ज देवुन असे कथन केले आहे की, त्यांना बदल अर्ज मान्य करुन संस्थेवर घेण्यात आले आहे. या वक्फ संस्थेच्या घटनेनुसार इतर अर्जदाराना संस्थेसाठी योजना तयार करण्याचे व मुतवल्ली नियुक्त करण्याचे अधिकार नाही म्हणुन इतर अर्जदाराने दाखल केले इतर अर्ज रद्द करण्यात यावा. अर्जदाराचा अर्ज संस्थेची शांतता भंग करणार सबब अर्जदाराच अर्ज बेकायदेशीर असल्याने रद्द करण्यात यावा.

त्यांनतर वेळोवेळी पक्षकांराना बोलावुन चौकशी घेण्यात आलेली आहे. दि. २५/०२/२०२२ रोजी शेवटची सुनावणी ठेवण्यात आली.

दि. ०४/०३/२०२२ रोजी हितसंबंध असणारी व्यक्ती म्हणुन अर्जदार मोहम्मद शोएब मुशताक अहमद खान यांनी अर्ज देऊन असे कथन केले आहे की ते वक्फ संस्थेत पाच वेळेस नमाज पडतात वक्फचे रोजचे व्यवस्थापन करतात ते मस्जिदीचे सुमारे १४ वर्षापासुन इमाम आहे व ते हितसंबंध असणारी व्यक्ती आहेत. अर्जदार वसीम, मोहम्मद रफीक यांनी चुकीचा योजना अर्ज दाखल केलेला आहे त्यांनी ख-या गोष्टी लपवल्या आहेत. सबब अर्जदार श्री. मोहम्मद शोएब मुश्ताक अहमद खान यांचा अर्ज मंजुर करुन इतर सर्व अर्जदाराचे अर्ज रद्द करण्यात यावेत.

सोहेल जुलफेकार कुरैशी व इतर, यांनी लेखी युक्तीवाद सादर केलेला आहे व कथन केले आहे की, त्यांनी ६९/१३०/२०१० व ३२/४९/२०१४ या ६९ नुसार दाखल झालेल्या योजना रद्द करणे बाबत विनंती केली आहे. वक्फ अधिनियम १९९५ हा दि. ०१/०१/१९९६ नो पासुन आमलात आला आहे. सदरच्या संस्थेची योजना १९३६ मध्ये पारित झालेली आहे त्यामुळे तिच योजनापुढे चालु राहिल. सबब मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांना नवीन योजना सुनावणीचा व निकाल देण्याचा अधिकार नाही. सबब वरिल सर्व अर्ज ना मंजुर करण्यात यावे.

अर्जदार सोहेल जुलफेकार कुरैशी यांनी मा. उच्च न्यायालय औरंगाबाद येथे रिट पिटीशन क्र. ३१९०/२०२२ दाखल करुन विनंती केली होती की, आमची सुनावणी झाल्याशिवाय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी योजनेबद्दल कोणतेही आदेश पारित करुन नये. त्यावर न्यायालयाने दि. ०७/०३/२०२२ रोजी आदेश पारित करुन असे निदेश दिले आहेत की, सोहेल जुलफीकार कुरैशी यांनी त्यांचे लेखी निवेदन १० दिवसाच्या आत सादर करावे. सदरचे रिट पिटीशन निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत उपरोक्त प्रकरणावर मागील बैठक दि. १७/०५/२०२२ रोजी खालील प्रमाणे ठराव पारीत झालेले आहे.

ठराव क्रमांक ३५:-

सदर वक्फ संस्थेकरीता मॉडेल स्कीम बनविण्याकरीता ॲड.ए.यु.पठाण, ॲड.खालीद बाबु कुरेशी, डॉ.मुदस्सीर लांबे व मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समिति गठीत करण्यात यावी. सदर समितीने संस्थेची वक्फ डीड, मन्शा-ए-वक्फ इत्यादी बाबींचा विचार करुन आगामी १० दिवसात मॉडेल स्कीम बनवून सदर स्कीम मंडळाच्या पुढील बैठकीत सादर करावी.

**ठराव क्रमांकः- १९**

**"सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी प्राप्त सर्व योजनामंजुरीचे अर्ज, फेर बदल अर्ज व त्यावरील सर्व आक्षेप फेटाळण्यात येत असुन त्रिसदस्यीय समितीने सादर केलेली आदर्श योजना मंजूर करण्यात येत आहे. सदर योजनेतील तरतुदीनुसार विश्वस्तांच्या निवड करण्यासाठी निवडणुकीची प्रक्रिया राबविण्यात यावी"**

## (सियानत विभाग)

**विषय क्रमांक २०:-** **दर्गाह सय्यद शाह रजिऊद्दिन मक्की रहे, बीड च्या संबंधित वक्फ मिळकत सर्वे नं. ९५ पैकी जागा कालावधी १० वर्षासाठी भाडेपट्ट्यावर देण्याकरिता प्रस्ताव मंजुरीसाठी राज्य शासनाकडे पाठविणे बाबत.**

दर्गाह हजरत रजियोद्दिन मक्की साहेब रहे. बीड या वक्फ संस्थेची नोंद महाराष्ट्र शासन राजपत्र पार्ट.सी चे अनुक्रमांक ०७ वर असुन वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ३६ नुसार क्र.MSBW/BED/२२/२००७ अन्वये नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेच्या संबंधित इनाम जमीन सर्वे नं.९५ पैकी क्षेत्र ६०x१०० (६००० चौ.फुट) जागा कालावधी १० वर्षासाठी भाडेपट्टयावर देणे बाबतचा प्रस्ताव दि.१७/०५/२०२२ रोजी वक्फ मंडळाच्या बैठकीत ठेवण्यात आला होता. त्यावर वक्फ मंडळाने ठराव क्र. १२ अन्वये खालील प्रमाणे मान्यता दिलेली आहे.

सदर ठरावानुसार वक्फ मिळकत सर्वे नं. ९५ सिटीएस क्र. २४५३ पैकी क्षेत्र ६००० चौ.फुट जागा भाडेपट्ट्यावर देण्यासाठी वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ मधील नियम ७ पोट नियम (१) (सुधारीत नियम २०१५) नुसार प्रक्रिया पुर्ण करण्यात आली. सदरील वक्फ मालमत्तेचे बाजार मुल्यांकन प्रति चौरस मिटरचे दर रु.२४१५०/- इतके आहे व्यवसायीक प्रयोजनासाठी बाजार मुल्यांकनाचे २.५% प्रमाणे खालील प्लॉटचे मासिक भाडे आरक्षित करण्यात आले. लिजची प्रक्रिया पुर्ण करुन जाहीर प्रकटन वर्तमान पत्रात प्रिसिध्द करुन लिलाव करण्यात आले आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| प्लॉट क्रमांक | अर्जदारांचे नांव | क्षेत्रफळ | वक्फ मालमत्तेचे बाजार मुल्य | कार्यालयाने बाजार मुल्यांकन प्रमाणे आरक्षित किमान मासिक भाडे | लिलावामध्ये अर्जदारांनी नमुद केलेले कमाल दर |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | शेख मुजीब खाजा | ११७० चौ.फुट (१०८.७३ चौ.मि.) | रु.२६,२५,८३०/- | रु.५४५०/- | ६५००/- |
| २ | शेख माजेद शेख अब्दुल रऊफ | ११७० चौ.फुट (१०८.७३ चौ.मि.) | रु.२६,२५,८३०/- | रु.५४५०/- | ६९५१/- |
| ३ | शेख मोहम्मद कैफ | ११७० चौ.फुट (१०८.७३ चौ.मि.) | रु.२६,२५,८३०/- | रु.५४५०/- | ६०००/- |
| ४ | डॉ. प्रविण राहिदास ढगे | २००० चौ.फुट (१८५.८७ चौ.मि.) | रु.४४,८८,७६०/- | रु.९३६०/- | ९५००/- |
| ५ | शेख अजीम शेख बशीर | ४०० चौ.फुट (३७.१७ चौ.मि.) | रु.८,९७,६५५/- | रु.१८७०/- | २७००/- |

वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ व वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम-२०१४ (सुधारीत नियम २०१५ व २०२०) मधील तरतुदीनुसार ३ वर्षा पेक्षा जास्त व ३० वर्षापर्यंतच्या भाडेपट्टाकरारासाठी राज्य शासनाची पुर्व मंजुरी आवश्यक आहे. उपरोक्त प्रस्ताव कालावधी १० वर्षासाठीचा असल्याने वक्फ मंडळाच्या शिफारशीसह राज्य शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणे बाबतचा प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २०:-वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ मधील तरतुदींचे पालन झालेले असल्याने उपरोक्त प्रस्तावास मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे. प्रस्तावित भाडे करार १० वर्षांचा असल्याने या बाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.**

**विषय क्रमांक २१:-दर्गाह बुऱ्हानशाह वली, इदगाह व कब्रस्तान, जिंतूर रोड, परभणी च्या संबंधित इनाम जमीन सर्वे नं.६३६, ६३७ मधील एकूण ४० भाडेकरुच्या भाडे वसूली बाबत.**

दर्गाह बुऱ्हानशाह वली, इदगाह व कब्रस्तान, जिंतूर रोड, परभणी च्या संबंधित इनाम जमीन सर्वे नं.६३६, ६३७ मधील एकूण ४० भाडेकरुच्या भाडे वसूली बाबत वक्फ लिज रुल्स २०१४ च्या तरतुदीनुसार कायदेशिर अभिप्राय घेवून सदर अभिप्रायानुसार हा विषय वक्फ मंडळाच्या पुढील बैठकीत ठेवण्यात यावा असा ठराव वक्फ मंडळाच्या दि.१७/०५/२०२२ च्या बैठकीत झाला आहे.

सदर ठरावानुसार श्री.एम.ए.पठाण, वरिष्ठ विधी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी दि.१/८/२०२२ रोजी आपला अभिप्राय खालील प्रमाणे सादर केला आहे.

१. उपरोक्त प्रकरणता वक्फ मंडळाच्या बैठकी समोर ठेवलेल्या प्रस्तावात भाडे/लिजचा कालावधी नमुद नाही. वक्फ मंडळाचा निर्णय होतांना भाडे कालावधी (Lease Period) निश्चित होणे आवश्यक आहे.
२. सदर मिळकतीचा वापर वाणिज्य वापरासाठी (Commercial Shops) आहे. परभणी मंजुर विकास योजने प्रमाणे इदगाहच्या पश्चिमेस जिंतूर रोड पर्यंत चा भाग वाणिज्य वापरासाठी प्रस्तावित आहे. व येथे दुकानाचा वापर अनुज्ञेय आहे.
३. भाडे आकारणी हे क्षेत्रानुसार केली जाते. कमी क्षेत्र असेल तर भाडे कमी राहील.
४. रेडी रेकनर (शिघ्रसिध्द गणक) चे दर निवास व वाणिज्य वापरांसाठी वेगवेगळे असते. तसेच खुली जागा (Open Land) व बांधीत जागेसाठी (Built up area) साठी वेगवेगळे दर ठरविलेले असते.
५. २०१४ च्या लिज रुल्स चे नियम ७ नुसार आरक्षित किंमत (Reserve Price) प्रमाणे भाडे बाजार भाव किंमतीच्या ५% प्रती वर्ष नमुद आहे आणि अनामत रक्कम नियम ८ प्रमाणे

भाडेपट्टयाच्या कालावधीसाठी (Lease period) वेगवेगळे आहे. जसे एक वर्ष पेक्षा कमी कालावधीसाठी ३ महिण्याचे भाडे, १ वर्ष ते ५ वर्ष कालावधीसाठी ११ महिन्याचे भाडे ई.

६. नियम १९ (i) प्रमाणे दुकानासाठी पाच (५) वर्षापर्यंत भाडेकरार करता येतो.

७. वाणिज्य वापरांसाठी आरक्षित मूल्य (Reserve Price) बाजार मुल्याच्या किमान २.५% वार्षीक भाडे राहील.

८. नियम १७ मधील दुरुस्ती प्रमाणे वाणिज्य वापरांसाठी, शैक्षणिक व आरोग्य संबंधित वापरांसाठी शासनाच्या मंजुरीस अधिन राहून ३० वर्षापर्यंत लिज वाढविता येतो.

९. २०२० च्या लिज रुल्स प्रमाणे खालील प्रमाणे दुरुस्ती झाली आहे.

१०. नियम ७ आरक्षित मूल्य (Reserve Price) आहे.

११. नियम ७ (ब) वाणिज्य वापरासाठी आहे व बाजार मुल्याच्या २.५% पेक्षा कमी नाही.

१२. नियम ७ (२) प्रमाणे बाजार मूल्य म्हणजे दुय्यम निबंधक कडे दस्त नोंदणी होणारे दर म्हणजेच रेडी रेकनरचे दर राहतील अशी तरतुद आहे.

१३. तथापि, बोली (निविदा/Bid) दोन वेळा होऊन देखील दर निश्चित झाले नाही अशा वेळी मंडळाने या प्रयोजनासाठी नियुक्त समितीच्या शिफारशी वरुन आरक्षित मुल्याच्या कमी किमतीस २/३ मताधिक्याने मंजुरी होणे आवश्यक आहे.

१४. सदर प्रकरणात बोली (Bids) निविदा झालेल्या दिसुन येत नाही व समितीची नियुक्ती झालेली दिसत नाही.

१५. पुन्हा असे की, कमी केलेले दर हे बाजार मूल्याच्या १.५ टक्के पेक्षा कमी नसावे, कलम ८ मध्ये अनामत रक्कम व कलम १० मध्ये लिज रेट बाबत तरतुद आहे.

उपरोक्त कायदेशिर अभिप्राय वक्फ मंडळासमोर योग्य निर्णयासाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २१:- भाडे करार ठरविण्यासाठी वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम,२०१४ चे पालन करणे बंधनकारक आहे. सदर तरतुदीनुसार विहीत निविदा प्रक्रिया राबवुन भाडे करार करणे बाबत मु. का. अ. यांनी दि. २३.०८.२०२२ च्या पत्रान्वये सर्व क्षेत्रिय कार्यालयांना सुचित केलेले आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी.**

**विषय क्रमांक २२:-काली मस्जिद, जालनाच्या संबंधीत इनाम जमीन सर्वे नं. ५०८ पैकी क्षेत्र १२९.३५ चौ.मि. जागा रस्ता उपयोगासाठी भाडेतत्तवावर मिळणे बाबत.**

वक्फ संस्था काली मस्जीद, जालना ही संस्था वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत आहे. वक्फ संस्थेची सेवा इनाम जमीन सर्वे नं. ५०८ व ५०९ पैकी जागा काही लोकांना भाडेतत्वावर देण्यात आलेली आहे. सर्वे नं. ५०८ पैकी १२९.३५ (१३९२ चौ.फुट) जागा बाजार मुल्यांकन प्रमाणे रस्ता उपयोगासाठी भाडेतत्वावर मिळणेकामी श्री.मोहम्मद मतीन कुरेशी रा.जालना यांनी दि.२१/४/२०२२ रोजी जिल्हा वक्फ कार्यालय, जालना येथे अर्ज दिला आहे. जालना येथील सर्वे नं. १०/१ पैकी क्षेत्र ८२ आर जमीन अर्जदार यांनी इमरान खान लतिफ खान यांच्याकडून खरेदीखत द्वारे घेतली आहे. सदर मिळकती मध्ये ते प्लॉटींग करणार आहे त्यासाठी त्यांनी नगर रचना विभाग जालना यांच्याकडे दि. ३१/१२/२०२१ रोजी अर्ज देवून मंजुरी मागीतली होती परंतु सर्वे नं. ५१०/१ मध्ये डी.पी.रस्त्यासाठी वक्फ संस्थेच्या मालकीची इनाम जमीन सर्वे नं. ५०८ मधून जावे लागणार आहे त्यासाठी जमीन मालकाकडून पोहोच रस्ता उपलब्ध करुन घेणे बंधनकारक

असल्याने अर्जदार यांनी वक्फ मिळकत सर्वे न.५०८ पैकी क्षेत्र १२९.३५ चौ.मि. (१३९२ चौ.फुट) जागा भाडे आकारुन भाडेतत्वावर मिळणेस विनंती केली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी, जालना यांनी पत्र क्र. वक्फ/जिवअ-एसएनटी विभाग-४०/४२/२०२२ दि.२८/०४/२०२२ अन्वये अहवाल सादर करुन वक्फ संस्थेचे संरक्षण उत्पन्न वाढीसाठी अर्जदार यास उपरोकत जागा भाडेतत्वावर देण्याची शिफारस केली आहे.

निदर्शनास आणुन देण्यात येते की, यापुर्वी श्री. इमरान लतीफ खान यांनी दि.१२/१२/२०१९ रोजी सर्वे नं. ५०८ पैकी क्षेत्र ११ गुंठे जमीन रस्ता उपयोगासाठी भाडेतत्वावर मिळणेस विनंती केली होती. त्यावेळी वक्फ मंडळाचे विधी सल्लागार यांचा अभिप्राय घेण्यात आला होता त्यामध्ये त्यांनी दि.४/८/२०२० रोजी खालील प्रमाणे अहवाल दिला होता.

१) जालना येथील सर्वे न.५०८ एकूण क्षेत्र ७ हेक्टर ३० आर ही मिळकत काली मस्जीद जालना या वक्फ संस्थेच्या मालकीची असुन औरंगाबाद जालना या राज्या महामार्गालगत स्थित आहे. सदर मिळकतीतून १५ मिटर रुंदीचा डिपी रस्ता गेल्यामुळे सदर जमीनी विभागली गेली असुन सदर रस्त्याच्या दुसऱ्या बाजुला सुमारे ११ गुंठे जमीन सर्वे नं. ५०८ पैकी शिल्लक आहे.

२) सर्वे नं. ५०८ चा दक्षिणेला जुना सर्वे नं. ५१० आहे. अर्जदारांनी सदर सर्वे नं. ५१० पैकी ८२ गुंठे जमीन सुरेश विठ्ठलदास अगरवाल व इतरांकडून नोंदणीकृत खरेदीखताद्वारे दि.१७/१०/२०१३ रोजी विकत घेतली आहे.

३) अर्जदारांचे कथनानुसार त्यांनी सर्वे नं. ५१० पैकी विकत घेतलेले ८२ आर जमीनीत जाणेसाठी त्यांना रस्ता नसल्यामुळे सर्वे नं. ५०८ चे डिपी रोडचे दक्षिणेलगत असलेले ११ गुंठेचे क्षेत्र त्यांना भाडयाने मिळावे अशी विनंती केली आहे. जेणेकरुन त्यांना उत्तरेकडील डिपी रोडला जाता येईल.

४) अर्जदाराने शेत जमीन विकत घेतली असुन खरेदी खतात त्यांनी विकत घेतलेले जमीनीत कोणत्या बाजुने रस्ता आहे याचा उल्लेख नाही. स.न.५१० ही मोठी जमीन तीचे एकूण क्षेत्र ३ हेक्टर ८३ आर होते व त्यातुन गाडी रस्त्याचा उल्लेख ७/१२ उताऱ्यात दिसून येतो. भारतीय सुखाधिकार कायदा (Easement Act १८८२) चे तरतुदीनुसार एखादे विभागातील हिस्से वाटणी झाली असल्यास किंवा त्यापैकी मालकाने काही भाग विक्री अगर इतर प्रकारे हस्तांतरीत केले असल्यास छोटा भाग विकत घेतलेल्या जमीनीत जाणे येणेसाठी रस्ता देणेची जबाबदारी जमीनीचे मुळ मालकाची आहे व असे सुखाधिकार मुळ जमीनीतूनच मागता येतात.

५) सदर प्रकरणात अर्जदारांनी त्यांनी विकत घेतलेल्या हिस्से मध्ये जाणे येणेसाठी कोणते बाजुने रस्ता आहे याची शहानिशा न करता विकत घेतली आहे.

६) तथापि, त्यांनी घेतलेल्या जमीनीचे उत्तरेत लगतच्या ११ गुंठे जमीनीतून रस्ता वापरणेसाठी पूर्ण ११ गुंठे जमीन भाडयाने मागत आहे. कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर जमीनीचे आसपासच्या जमीनी या विकास आराखडयात निवासी उपयोगासाठी राखीव ठेवण्यात आलेले आहे. त्यामुळे सदर जमीनी मध्ये निवासासाठी फ्लॅटस व बंगले बांधता येतील व त्यासाठी प्लॉटस पाडता येतील. अर्जदाराचा हेतू सुध्दा त्यांनी घेतलेल्या जमीनीत प्लॉट पाडण्याचा असावा. तथापि, त्यांना खरेदीखतात या जमीनीत जाणे येणेसाठी रस्ता उपलब्ध करुन न घेतल्यामुळे प्लॉट पाडणे फायदेशीर ठरणार नाही. त्यासाठी त्यांना वक्फची ११ गुंठे जमीन भाडेपट्टयावर हवी आहे.

७) तथापि, भारत सरकारने पारित केलेल्या वक्फ मिळकत भाडेपट्टा नियम-२०१४ अन्वये ३० वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी वक्फ मिळकत भाडयाने देता येत नाही. शेती उपयोगासाठी फक्त ३ वर्षासाठी किंवा पिकाच्या कालावधी पर्यंत किंवा एक एक वर्षासाठी भाडयाने देता येतील.

सदर नियमात अमर्यादीत काळासाठी व खास करुन फक्त रस्त्यासाठी वक्फ मिळकत भाडेपट्टयावर देण्याचे प्रयोजन केलेले नाही.

८) तसेच अर्जदारांनी पुढे मागे त्यांचा मिळकतीत निवास उपयोगी पाडून ते विकून टाकल्यास अनेक लोक त्या मिळकतीचे मालक होतील व संपुर्ण मिळकत अर्जदाराने विकुन टाकले पुढे त्यांचा संबंध राहणार नाही. त्यामुळे जे लोक प्लॉट विकत घेतील त्यांचा बेकायदेशीर बोजा वक्फ मिळकतीवर पडेल. एकदा अर्जदारांनी संपुर्ण मिळकत विकुन टाकल्यास पुढे ते भाडे देणार नाही व मग भाडे कोणाकडून वसुल करावे याबाबत अनेक कायदेशीर अडथळे व अडचणी निर्माण होतील व विनाकारण कोर्ट खटले निर्माण होतील. त्यामुळे अर्जदारांना वक्फची मिळकत रस्त्यासाठी भाडयाने देणे कायदेशीर होणार नाही. सदर मिळकत वक्फ बोर्डाला व्यापारी संकुल व गाळे बांधुन भाडयाने देणे, किंवा दवाखाना, शाळा, कॉलेज यासाठी ३० वर्षापर्यंत भाडयाने देता येईल. अर्जदाराच्या अर्जावर या कारणास्तव विचार करता येत नाही. त्यासाठी वर तपशिलात दिले प्रमाणे कायदेशीर अडचण आहे.

आता इमरान लतीफ खान यांनी त्यांच्या मालकीची ८२ आर जमीन अर्जदार मोहम्मद मतीन कुरेशी रा.जालना यांना विक्री केली आहे. त्यांनी वक्फ मिळकत सर्वे न.५०८ पैकी क्षेत्र १२९.३५ चौ.मि. (१३९२ चौ.फुट) जागा रस्ता उपयोगासाठी भाडेतत्वावर मिळणेस विनंती केली आहे. सदर प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करणे बाबत मा.डॉ.मुदस्सीर लांबे, सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांच्या निदेशानुसार वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २२:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

**विषय क्रमांक २३:-मस्जिद ए इब्राहिम व दिनी मदरसा (मकबत) मौजे कोळपा, ता. जि. लातुर या नावाने जागा खरेदी करण्यासाठी रक्कम मिळणे बाबत.**

जिल्हा वक्फ अधिकारी लातुर यांनी पत्र क्र. वक्फ/SNT/६२/२०२२ दिनांक १३/०५/२०२२ अन्वये अहवाल सादर केला आहे की, मौजे कोळपा, ता. जि. लातुर येथील वक्फ संस्था मस्जिद ए इब्राहिम व दिनी मदरसा (मकबत) ही संस्था वक्फ मंडळात क्रमांक MSBW/LTR/३०४/२००७ अन्वये नोंदणीकृत होती. परंतु राष्ट्रीय महामार्ग क्र. ३६१ करिता सदर मस्जिद संपादीत झालेली आहे. त्याचा भुसंपादन मावेजा रक्कम रूपये ४३,९४८३४/- वक्फ मंडळात जमा आहे. अर्जदार बडे साब अब्दुलसाब अध्यक्ष, मस्जिद ए इब्राहिम व दिनी मदरसा व सचिव मुस्तफा रशीद सय्यद यांनी दिनांक १७/०६/२०२१ रोजी अर्ज देवून मस्जिदसाठी दुसरी जागा खरेदी करून बांधण्याकरिता वक्फ मंडळाचे खात्यात जमा असलेली रक्कम ४३,९४८३४/- रूपये मस्जिद कमेटीला देण्याची विनती केली आहे. त्याचे म्हणणे आहे की, सदर गावामध्ये मुस्लिम समाजाची घरे जास्त असल्याने नमाज पठणसाठी दुसरी जागा उपलब्ध नाही. मस्जिदसाठी दुसरी जागा देण्याकरीता श्री. बिलाल खान इब्राहिम खान पठाण यानी २ गुंठे जमीनसाठी रू. ३५ लाख मध्ये देण्याचे सहमती दिली आहे. सदरील जागा खुली असुन रोड पासुन जवळपास ५० फुट सोडुन सर्वे नं. ६२ मध्ये आहे. सदर जागा खरेदी करण्यासाठी अर्जदार वक्फ संस्थेचे अध्यक्ष व सचिव यानी विनंती केली असुन जिल्हा वक्फ अधिकारी लातुर यांनी शिफारस केली आहे. सदर प्रस्ताव वक्फ मंडळासमोर सादर करणे बाबत मा. समीर गुलाम काजी, सदस्य, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, यांनी निर्देश दिले आहे.

**ठराव क्रमांक २३:- सदर विषय पुढील बैठकीत ठेवण्यात यावा.**

## विषय क्रमांक २४:-

**आशुरखाना मौलाली मौजे रत्नाळी ता.धर्माबाद जि.नांदेड या वक्फ संस्थेची इनाम जमीन गट क्र.१६०/अ व १६०/ब विकसीत करुन समाजाच्या गरीब आणि दारिद्रय रेषेखालील लोकांना शासनाच्या योजने अंतर्गत घरे बांधून अल्पदरात देण्यासाठी दिर्घ मुतदीचे करारावर देणे बाबत.**

आशुरखाना मौलाली मौजे रत्नाळी ता.धर्माबाद जि.नांदेड ची नोंद शासन राजपत्र दि.२७/५/१९७५ च्या अनुक्रमांक ३९ वर असुन मानीव नोंदणीकृत वक्फ संस्था आहे. सदरील वक्फ संस्थेची इनाम जमीन गट क्र.१६०/अ व १६०/ब एकूण क्षेत्र १४ एकर ०५ गुंठे जमीन पडीत अवस्थेत आहे त्यामध्ये जंगली, बाभळाची झाडे आलेली आहे. सदर मिळकती मध्ये अनेक लोकांनी अनाधिकृतपणे अतिक्रमण करुन कच्चे व पक्के घरे बांधले होते त्या लोकांविरुध्द दि.११/०३/२०१९ रोजी पोलीस स्टेशन धर्माबाद येथे FIR दाखल करण्यात आले असुन जेसीबी द्वारे सर्व अतिक्रमण हटविण्यात आले आहे. सदर मिळकत वक्फ मंडळाच्या ताब्यात घेवून वक्फाचे नावाने बोर्ड त्या ठिकाणी लावण्यात आले आहे.

उपरोक्त जमीन तहसील रोड वर असुन महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत आहे परंतु सदर मिळकतीस तार फेन्सींग नसल्याने त्यावर अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदरील जमीनीचे बेकायदेशीर खरेदी विक्री, बांधकाम होवू नये यासाठी सय्यद मुख्तार सय्यद फय्याज रा.बळीरामपुर नांदेड यांनी सलीम शहा पिरबाबु व इतर यांच्या विरुध्द मा.महाराष्ट्र वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे वक्फ अर्ज क्र.१४/२०१७ दाखल करुन मनाई हुकूम मिळविला आहे.

सदर वक्फ संस्थेला सध्या कोणीही मुतवल्ली नाही. अर्जदार सय्यद मुख्तार सय्यद फय्याज यांनी दि.८/७/२०२२ रोजी अर्ज देवून वक्फ मिळकत गट क्र. १६०/अ व १६०/ब एकूण क्षेत्र १४ एकर ०५ गुंठे जमीन विकसीत करुन समाजाच्या गरीब व दारिद्रयरेषेखालील लोकांना शासनाच्या योजने अंतर्गत घरे बांधून अल्पदरात देण्याचे ठरविले आहे त्यासाठी सदर मिळकत त्यांना दिर्घ मुतदीचे भाडेकरारावर देण्याची विनंती केली आहे.

जिल्हा वक्फ अधिकारी, नांदेड यांनी त्यांचे पत्र क्र.जिवअ-२२१/नांदेड/एसएनटी विभाग/३४०/२०२२ दि.२६/०८/२०२२ रोजी अहवाल सादर केला आहे की, वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५६ तसेच वक्फ मालमत्ता भाडेपट्टा निमय-२०१४ सुधारीत नियम २०१५ व २०२० मधील तरतुदीनुसार दुकान, शितगृह, विवाहगृह, लघुउद्योग, शॉपींग मॉल, निवासी इमारत, हॉटेल, रेस्टॉरेंट, सराए, शाळा, महाविद्यालय, रुग्णालय, मदरसा, मक्तब व कृषि या प्रयोजनासाठी वक्फाची जागा भाडेतत्वावर देता येते.

याबाबत नमूद करण्यात येते की, प्रस्तावित वक्फ मालमत्तेवर अल्प दरात घरे बांधण्यात आल्यानंतर विकासकाडुन सदर घरे उप-भाडेकरार देण्यात येतील तथापी, वक्फ भाडेपट्ट नियम २०१४ मधील कलम १७ नुसार वक्फ मालमत्ता उप-भाडेकरारावर (Sub-Lease) देण्यातस मनाई आहे. यासंदर्भात कलम १७ आणि कलम १९ मधील तरतुदीनुसार विसंगती आहे. सबब, यासंदर्भात चर्चा होऊन योग्य निर्णय घेण्यासाठी विषय मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २४:-** **सदर वक्फ मालमत्ता वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ३२ (४ व ५) येथील तरतुदी नुसार कशाप्रकारे विकसीत करण्यात येतील याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी व श्री. पठाण, विधी अधिकारी यांची समिती गठीत करण्यात येत आहे. सदर समितीने १५ दिवसांच्या आत सविस्तर अहवाल वक्फ मंडळा समोर सादर करावा.**

## (अतियात विभाग)

**विषय क्रमांक २५:- महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळाच्या अखत्यारीखीत वक्फ़ संस्था मध्ये मुतवल्ली नेमणे बाबत.**

वक्फ़ अधिनियम १९९५ चे कलम ६३ नुसार मुतवल्लीना तात्पुरते स्वरुपात नेमण्यासाठी निकष निश्चित करण्याकरीता, सन्माननीय सदस्य डॉ.मुद्दसीर लांबे, सन्माननीय सदस्य श्री. समीर काझी सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळ औरंगाबाद तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळ औरंगाबाद यांची त्रिसदस्यिय समीती गठीत करण्याबाबत वक्फ़ मंडळाच्या दि. १७/०५/२०२२, च्या बैठकीतील ठराव क्र.१४, अन्वये निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार गठीत समितीने अहवाल सादर केला असुन मुतवल्लीपदासाठी पुढील प्रमाणे अटी व शर्ती प्रस्तावीत केले आहे.

1) The Mutwalli, who proves legal succession by way of Muntaqab and by way Succession by Deputy Collector Atiyat, be appointed as Mutwalli.
2) Temporary Mutawalli should prove its branch in a legal way for appointment for temporary Mutwalli.
3) If the holding Mutawalli could not prove his Mutwalliship, the committee should be appointed in his place.
4) Any objection regarding the appointment of Mutwalliship arises; it should be examined by the Chief Executive Officer and be produced before the Board with recommendation and evidence documents.

याबाबत नमुद करण्यात येते की, राज्य शासनाने महाराष्ट्र राज्य वक्फ़ नियम, २०२२ अधिसुचित केले असुन त्यामधील नियम क्र.३ अन्वये मुतवल्लीपदाचे निकष विहित केले आहे. सदर निकष पुढील प्रमाणे आहे.

## QUALIFICATIONS OF MUTAWALLI

**3. Qualifications of mutawalli:-**

1) The mutawalli shall be a citizen of India.
2) The mutawalli shall be of minimum 18 years of age
3) Qualification of a mutawalli of a waqf shall be such as may be specified by a waqf in the waqf deed:
   Provided that, the Board may amend, alter or replace the qualifications specified by the waqf, if deemed fit.
4) Where no qualifications are specified by the waqf, a mutawalli shall have,-
   a) Knowledge of English, Urdu, Hindi, Marathi or the regional language of the place where the waqf property is situated;
   b) Knowledge of waqf law;
   c) Working knowledge of Sharia; and
   d) Perfect physical and mental health ;
   e) He should be an undercharged insolvent;

Provided that, where no qualifications are specified by a waqf under sub-rule 3) or no person having the qualification specified under this sub-rule is available, the Board may appoint any suitable person or a

qualified graduate from any recognized collage or university as the mutwalli for the concerned waqf.

**ठराव क्रमांक २५:-** **समितीच्या अहवालातील मुद्दा क्र. २ वगळता अन्य शिफारशी स्विकारण्यात येत आहे. सदर शिफारसी तसेच महाराष्ट्र राज्य वक्फ नियम, २०२२ मधील नियम क्र. ३ नुसार मुतवल्ली बाबतच्या अर्जाची छाननी करुन प्रस्ताव वक्फ मंडळाच्या मान्यतेस्तव सादर करण्यात यावेत.**

**विषय क्रमांक २६:-** **वक्फ़ संस्था हुरमेनशाह व कब्रस्थान बीड हि वक्फ़ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळाच्या रास्त निगराणीत घेणे बाबत.**

वक्फ़ संस्था दर्गाह हाजी हुरमेजशाह साहेब व कब्रस्थान हि वक्फ़ संस्था नोंदणीकृत असुन ज्याचा नोंदणी क्र.मरावम/बीड/२१२/२०१०, दि. १३/०७/२०१० असा आहे. तसेच या वक्फ़ संस्थाची मालमत्ता सर्वे नं./गट नं. ०४ क्षेत्रफ़ळ ५ हेक्टर ३० आर व सर्वे नं./गट नं. ११५ क्षेत्रफ़ळ १८ हेक्टर ३२ आर अशी आहे. या वक्फ़ संस्थेच्या देखरेख करण्यासाठी कोणीही नसल्याने महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळ कार्यलयाच्या दि. ३०/०४/२०११, च्या आदेशान्वये श्री. शेख कादर पिता बाबामियाँ रा. बीड, यांना तात्पुरते मुतवल्ली नियुक्ती करण्यात आली होती. सदर नियुक्ती आदेशामध्ये खालील प्रमाणे अटी व शर्ती टाकण्यात आले होत्या.

१) सदर वक्फ़ संस्थेची सेवा इनाम जमीन किंवा मालमत्ता विना परवानगी वक्फ़ बोर्ड हस्तांतरीत किंवा लीझ करण्याचा अधिकार राहणार नाही.
२) सर्व मालमत्तेची निगराणी व देखभाल व सेवा करण्याची जबाबदारी मुतवल्ली वर राहील.
३) वरील अटीचा उल्लंघन केल्यास विना नोटीस सदर आदेश रद्द करण्यात येतील.

तथापि, श्री. शेख कादर पिता बाबामियाँ (तात्पुरते मुतवल्ली) यांनी दि. १९/०१/२०१८, रोजी एक करारनामा केला असुन वक्फ़ची १८ एकर जमीन २,८०,००००/- रुपये अक्षरी ( दोन कोटी ऐंशी (८०) लाख) मध्ये त्रयस्थ व्यक्तीस विक्री केली असल्याचे तक्रार या कार्यलयास प्राप्त झाली आहे. सदर तक्रार गंभीर स्वरुपाची असुन प्राथमीक दृष्ट्या सदर तक्रारी मध्ये तथ्य असल्याचे निषपन्न होत आहे. सबब प्रस्तुत प्रकरणी सखोल चौकशी करण्याची आवश्यकता असल्याने श्री. शेख कादर यांची तात्पुरते मुतवल्ली म्हणुन करण्यात आलेली नियुक्ती रद्द करुन सदर वक्फ़ संस्था वक्फ़ अधिनियम १९९५ चे कलम ६५ अन्वये महाराष्ट्र राज्य वक्फ़ मंडळाच्या रास्त निगराणीत घेण्याचे प्रस्तावीत आहे.

**ठराव क्रमांक २६:-** **तात्पुरते मुतवल्ली म्हणुन श्री. शेख कादर यांची नियुक्ती तात्काळ रद्द करुन त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात यावा. तसेच कलम ६५ अन्वये सदर वक्फ संस्था वक्फ़ मंडळाच्या रास्त निगराणीत घेण्यात यावी.**

## (विधी विभाग)

**विषय क्रमांकः- २७ - ॲड जावेद आर शेख, यांची मानधनावर नियुक्ती करणे बाबत.**

वक्फ मंडळाच्या सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित एस.एल.पी तसेच एस.बी.यु.टी. शी संबंधीत प्रकरणे हाताळण्यासाठी ॲड जावेद आर शेख यांची ०१/०१/२०२० पासुन रुपये २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार) मानधनावर नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीचा कालावधी २८/०२/२०२२ रोजी संपुष्टात आलेला आहे. न्यायालयीन कामकाजामध्ये त्याची मोठाप्रमाणावर मदत होत आहे. त्यांना उच्च न्यायालयातील तसेच काही प्रकरणे महाराष्ट्र वक्फ न्यायधिकरणातील देखील देण्यात आली आहेत. या शिवाय वक्फ मंडळाला विविध प्रकरणात विधी विषयक सल्ला देखील त्याच्या कडुन घेण्यात येतो. करीता त्यांची नियुक्ती करणे बाबत.

**ठराव** - ॲड जावेद आर शेख यांना दिनांक २८/०१/२०२२ रोजी महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाची ६९ ची बैठकी मधील ठराव क्रामाक ३१ अन्वये आदेशीत करण्यात आले होते की, त्यांची मानधनावर नियुक्ती पुढे चालु ठेवण्यासाठी त्यांच्या कडुन मा. सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व इतर न्यायालयात वक्फ मंडळाच्या वतीने दाखल केलेल्या प्रकरणांची अद्यावत माहिती पुढील बैठकीमध्ये सादर केल्यावर त्याची नियुक्ती पुढे चालु ठेवण्या संबधी निर्णय घेण्यात येईल असा ठराव मंजुर करण्यात आलेला होता.

सबब श्री. जावेद आर शेख यांच्या कडुन वरील ठरावातील मसुदया प्रमाणे माहिती घेवुन ती वक्फ मंडळाच्या पुढील बैठकीत करण्यात यावी. त्यानंतर त्याच्या नियुक्ती बाबत निर्णय घेण्यात येईल. असा ठरावा एकमताने मंजुर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २७:- श्री. ॲड जावेद आर शेख, यांना सहा महिन्यासाठी (जुन -२०२२ ते नोव्हेंबर २०२२) रुपये २.५ लाख प्रतिमहा या मानधनावर त्यांची नियुक्ती कायम ठेवण्यात येत आहे.**

**विषय क्रमांकः-२८-** वक्फ मंडळाच्या नियमीत विधी विषयक कामकाज / विविध प्रकारचे सुनावण्या बाबतची अद्यावत माहिती तयार करुन मंडळापुढे ठेवणे. मंडळाने आदेश दिल्यानंतर ते कच्चे स्वरुपात तयार करणे त्यानंतर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी याच्या आदेशान्वये त्यास पक्के आदेशाचे स्वरुप देऊन ते पारीत करणे व विधी विषयक सुनावणीचे सपुंर्ण कामे पार पाडण्याकरीता **श्री. आर.यु. शेख से.** न्यायालयीन अधिक्षक अहमदनगर यांच्या नेमणुकीस **मुदत वाढ देण्याबाबत** व मानधनात वाढ करणे बाबत.

**ठराव** - महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ औरंगाबाद यांच्या दिनांक २६/०६/२०२१ च्या ठराव क्र. २५ व २६ अन्वये श्री आर. यु . शेख लिगल स. ऑफीसर यांना दिनांक ०२/०८/२०२१ पासुन रुपये ३०,०००/- प्रति महिना प्रमाणे एक वर्षा करीता नेमणुक करण्यात आली होती.

**सदरील कालावधीत त्यानी खालील प्रमाणे कामे पार पाडलेले आहे.**

१) सन १९९६ ते सन २०२१ पर्यत एकुन २५ वर्षाचे महाराष्ट्र राज्य वक्फ प्राधिकरणा कडील सर्व प्रकारचे प्रलंबित व निकाली प्रकरणे उदा. दावे, अर्ज, अपील, एम.ए यांची वेगवेगळी वर्गवारी करुन प्रत्येक सालाचे निकाली केसेसचे गठ्ठे तयार करुन त्या त्या सालातील केसेस ची संगणकावर यादया तयार करुन ते सर्व अपडेट केलेले आहे.

२) सन १९९६ ते सन २०२१ पर्यत एकुण २५ वर्षाचे मा. सर्वोच्च न्यायालय दिल्ली, मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद तसेच नागपुर येथील वक्फ मंडळाचे संपुर्ण केसेसची छाननी करुन रिटपीटीशन, सी.आर.ए, एम.ए., कंन्टेंम्ट पीटीशन, सेकंड अपील, सिव्हील अर्ज, पी.आय.एल यांचा निकाली अथवा प्रलंबीत असल्या बाबत ई-कोर्ट प्रणालीवर शोध घेऊन संगणकावर यांदी बनवुन सर्व केसेसचे गठ्ठे तसेच प्रलंबीत प्रकरणे अपडेट केलेले आहे.

३) वरील सर्व न्यायालयाचे केसेसचे रजिस्टर मेंटेन केलेले आहे. त्याच प्रमाणे सर्व न्यायालयाचे वेगवेगळे केसेसचे बॅलेन्सशिट बनविलेले आहे.

४) वरील कामे पुर्ण झाल्यानंतर त्यांना वक्फ मंडळातील सर्व विभागाच्या सुनावणीच्या सर्व प्रकरणाचा चार्ज देण्यात आलेला आहे त्यानुसार सुनावण्या बाबत सर्व माहिती अद्यावत करुन मंडळापुढे ठेवणे मंडळाणे आदेश दिल्यानंतर कच्चे स्वरुपात सर्व प्रकरणाचे आदेश तयार करणे त्यानंतर मा. मुख्य कार्याकारी अधिकारी याच्या आदेशाने त्यास पक्के आदेशाचे स्वरुप देऊन ते पारीत करणे तसेच विधी विषयक सुनावणीची सर्व कामे त्यांना सोपविण्यात आलेली आहे.

५) वक्फ मंडळातील कलम ५४ अन्वये सुनावणीतील सर्व प्रकरणांचा चार्ज त्याच्याकडे देण्यात आलेला आहे. त्यांनी त्याप्रमाणे सर्व प्रकारची ५४ ची कार्यवाही करुन मुख्य कार्यकारी अधिकारी हे ज्या प्रमाणे आदेश देतील त्याप्रमाणे निकालपत्र तयार करणे इत्यादी कामे त्याना सोपविलेली आहे.

सबब वरील सर्व प्रकारचे नियमित विधी विषयक कामकाज हे जबाबदारीचे कामे श्री. आर.यु. शेख यांनी आज अखेर व्यवस्थितरित्या पार पाडलेले आहेत. त्यांना सोपविण्यात आलेले जबाबदारीचे कामे याचा विचार करुन त्यांना दिनांक ०१/०८/२०२२ पासुन रुपये ५० हजार मानधनावर पुढील आदेशापर्यंत नियुक्ती करण्याच्या अनुषंगाने वक्फ मंडळाच्या विचारार्थ प्रस्ताव सविनय सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २८:- श्री. आर.यु.शेख यांना रुपये ३५ हजार प्रतिमहा या मानधनावर सहा महिन्यासाठी मुदतवाढ देण्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे.**

**विषय क्रमांक २९:- ॲड मोहम्मद एकबाल हुसेन यांची म.रा.व.मंडळात लिगल सेल ऑफिसर किंवा लिगल ॲडव्हाईजर म्हणुन काम करण्याची संधी देणे बाबत.**

ॲड मोहम्मद एकबाल हुसेन यांनी दिनांक २७/०८/२०२२ रोजी अर्ज देऊन विनंती केली आहे की म.रा.व.मंडळात लिगल सेल ऑफिसर किंवा लिगल ॲडव्हाईजर म्हणुन काम करण्याची संधी देणे बाबत त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, त्यांना वकीली व्यवसायाचा १५ वर्षाचा अनुभव असुन २०१४ साली वक्फ मंडळामध्ये पॅनल ॲड म्हणुन त्यांची नेमणुक झाली होती. तसेच २०१७ साली त्यांची म.रा.व. न्यायधिकरणावर सदस्य म्हणुन नियुक्ती करण्यात आली होती त्यांची मुदत ०९/०८/२०२२ ला संपलेली आहे. त्यांना वक्फ नियमाचे चांगले ज्ञान आहे तरी त्यांची म.रा.व.मंडळात लिगल सेल ऑफिसर किंवा लिगल ॲडव्हाईजर म्हणुन नेमणुक करावी अशी विनंती केलेली आहे तसेच त्यांची सनद, ओळखपत्र राज पत्राची प्रत जोडलेली आहे.

वरील पत्र प्राप्त झाले नंतर सदरील पत्र मा. सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांच्या समोर ठेवणे उचित होईल सबब महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या बैठकीपुढे विचारार्थ प्रस्ताव सविनय सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांक २९:- सदर विषय पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.**

## (संकिर्ण विभाग)

**विषय क्रमांक ३०:-**

राज्यातील वक्फ मालमत्तांचे संरक्षण, व्यवस्थापन, नियमन करण्याची प्राथमिक जबाबदारी वक्फ मंडळाची आहे. वक्फ संस्थांचे व्यवस्थापन करण्यासाठी मंडळाकडून मुतवल्ली/व्यवस्थापन समिती नियुक्त करण्यात येतात. संबंधित मुतवल्ली/व्यवस्थापन समिती यांनी वक्फ अधिनियम, १९९५ मधील तरतुदींनुसार वक्फ मालमत्तेची देखरेख/व्यवस्थापन करणे अभिप्रेत आहे. तथापि, त्यांच्याकडून नियमांचे पालन होत नसल्याची तक्रारी कार्यालयास प्राप्त होत आहेत.

राज्यातील सर्वसामान्य जनतेमध्ये देखील वक्फ अधिनियमाबाबत पुरेशी जागृतता नाही. त्यामुळे वक्फ मालमत्तेची खरेदी/विक्री, गहाण ठेवणे, नियमबाह्य भाडेकरारकरणे अशा घटना जाणते-अजाणतेपुर्वक घडत असून वक्फ मालमत्तेचे आतोनात नुकसान होत आहे.

सबब, वक्फ मंडळातर्फे नियुक्त मुतवल्ली/व्यवस्थापन समिती यांनी नियमानुसार कार्यवाही करण्यासाठी तसेच जनतेमध्ये वक्फ अधिनियमाबाबत जागृती करण्यासाठी खालीलप्रमाणे जाहिरात वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करण्याचे प्रस्तावित आहे :-

**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ**
**(केंद्रीय वक्फ अधिनियम १९९५ अंतर्गत महाराष्ट्र शासनद्वारा गठीत संविधानिक मंडळ)**
**पनचक्की औरंगाबाद- ४३१००१ (दुरध्वनी क्रमांक ०२४०- २९९१२५९)**
(email—ceomsbw@gmail.com Website- -mahawakf.com)

**वक्फ मालमत्तेसंदर्भात मुतवल्ली / व्यवस्थापन समिती यांना दिशानिर्देश**

महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाच्या ७४ व्या बैठकीतील पारित ठराव क्रमांक ३१ च्या अनुषंगाने राज्यातील वक्फ संस्थांच्या मुतवल्ली/व्यवस्थापन समिती यांना खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत :-

अ) **व्यवस्थापन :-**

१) वक्फ संस्थांचे व्यवस्थापन पाहण्याचे अधिकार केवळ महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाने नेमलेल्या मुतवल्ली/व्यवस्थापन समिती यांनाच आहेत.

२) वक्फ संस्थांच्या नांवे राष्ट्रीयकृत बँकेत खाते उघडण्यात यावे. २ किंवा अधिक ट्रस्टींच्या स्वाक्षरीनेच बँक खात्याचे व्यवहार करण्यात यावे. कोणत्याही परिस्थितीत खाजगी व्यक्तीच्या/मुतवल्लीच्या नावे खाते उघडण्यात येऊ नये. सद्यस्थितीत खाजगी व्यक्तीच्या नांवे खाते सुरु असल्यास संस्थेच्या नांवे खाते उघडून त्यामध्ये रक्कम तात्काळ वर्ग करण्यात यावी. अन्यथा संबंधितांवर फौजदारी स्वरुपाची कारवाई करण्यात येईल.

३) वक्फ फंड नियमित स्वरुपात जमा करण्याची जबाबदारी मुतवल्ली/व्यवस्थापन समितीच्या पदाधिका-यांची आहे.

४) मुख्य कार्यकारी अधिकारी वा त्यांनी प्राधिकृत केलेले कर्मचारी दफ्तर तपासणीसाठी आल्यास त्यांना वक्फ संस्थेशी आवश्यक ती कागदपत्रे उपलब्ध करुन देणे बंधनकारक आहे.

ब) **वक्फ मालमत्ता :-**

१) मंडळातर्फे नियुक्त करण्यात आलेले मुतवल्ली/व्यवस्थापन समिती यांना केवळ व्यवस्थापनाचे अधिकार आहेत. वक्फ मालमत्तेचे कोणतेही मालकी हक्क त्यांना प्राप्त होत नाहीत. सबब, कोणत्याही त्रयस्त व्यक्तीने वक्फ मालमत्तेसंदर्भात मुतवल्ली/व्यवस्थापन समिती यांच्यासमवेत वक्फ मालमत्ता खरेदी-विक्रीचे व्यवहार व्यवहार करु नये.

२) वक्फ मालमत्ता गहाण ठेवणे, विक्री करणे, वक्फ मालमत्तेची आदलाबदल करण्यास वक्फ अधिनियम, १९९५ अन्वये प्रतिबंध आहे. वक्फ मालमत्तेसंदर्भात खरेदी, विक्री, गहाण ठेवणे इ. व्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांविरुद्ध मंडळातर्फे फौजदारी गुन्हे दाखल करण्यात येतील.

३) वक्फ मंडळाच्या पुर्वपरवानगीशिवाय वक्फ मालमत्तांवर कोणत्याही स्वरुपाचे कच्चे/पक्के बांधकाम करण्यात येऊ नये वा करण्यास परवानगी देण्यात येऊ नये. विनापरवानगी असे बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आल्यास सदर बांधकाम थांबवून त्याबाबत वक्फ मंडळास सुचित करण्याची जबाबदारी संबंधित जबाबदारी मुतवल्ली/व्यवस्थापन समिती यांची राहील.

४) वक्फ मालमत्तेच्या उत्पन्नातून वक्फ मंडळाच्या पुर्वपरवानगीशिवाय कोणतीही अचल संपत्ती खरेदी करण्यास वक्फ अधिनियमान्वये मनाई आहे.

क) **भाडेकराराबाबत :-**

१) वक्फ मालमत्ता भाड्याने देण्याबाबत केंद्र शासनाने पारित केलेल्या वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम, २०१४ (सुधारणा २०१५ व २०२०) चे तंतोतंत पालन करण्यात यावे.

२) वक्फ मंडळाच्या पुर्वपरवानगीशिवाय एक वर्षापेक्षा जास्त कालावधीकरीता करण्यात आलेले भाडेकरार कायद्यान्वये अवैध असून असे भाडेकरार रद्द समजण्यात येतील.

३) भाडेपट्टा नियमातील विहित प्रक्रिया राबवून बाजारमुल्यानुसार सर्वात जास्त बोली देणा-यास केवळ १ वर्षाच्या कालावधीसाठी वक्फ मालमत्ता भाडेकरारावर देण्याचे अधिकार मुतवल्ली/व्यवस्थापन समिती यांना आहेत. त्यापेक्षा जास्त कालावधीसाठी मंडळाची पुर्वपरनावगी बंधनकारक आहे.

४) वक्फ संस्थांनी लेखी स्वरुपात भाडेकरार करावा व त्याची एक मंडळास सादर करावी. भाडेकरुंची यादी वक्फ मंडळास दरवर्षी सादर करणे अनिवार्य आहे.

५) मुतवल्ली/व्यवस्थापन समिती वा त्यांच्या कुटुंबियांना (वैवाहिक जोडीदार, आई-वडील, आपत्ये, भाऊ-बहिण वा त्यांचे जोडीदार/आपत्य) वक्फ मालमत्ता भाडेतत्वावर घेण्यापासून मनाई आहे.

६) वक्फ मंडळा समवेत करार करण्यात आलेल्या भाडेकरुस पोट भाडे करार करण्यास मनाई आहे.

उपरोक्त निर्देशांचे पालन न केल्यास वक्फ मंडळामार्फत संबंधितांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

**मुख्य कार्यकारी अधिकारी**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद**

उपरोक्त जाहिरात राज्यातील २ मराठी व २ उर्दू १ हिंदी वृत्तपत्रांमध्ये राज्यस्तर आवृत्तीमध्ये प्रसिद्ध करण्याचे प्रस्तावित असून यासाठी अंदाजित रु. ४-५ लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे.

**ठराव क्रमांक ३०:-** **सदर ठराव मान्य करण्यात येत आहे. या बाबत होणारा खर्च राज्य शासनाकडुन प्राप्त झालेल्या अनुदानातून भागविण्यात यावा. उपरोक्त नियमावली संबंधित कायदयाच्या प्रतीसह राज्यातील महत्वपुर्ण वक्फ संस्थांना पत्राद्वारे देखील कळविण्यात यावी. सदर पत्राची प्रत संबंधीत प्रादेशिक व जिल्हा वक्फ कार्यालयाकडुन वक्फ संस्थांना पोहोच करुन त्याची पोहोच पावती वक्फ मंडळास सादर करावी.**

**विषय क्रमांक ३१:- धर्माधाय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त नस्तांचे स्कॅनिंग करणेबाबत**

धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त नोंदणीच्या जवळपास ५००० संचिका महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे हस्तांतरीत झालेल्या आहेत. या संचीकांसह कार्यालयातील अन्य महत्वाच्या कागदपत्रांचे स्कॅनिंग करणे आवश्यक असल्याने ई-टेंडर द्वारे निविदा मागवून कार्यवाही करण्यास व त्यासाठी रुपये १० लक्ष इतका खर्च करण्यास मंडळाच्या दिनांक १७.०५.२०२२ च्या बैठकीत (ठराव क्रमांक २२) मान्यता देण्यात आलेली आहे.

याबाबत नमूद करण्यात येते की, या कामकाजासाठी जास्तीचा खर्च अपेक्षित आहे. धर्मादाय आयुक्तांकडून प्राप्त संचिका अत्यंत जिर्ण झालेल्या असून त्यामध्ये अत्यंत महत्वाची कागदपत्रे आहेत. सदर कागदपत्रांना कोणतीही हानी न होता कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी अनुभवी संस्थेची निवड करणे आवश्यक आहे. वक्फ कामकाजाशी संबंधित महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरणाकडे त्यांच्या नस्त्यांचे स्कॅनिंग सुरु आहे. सदर संस्थेस काम देण्याबाबतचा प्रस्ताव मंडळाच्या विचारार्थ सादर.

**ठराव क्रमांक ३१:-** **सुरुवातीच्या टप्यामध्ये अत्यंत जिर्ण झालेले १लाख कागदपत्राचे स्कॅनिंगचे काम उपरोक्त संस्थेस देण्यात यावेत. सदर संस्थे समवेत वाटाघाटी करुन वक्फ न्यायाधिकरनाने अंतिम केलेल्या दरा पेक्षा कमी दरात काम करण्याची संस्थेची तयारी असल्यास त्यांना कार्यादेश देण्यात यावेत.**

**विषय क्रमांक ३२:-** **दर्गाह शाह बेरीया, सिटी चौक, औरंगाबाद येथील वक्फ मालमत्तेवर अतिक्रमण करणाऱ्यांचे विरुध्द वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२-अ सह भा.द.वि. कलमान्वये फौजदारी गुन्हा दाखल करणे बाबत.**

श्री. मो.अजहर खान अकबर खान रा.प्लॉट नं.९/बी आरिफ कॉलोनी, औरंगाबाद यांनी दि.२०/१०/२०२१ रोजी नोटीस देवून खालील प्रमाणे वक्फ मंडळाकडे निवेदन दिले होते.

दर्गाह हजरत शाह बेरीया, शाह साहेब आणि कब्रस्तान, सिटी चौक, औरंगाबाद च्या संबंधित वक्फ मिळकत सि.स.न.६०१५ क्षेत्र ३६० चौ.फुट जागेतील वक्फ मंडळाचे भाडेकरु श्री.विक्रमचंद सुराणा यांचे निधन झाल्यानंतर त्यांचे मुलाने कोटयावधी रुपये किमतीची मालमत्ता वक्फ मंडळास परत न करता मंडळाचा विश्वासघात करुन स्वतःचे फायदयासाठी लबाडीने शेजारचे दुकानदार ऑनेस्टी ड्रेसेस आणि जहीनी ड्रेसेसचे मालक अब्दुल अजीज आणि अब्दुल रज्जाक यांना हस्तांतरीत केली. वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ नुसार लिजडीड संपल्यानंतर वक्फ मालमत्ता जशी आहे तशीच वक्फ मंडळाकडे परत करणे बंधनकारक आहे. वक्फ मालमत्ता परत न करता त्यावर कब्जा चालू ठेवणे हे वक्फ मालमत्ता भाडेपट्टा नियम २०१४ चे नियम २४ नुसार अतिक्रमण समजले जाते आणि अशा प्रकारे स्वतःचे फायदयासाठी लबाडीने विश्वासघात करुन दुसऱ्या इसमास देणे हे कलम ४२०,४०६,४०९,४४८ भारतीय दंड विधानासह वक्फ अधिनियमाचे कलम ५२ अ अन्वये दखलपात्र गुन्हा ठरते तसेच ज्या इसमाने अशी मालमत्ता हस्तांतरित करुन घेतली तो पण याच कलमानुसार अतिक्रमणकर्ता म्हणुन गुन्हेगार ठरतो म्हणुन संबंधिता विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याची विनंती करुन दि.२६/४/२०२२ पासून आमरण उपोषण सुरु केले होते.

उपरोक्त अर्जावर नियमानुसार कार्यवाही सुरु असुन दि.१७/०३/२०२२ व १९/०४/२०२२ अन्वये मा.जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना पत्र देवून दर्गाह शाह बेरीयाशी संबंधी सिटी चौक येथील वक्फ मालमत्ता वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२ अन्वये वक्फ मंडळाच्या ताब्यात देणे बाबत मागणी करण्यात आली आहे. सदर प्रकरणात नियमानुसार कार्यवाही सुरु असुन त्यामध्ये काही कालावधी लागणार असल्याने उपोषण मागे घेण्याची विनंती अर्जदारास दि.२२/४/२०२२ रोजी करण्यात आली होती तसेच उपरोक्त वक्फ मिळकत वक्फ मंडळाचे ताब्यात देण्याची कार्यवाही त्वरीत करणे बाबत जिल्हाधिकारी यांना दि.२२/४/२०२२ रोजी स्मरण पत्र देण्यात आले होते सदर प्रकरणात कार्यवाही जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्याकडे प्रलंबित आहे.

सदर प्रकरणात हाजी एजाज देशमुख, बीजेपी अल्पसंख्याक मोर्चा प्रदेश अध्यक्ष यांनी अर्जदार मो.अजहर खान अकबर खान यांची भेट घेवून मा. डॉ.वजाहत मिर्झा, अध्यक्ष महराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, तसेच मा. श्री. समीर काजी, व मा. श्री. खालीद बाबु कुरेशी, सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ यांच्याशी संपर्क करुन उपरोक्त प्रकरणात गुन्हेगाराविरुध्द वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५२-अ सह भारतीय दंड विधानाचे कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा म्हणुन चर्चा केली होती त्यावर मा.अध्यक्ष व सदस्य महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी आश्वासन दिले की सदर विषयावर वक्फ मंडळाच्या आगामी बैठकीत निर्णय घेण्यात येईल असे अर्जदारानी अर्जात नमुद केले आहे. या आश्वासनावरुन अर्जदार यांनी दि.२८/०४/२०२२ रोजी त्यांचे उपोषण मागे घेतले होते.

उपरोकत प्रकरणात मा.महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण, औरंगाबाद येथे श्री. आयुष विक्रम प्रेमचंद सुराणा यांनी वक्फ मंडळाने दिलेल्या नोटीसला अव्हानीत करुन वक्फ अर्ज क्र.१७/२०२२ दाखल

केला आहे. त्यात त्यांनी असे नमुद केले की, आम्ही कोणत्याही प्रकारचे हस्तांतर केले नसुन व वक्फ कायदयाचा उलंघन केलेला नाही. आमच्या विरुध्द खोटी तक्रार करण्यात आली आहे.

सदरचे प्रकरण मा. महाराष्ट्र राज्य वक्फ न्यायाधिकरण औरंगाबाद येथे न्यायप्रविष्ठ असुन याचा विचार करुन श्री. आयुष विक्रम प्रेमचंद सुराणा, श्री.अब्दुल रज्जाक अब्दुल सत्तार जहिनी व श्री. अजीज भाई यांच्याविरुध्द पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्याबाबत चर्चा करण्याच्या अनुषंगाने सदरचा विषय पुढील निर्णयासाठी वक्फ मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.

प्रकरणात दि. १७ मे २०२२ रोजी खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला .

ठराव क्रमांक. १०: -

सदर वक्फ मालमत्ता ताब्यात घेण्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे तसेच या बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. सबब, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यापुर्वी संबंधीत पक्षकारांची सुनावणी घेण्याचा निर्णय मंडळाने घेतला आहे.

या संदर्भात सुरु असलेले न्यायालयीन प्रकरण मा. न्यायाधिकरणाने निकाली काढले आहे. प्रस्तुत प्रकरणी वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ५१ व ५६ च्या भंग झाल्याने सदर मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात देणे बाबत जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना दि. १७/०३/२०२२, १९/४/२०२२, २२/४/२०२२, ०७/०७/२०२२ व ०२/८/२०२२ रोजी पत्र देण्यात आलेले आहे. या संदर्भात जिल्हाधिकारी कार्यालाया मार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे.

**ठराव क्रमांक. ३२: - सदर मालमत्ता वक्फ मंडळाच्या ताब्यात घेण्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु आहे. सदर प्रकरण जिल्हाधिकारी औरंगाबाद कार्यालयाकडे प्रलंबित असल्याने विषयाधीन वक्फ मालमत्ता तातडीने मंडळाच्या सुपुर्द करणे बाबत वक्फ मंडळातर्फे पाठपुरावा करण्यात यावा.**

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने घेतलेले विषय**

**(सन्माननीय सदस्य ॲड ए.यु.पठाण यांनी मांडलेले विषय)**

**षय क्रमांक ३३-** पनवेल येथील मगदुम बीबी ट्रस्ट या वक्फ संस्थेची जमीन विकसीत करण्यासाठी नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत वक्फ मंडळाच्या दिनांक १०/०६/२०११ च्या बैठकीत ठराव पारीत करण्यात आलेला आहे. सदर वक्फ संस्थेस दिलेले नाहरकत प्रमाणपत्र वक्फ मंडळाच्या अभिलेखाशी जुळत नसल्याने याबाबत राज्य शासनाने वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ९७ अन्वये निदेश पारित केले होते. तथापि, सदर निदेश मा. न्यायाधिकरणाने दिनांक ११/०४/२०१९ रोजीचे आदेशान्वये रद्द केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी मा. उच्च न्यायालय मुंबई येथे रिट याचिका क्र. ३६४०/२०२१ दाखल झालेली आहे. तथापि, या मध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडुन अद्याप शपथपत्र दाखल न झाल्याची बाब ॲड ए.यु.पठाण, मा. सदस्य यांनी मंडळाच्या निदर्शनास आणली.

या प्रकरणी कायदेशीरदृष्टया स्पष्टीकरण येण्यासाठी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करण्याकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ कार्यालया मार्फत शासनास पत्र पाठविण्यात आलेले असल्याची वस्तुस्थिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निदर्शनास आणली.

**ठराव क्रमांकः-३३** प्रस्तुत प्रकरणी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार मा. उच्च न्यायालयामध्ये शपथपत्र दाखल करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.

**(सन्माननीय सदस्या डॉ. फौजिया तेहसीन खान यांनी मांडलेले विषय)**

**विषय क्रमांक ३४-** **वक्फ मंडळाच्या कामकाजात मुलभुत सुधारणा करण्यासाठी डॉ. फौजिया खान, मा. सदस्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी पुढील प्रमाणे सुचना मांडली.**

**DEVELOPMENTAL ISSUES**

1. Contractual appointment of manpower as per defined work plan in districts and head office
   a) Listing out expected work in district waqf offices
   b) Proper allocation of work as per practical requirement of work at the district/regional offices
   c) Staff must be qualified and as per official ranks.
   d) Staff must be fully trained
2. Head office staff reshuffling
3. Legal cell in head office with professional management plan along with efficient use of digital technology.
4. Professional financial planning for functioning of the board
5. Implementation of digital functioning
6. Digitization of records of waqf documents in revenue offices
7. Inquiry reports and action taken on corruption issues
8. Action taken on decisions of the board
9. Developmental agenda items in board meetings.
10. Action taken on resolutions of the board

उपरोक्त सुचनांची आगामी २ ते ३ महिन्यामध्ये अंमलबजावणी न झाल्यास वक्फ मंडळाचा सदस्य पदाचा राजीनामा देण्यात येईल, असे डॉ. फौजिया खान यांनी सुचित केले.

**ठराव क्रमांकः-३४** **डॉ. फौजिया खान, मा. सदस्या महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ यांनी केलेल्या उपरोक्त सुचनांवर प्राथम्याने कार्यवाही करण्यात यावी.**

## (चौकशी विभाग)

**विषय क्रमांक ३५-** **वक्फ संस्था मुस्लीम जमात, जामा मस्जीद देहू रोड, पुणे या वक्फ संस्थेवर तात्पुरती व्यवस्थापन समिती गठीत करणे बाबत. {कलम ६९ (५)}**

वक्फ संस्था मुस्लीम जमात, जामा मस्जीद देहू रोड, पुणे ही वक्फ संस्था वक्फ अधिनियम १९९५ च्या कलम ४३ अन्वये मानिव नोंदणीकृत वक्फ संस्था असून तीचा महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडील नोंदणी क्रमांक MSBW/PUN/७३/२००८ असा आहे.

सदर वक्फ संस्था सन २०१८ पासून वक्फ मंडळाच्या थेट निगराणीत असून त्याचे व्यवस्थापन प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांच्याकडुन करण्यात येत आहे. सदर वक्फ संस्थेच्या योजना मंजुरीचे प्रस्ताव वक्फ मंडळास प्राप्त झाले

असून त्याबाबत स्वतंत्रपणे कार्यवाही सुरु असून त्याबाबतची सुनावणी वक्फ मंडळाकडे सुरु आहे. दरम्यानच्या कालावधीत सदर वक्फ संस्थेच्या बॅक खात्यातून अनाधिकृत व्यवहार झाल्याचे निदर्शनास आले असून संबंधीतां विरुध्द गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

प्रादेशिक वक्फ अधिकारी पुणे यांच्याकडील कामकाजाचा व्याप जास्त असल्याने सदर वक्फ संस्थेच्या व्यवस्थापनासाठी तात्पुरती व्यवस्थापन समिती गठीत करण्याचे प्रस्तावीत आहे.

**ठराव क्रमांकः-३५** सदर विषयातील वक्फ संस्था वक्फ मंडळाच्या प्रत्यक्ष निगराणीत असल्याने तसेच सदर वक्फ संस्थेमध्ये अनधिकृत व्यवहार होत असल्याचे निदर्शणास आल्याने वक्फ अधिनियम १९९५ मधील कलम ६९ (५) येथील अधिकाराचा वापर करुन मुस्लीम जमात, जामा मस्जीद देहू रोड, पुणे या वक्फ संस्थेवर तात्पुरती व्यवस्थापन समिती गठीत करण्यास मंडळाची सहमती प्रदान करण्यात येत आहे. सदर तात्पुरती व्यवस्थापन समिती मधील सदस्यांची (किमान ५ कमाल ७) नेमणुक करण्याचे अधिकार प्रादेशिक वक्फ अधिकारी पुण यांना प्रदान करण्यात येत आहे.

**ठराव क्रमांकः-३६** **मडळाने बैठकीत घेतलेल्या निर्णयनुसार वक्फ मंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त अंतिम होण्याची वाट न पाहता, आदेश निर्गमित करण्याची /बैठकीतील निर्णयाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी करावी.**

| अ. क्र. | माननीय सदस्यांचे नांव | स्वाक्षरी |
|---|---|---|
| १ | डॉ. वजाहत मिर्झा अथर मिर्झा<br>मा. अध्यक्ष, | [signature] 12/9/22 |
| २ | श्री. सय्यद इम्तियाज जलील<br>मा. लोकासभा सदस्य तथा सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ३ | डॉ. फौजिया तेहसीन अहमद खान,<br>मा. राज्यसभा तथा सदस्या, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ४ | मा. डॉ.मुदस्सीर निसार लांबे<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | [signature] 9.9.22 |
| ५ | मा. ॲड. ए. यु. पठाण,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | [signature] 9.9.2022 |
| ६ | मा. समीर गुलामनबी काझी,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | [signature] 9/9/2022 |
| ७ | मा. शेख हसनैन शाकीर,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | |
| ८ | मा. मौलाना सय्यद अतहर अली,<br>मा. सदस्य, म.रा.व.मं.औरंगाबाद | S. Athar [signature] 9/9/2022 |
| | | |
| | श्री. जुनेद सय्यद,<br>मुख्य कार्यकारी अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद | [signature] 02.09.2022 |